## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/३४७
निर्णय दिनांक ०२-०२-२००९

१ श्री. सुंदरराव निळकंठराव गव्हाणे, : तक्रारदार
रा.कळंब, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ प्राचार्य/सचिव, : उत्तरवादी
मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद

**<u>इतिवृत्त</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी उत्तरवादी यांचे वकील व तक्रारदार हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांची उत्तरवादी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दि. २६.११.२००६ रोजीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०१.२००७ रोजी दाखल झालेली तक्रार अशी आहे की, "ज्ञानप्रसारक मंडळ येरमाळा, ता.कळंब या संस्थेच्या सचीवास संस्थेच्या कामकाजा बाबत विचारलेले प्रश्न" या संदर्भात उत्तरवादी यांनी तक्रारदाराची दि. २८.१०.२००६ रोजीची अपिलीय रजिस्टर A.D. सोडवून घेण्यास नकार दिला.

आज रोजी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे दि. २.२.२००९ रोजीचे एक निवेदन दिले असून, त्या निवेदनाची प्रत संबंधित संस्थेस पाठवून संबंधित संस्थेचे लेखी म्हणणे घेऊन नंतर विचाराधीन प्रकरणी निर्णय देणे आयोगास योग्य वाटते, सबब प्राचार्य/सचिव, मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि.उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांच्या दि.२.२.२००९ रोजीच्या निवेदनावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत लेखी

स्वरुपात आपले म्हणणे आयोगास सादर करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

(सोबत तक्रारदार यांचे दि.२.२.२००९ रोजीचे निवेदन पाठविण्यात येत आहे.)

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ०२-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुंदरराव नीळकंठराव गव्हाणे, दत्तनगर, कळंब जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य/सचिव, मोहेकर महाविद्यालय, कळंब,(ज्ञानप्रसारक शिक्षण संस्था,येरमाळा,ता.कळंब) जि.उस्मानाबाद यांना सहपत्रासह (सोबत तक्रारदार यांच्या दि.२.२.२००९ रोजीचे निवेदनाची छायाप्रत देण्यात येत आहे.) निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१९
निर्णय दिनांक ०२-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. वसंत संपतराव मुंडे,<br>रा.परळी वैजनाथ, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>अंबाजोगाई जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत,अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ७.११.२००७ रोजीचे,राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी नोंदणी झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची माहिती प्राप्त झाली, साक्षांकित प्रती दिल्या नाहीत, खरी माहिती दडविली व त्यावर कागद लावून झेरॉक्स काढल्या, अ,ब,क,ड,ई गटाच्या मंजूर कार्यक्रमाची यादी देण्यात आली नाही व निविदेच्या सत्यप्रती देण्यात आल्या नाहीत. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ७.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०६.२००६ ते दि. ०५.८.२००७ पर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- -"इमारत व रस्ते अर्थसंकल्पीय, बिगर अर्थसंकल्पीय ठेव कामे इत्यादी मंजूर केलेल्या अंदाजपत्रकांच्या रजिस्टरच्या झेरॉक्स सत्यप्रती, जन माहिती अधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यापासून अर्थसंकल्पीय, बिगर अर्थसंकल्पीय बी-१,ए-१ मंजूर निविदेच्या रजिस्टरच्या सत्यप्रती, रस्ते व इमारतीचे अर्थसंकल्पीय, बिगर अर्थसंकल्पीय अ गट ब,क,ड,ईच्या मंजूर कार्यक्रमाची यादी व गाडीचे लॉगबुक व मेंटेनन्स खर्चाची झेरॉक्स प्रत. "- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३५०/- चा भरणा मनीऑर्डद्वारे अथवा चलनाद्वारे करुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०८.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ५.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय दि. १६.१०.२००७ रोजी पारित केला. या निर्णयाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. ही माहिती अपिलार्थीस दि. १५.१०.२००७ रोजी सकाळी ११.३० वा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस इतर खात्याच्या कर्मचाऱ्यांसमोर साक्षांकित करुन द्यावी, असेही त्यांनी या निर्णयामध्ये म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयास अनुसरून जन माहिती अधिकारी यांनी दि. ९.१०.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी दि. ७.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये ज्या माहितीची मागणी केली होती, ती सर्व माहिती त्यांनी दि. ९.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिलेली आहे.अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहितीची वारंवार मागणी करतात व ज्यावेळी माहिती घेण्याची वेळ येते, त्यावेळी स्वतः माहिती हस्तगत करण्यासाठी येत नाहीत. राज्य माहिती आयोगाकडील यापूर्वी अशाच एका प्रकरणातील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करण्यासाठी जाण्याचे आयोगासमोर आश्वासित केले होते तथापि ते, त्यांनी मागितलेली ही माहिती हस्तगत करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती दिली व ती साक्षांकित करुन दिली किंवा कसे हे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, जन माहिती अधिकारी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती आयोगासमोर आज रोजी सुनावणीच्या वेळी सादर करु शकत नाहीत. या पुरविलेल्या माहितीची प्रत आयोगासमोर तपासणीसाठी उपलब्ध नसल्याने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी खरोखरीच पुरविली आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर वेगवेगळे प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केले आहेत. त्या अभिप्रायाचे समर्थन करण्यासाठी आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर नाहीत. सबब अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीची, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत, अपिलार्थी यांचे समक्ष तपासणी करावी व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य दिली जाईल, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीची, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत अपिलार्थी यांचे समक्ष तपासणी करावी व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य दिली जाईल, असे पहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज मार्केट, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २३२०/२००७, २३२१/२००७ व २३२२/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२०,२३२१ व २३२२
निर्णय दिनांक ०२-०२-२००९

१. श्री. शेख शब्बीर शे.अय्युब, : अपिलार्थी
रा.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (म),
तहसील कार्यालय,माजलगाव,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, माजलगाव,
जि.बीड

त्रयस्थ पक्षः

अपील क्र.२३२०/२००७
१. सौ. कालिंदा देशमुख
२. श्री. के. वाय. देशमुख

अपील क्र.२३२१/२००७
१. श्री. सुंदर भाऊसाहेब सोळंके
२. श्री. किशोर युवराज देशमुख
३. श्री. आर.आर.लगड

अपील क्र.२३२२/२००७
१. श्री. महादेव अनंतराव देशमुख

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त तीन प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.११.२००७ रोजी नोंदणी झालेले, तीन स्वतंत्र द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी सर्वसाधारणतः असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती परंतु सुनावणीचा निकाल दिला नाही व माहिती देण्याचा प्रयत्नही केला नाही. त्यामुळे त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कायद्याच्या कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई व्हावी. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्यावरही शिस्तभंगाची कारवाई व्हावी.

**अपील क्र. २३२०/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित रॉकेल विक्री परवान्याच्या प्रतीबाबत एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- -"सौ. कलिंदा देशमुख यांच्या रॉकेल लायसन्सची प्रत, मंगरुळ नं.३ येथील रॉकेल विक्रेते के. वाय.देशमुख हे कोण आहेत व के.वाय देशमुख यांच्या नावाने रॉकेल लायसन्स आहे का, असल्यास के.वाय देशमुख यांच्या रॉकेल लायसन्सची प्रत "- या मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २४.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. त्याप्रमाणे ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे कोणतेही म्हणणे

ऐकून न घेता अपिलार्थीस त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर करण्याच्या सूचना देऊन सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.८.२००७ रोजी दाखल केल्याबाबतचे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाचा शिक्का व संबंधित लिपीकाची सही असलेल्या दि. २४.८.२००७ रोजीच्या पत्राची प्रत आयोगासमोर आज सुनावणीच्या वेळी सादर केली. या पत्रामध्ये अपिलार्थीने ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या पुराव्या दाखल सादर केलेल्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.८.२००७ रोजी सुनावणीसाठी हजर असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने पुढे असाही युक्तिवाद केला की, तहसीलदार, माजलगाव यांच्याकडून ज्या रॉकेल विक्रेत्यांना रॉकेल वाटप केले जाते, त्या रॉकेल विक्रेत्यांच्या यादीमध्ये मंगरुळ नं.३ येथील सौ. कलिंदा देशमुख व के.वाय देशमुख या दोन वेगवेगळया व्यक्ती असल्याचे दाखविण्यात आले आहे. त्यांच्या अंदाजावरुन एकाच व्यक्तीस दोन वेगवेगळया नावावर रॉकेल परवाने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून पारित केले गेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी कलिंदा देशमुख यांच्या रॉकेल परवान्याची झेरॉक्स प्रत हातोहात दिली असून सदर प्रत अपिलार्थीस मिळाल्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची त्यावेळी सही घेतलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या सौ.कलिंदा देशमुख व के. वाय . देशमुख या दोन वेगवेगळया व्यक्ती नसून एकच व्यक्ती आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर कोणताही पुरावा सादर करु शकत नाहीत. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी,अपिलार्थी हे दि. २४.८.२००७ रोजी त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीसाठी हजर नसल्याचे आयोगासमोर, धादांत असत्य विधान करीत आहेत. त्यांच्या या विधानावरुन त्यांनी अपिलार्थीस हातोहात माहिती दिली या विधानावरही कोणत्याही

जनसामान्याचा विश्वास बसणार नाही तसेच त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगासमोर सादर केला नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या तीनही मुद्यावर मुद्देनिहाय माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत. माहिती अधिकार अधिनियम कलम ५(५)च्या तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांवर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची जिल्हाधिकारी, बीड यांना शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्र. २३२१/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील स्वस्त धान्य दुकाने व रॉकेल पुरवठयासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- -" माजलगाव सहकारी साखर कारखाना तेलगाव बु. ता.वडवणी येथील कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे व त्यांना केव्हापासून व कोणत्या अर्धघाऊक विक्रेत्याकडून व कोणत्या दुकानदाराकडून प्रतिमाणसी किती रॉकेल वाटप केले जाते, कारखान्याच्या परिसरापासून श्री. सुंदर भाऊसाहेब सोळंके, अर्धघाऊक विक्रेता दिंद्रुड हे जवळ असताना श्री. किशोर युवराज देशमुख, माजलगाव यांचेमार्फत रॉकेल वितरण करण्यात येते, याबाबत मान्यता असलेल्या आदेशाची प्रत, श्री. आर.एस.लगड,स्वस्त धान्य दुकानदार तेलगाव यांना मंजूर केलेल्या रॉकेलचा तपशील, कारखान्यात रु.१०,०००/- दरमहा

उत्पन्न असलेले कर्मचारी किती आहेत, गॅसधारक कर्मचारी किती आहेत त्यापैकी किती लोकांना रॉकेलही वितरण केले जाते, कारखान्यावर काम करणारे लोक तालुक्यातून तसेच इतर ठिकाणाहून कामास येतात, त्यांना मूळ गावात कार्ड असून त्या कार्डवरही रॉकेल वितरण होते किंवा कसे, याबाबत कार्यालयाने काय तपासणी केली आहे, यासंबंधी कार्डधारकांची यादी, माजलगाव कारखान्यावर ज्या यंत्रणेकडून रॉकेल वाटप केले जाते त्यांचे परवान्याची प्रत तसेच त्यांचे कुटुंबात अन्य कोणास पुरवठा विषयक परवाना दिलेला आहे काय, माहे मार्च, २००६ मध्ये माजलगाव तालुक्यातील व्यपगत झालेला तीन टँकर ३६,००० लिटर रॉकेलसाठा मे, २००६ मध्ये देण्यात आला, हा रॉकेलसाठा कोण्या अर्धघाऊक विक्रेत्यामार्फत कोणकोणत्या दुकानदारांस वितरीत झाला तसेच मार्च २००६ मधील रॉकेल वितरणाबाबत तपशील. "- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २४.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. त्याप्रमाणे ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे कोणतेही म्हणणे ऐकून न घेता अपिलार्थीस त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर करण्याच्या सूचना देऊन सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार, अपिलार्थीने त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.८.२००७ रोजी दाखल केल्याबाबत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा शिक्का व संबंधित लिपीकाची सही असलेल्या दि. २४.८.२००७ रोजीच्या पत्राची प्रत आयोगासमोर आज सुनावणीच्या वेळी सादर केली. या पत्रामध्ये अपिलार्थीने ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या पुराव्या दाखल सादर केलेल्या पत्राचे अवलोकन केले असता अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.८.२००७ रोजी प्रथम अपिलावरील सुनावणीसाठी हजर असल्याचे सिध्द होत आहे.

त्रयस्थपक्षाने त्यांची माहिती उघड करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास सांगितले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता, सर्वप्रथम असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. 'माहितीशी संबंधित कालावधी' या सदरासमोर त्यांनी "आठ दिवसांत" असे त्यांचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नसलेली माहिती देखील जन माहिती अधिकारी यांना विचारलेली दिसते. उदा. माजलगाव साखर कारखान्यातील रु.१०,००० उत्पन्न असलेले कर्मचारी किती आहेत, कारखान्यावर काम करणारे लोक इतर ठिकाणाहून कामास येतात त्यांना त्यांच्या मूळ गावात कार्ड असून त्या कार्डावरही धान्य,रॉकेल वितरण होते किंवा कसे, माजलगाव कारखान्यावर ज्या यंत्रणेकडून रॉकेल वाटप केले जाते, त्यांच्या परवान्याची प्रत इ. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३, ४, व ५ शी संबंधित माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे संकलीत केली जाणे अपेक्षित नसल्याने व ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असण्याची शक्यताही नसल्याने तसेच ही माहिती ज्यांच्या ताब्यात आहे, ते कोणतेही सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३,४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, याचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्या त्रयस्थ पक्षापैकी एक (श्री. आर.एस.लगड) व उर्वरित दोन त्रयस्थ पक्ष हे अनुक्रमे सन १९७९ व १९९५ पासून रॉकेल विक्रेत्याचे काम करतात, त्यामुळे या त्रयस्थ पक्षांस आजवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून सुरवातीपासून आजपर्यंत असंख्य आदेशाद्वारे रॉकेलचे नियतन मंजूर झाले आहे. यापैकी अपिलार्थीस निश्चित कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे, हे

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात स्पष्ट न केल्याने अपिलार्थीस या तीनही रॉकेल पुरवठाधारकासंदर्भातील त्यांच्याशी संबंधित असलेल्या अभिलेख्यांची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तपासणी करण्याचे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीनही त्रयस्थ पक्षासंदर्भातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यांवर उपलब्ध आहे, ते सर्व अभिलेखे तपासणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी तयारी दर्शविली आहे. हे पाहता अपिलार्थीस त्यांना, या प्रकरणी अपेक्षित असलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिलेख्यांची तपासणीसाठीचा स्वतंत्र अर्ज करुन ही माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस माहितीशी संबंधित अभिलेखे तपासणीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून अधिनियमातील तरतुदीनुसार तीस दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावीत, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक/कर्मचारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी दिसून येते. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सर्व सहायक व कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्र. २३२२/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजलगाव जि.बीड येथील स्वस्त धान्य दुकान कर्मचारी संघटनेमार्फत चालवित असलेल्या दुकानासंदर्भात काही मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती मध्ये- -" कर्मचारी संघटनेचे स्वस्त धान्य दुकान महादेव अनंतराव देशमुख हे चालवित आहेत, ते कोणत्या आधारे व कर्मचारी संघटनेस स्वस्त धान्य दुकान चालविण्याचे अधिकार पत्र आहे का, असल्यास कोणत्या अधिकाऱ्याने हे दिलेले आहे. "- या मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना आजही आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही पुरविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २४.८.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. त्याप्रमाणे ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित असूनही त्यांनी सुनावणी घेतली नाही.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही पुरविली नसल्याचे मान्य केले. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले स्वस्त धान्य दुकान १९७० सालापासून महसूल कर्मचारी संघटनेतर्फे चालविले जाते, सदर महसूल कर्मचारी संघटनेस या स्वस्त धान्य दुकानाचे वाटप जिल्हाधिकारी, बीड यांनी केलेले आहे.

त्रयस्थ पक्ष श्री. महादेव अनंतराव देशमुख यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, ते महसूल कर्मचारी संघटनेतर्फे सेल्समन म्हणून नेमले गेले आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले स्वस्त धान्य दुकान ते स्वतः चालवित नाहीत. ते महसूल कर्मचारी संघटनेकडे दरमहा रु.१५००/- इतक्या ठोक वेतनावर सेल्समन म्हणून काम करीत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता, सर्वप्रथम असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडून माजलगाव,जि.बीड येथील महसूल कर्मचारी संघटनेतर्फे चालविल्या जात असलेल्या स्वस्त धान्य दुकानाचे संदर्भात २ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यापैकी एक मुद्दा असा आहे की, स्वस्त धान्य दुकान चालविण्याचे अधिकार महसूल कर्मचारी संघटनेस जिल्हाधिकारी यांनी देण्याचे मूळात अधिकार आहेत किंवा कसे व दुसरा मुद्दा म्हणजे सदर संघटनेस त्यांना परवाना देण्यात आलेले दुकान, श्री. महादेव अनंतराव देशमुख यांना चालविण्यासाठी कोणत्या नियमाच्या आधारे देण्यात आला, हे होय. स्वस्त धान्य दुकान मूळात महसूल कर्मचारी संघटनेस देण्याचे अधिकार आहेत किंवा कसे, या संदर्भात जिल्हाधिकारी यांना कोणत्या कायद्याद्वारे अथवा परिपत्रकाद्वारे निश्चित कोणते अधिकार आहेत, याबाबत सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी आयोगासमोर आवश्यकतेप्रमाणे स्पष्टीकरण करु शकले नाहीत. तसेच महसूल कर्मचारी संघटनेला त्यांच्या संघटनेच्या घटनेप्रमाणे अथवा संघटनेने या संदर्भात महसूल प्राधिकरणाशी केलेल्या करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे त्यांना अशाप्रकारचे व्यवहार करता येतात किंवा कसे, याबाबतही उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कोणतेही भाष्य केले नाही. मात्र जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेखे पाहून याबाबतची माहिती त्यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत देण्याची तयारी दर्शविली आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये तर सोडाच परंतु आज रोजी आयोगाकडील द्वितीय अपील सुनावणीपर्यंत देखील कोणताही प्रतिसाद दिला नाही, यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात आपला पूर्ण अनादर अशा प्रकारे व्यक्त केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस कोणतीही माहिती प्रदीर्घ कालावधी व्यपगत झाल्यानंतरही, न देऊन त्यांनी व त्यांच्या संबंधित सहायकांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन, स्वतःला

अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस नि:संशयपणे पात्र ठरविले आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे अव्वल कारकुन यांच्याकडून दि. १६.८.२००७ रोजी मागितल्याचे दिसून येते, तथापि या नंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक कर्मचारी/अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी यांच्या ज्या सहायकाकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे, ते सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांच्या विचाराधीन अपील क्र. २३२०/२००७, २३२१/२००७ व २३२२/२००७ बाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. २३२०/२००७ व २३२२/२००७ मान्य व अपील क्र.२३२१/२००७ अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्र.२३२०/२००७, व २३२२/२००७ या दोन प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच अनुक्रमे तीन व सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपील क्र. २३२०/२००७ व अपील क्र. २३२२/२००७ संबंधी जिल्हाधिकारी, बीड यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या सर्व सहाय्यक कर्मचारी/अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. अपील क्र. २३२१/२००७ संबंधी महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सर्व सहाय्यक/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०२-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख आयूब शेख शब्बीर, इदगाह मोहल्ला, माजलगाव जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, माजलगाव जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२३
निर्णय दिनांक ०२-०२-२००९

१. श्री. साहेबराव देवराव पोटभरे, : अपिलार्थी
रा. माजलगाव जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी,
माजलगाव,जि.बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.११.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूरी,चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे व त्यांच्या दि. ९.५.२००७ रोजीच्या फिर्यादीवर जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याशी संबंधित दि. ९.५.२००७ ते दि. १६.७.२००७ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"गेल्या २ वर्षा पासुण तहसील कार्यालय माजलगाव समोर चालू आसलेल्या बीराड थाटो आंदोलण बे कायदेसीरपणे बंळाचा वापर करुण तहसीलदार पी.के. मीश्रा साहेबानी पोलीसामार्फत बीराड हाटविलेबाबत साहेबराव पोटभरे यांनी दि. ९/५/२००७ रोजी फिर्यादीबदल आपल्या आपण कोनत्या नेमा प्रमाणी/आडवली आहे त्यांचे खुलास पुराव्या नीसी माहिती देणे नेमाप्रमाणी कलमासहीत आडवण्याचे कारणसहीत माहीती देणे. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ८.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा व तद्नंतर दि. ८.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांनी पंचनाम्याची प्रत व या प्रकरणी त्यांनी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस दिल्या असल्याचे दिसून येते. तथापि त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ५.९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २९.९.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याने, निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादाद्वारे प्रथमतः या प्रकरणाविषयीची पार्श्वभूमी आयोगास विषद केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने श्री. साहेबराव देवराव पोटभरे यांनी दि. ६.५.२००५ पासून माजलगाव तहसील कार्यालयाच्या आवारात 'बिऱ्हाड थाटो' नावाचे आंदोलन सुरु केले होते. या आंदोलनामध्ये त्यांनी पाच बांबू,एक बाज, गादी,काळे मेनकापड, चार लोखंडी पत्रे, सहा लाकडी बल्ल्या, पलंगावर चारराष्ट्रीय महापुरुषांचे, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

व कर्मविर दादासाहेब गायकवाड यांचे छायाचित्रे /फोटो लावली होती.अपिलार्थीच्या सदर अतिक्रमण काढण्याचे तहसीलदार, माजलगाव यांनी दि. २.५.२००७ रोजी तहसीलदार यांना अपिलार्थीस सदर अतिक्रमण काढण्याची नोटीस देखील जारी केली होती. तथापि अपिलार्थीने सदर नोटीस घेण्यास नकार दिला, त्यामुळे त्यानंतर अपिलार्थीने केलेले अतिक्रमण तहसीलदार यांनी पोलीस यंत्रणेमार्फत काढून टाकले, म्हणून व्यथित होऊन अपिलार्थीने माजलगाव येथील पोलीस ठाण्यात संबंधित तहसीलदार यांच्याविरुध्द तक्रार अर्ज दाखल केला होता. या तक्रारीमध्ये त्यांनी संबंधित पोलीस ठाण्याचे अंमलदार यांना तहसीलदार श्री. मिश्रा यांच्याविरुध्द ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची विनंती केली होती. तथापि तहसीलदार श्री. मिश्रा यांनी कोणताही गुन्हा न केल्याचे पोलीस अंमलदार यांना न आढळल्याने त्यांनी श्री. मिश्रा यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल न झाल्याने अपिलार्थीस न्याय मिळाला नाही, असे वाटत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या संदर्भात दृष्टीकोनातून या प्रकरणी पाहिल्यास असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत दि. ८.८.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दि. ८.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला आहे. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ५.९.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार दि. २८.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २९.९.२००७ रोजी पारित केले आहेत.

आज रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली कथित माहिती ही अपूरी,चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थी आयोगाकडे केलेले द्वितीय अपील अर्जावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी दि. ९.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर आयोगाने आदेश देणे अपेक्षित आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती - "बिऱ्हाड थाटो आंदोलन आपण कोणत्या नियमाप्रमाणे अडविले आहे, तो कलमासह नियम", अशी माहिती मागितल्याचे दिसते. मूळात अपिलार्थीस याबाबत कार्यवाही अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचे हे नियम प्रशासकीय कार्यवाहीचा एक भाग आहे. या

संदर्भात त्यांनी घेतलेल्या निर्णयास तेच जबाबदार असतात. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये संदर्भित केलेल्या तक्रारीमध्ये कोणतीही कार्यवाही करणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्रस्तुत वाटले नाही, हा त्यांचा प्रशासकीय निर्णय आहे व या संदर्भातील सर्व कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहेत. हे पाहता, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. ९.५.२००७ रोजीच्या तक्रार अर्जाच्या तपशीलामध्ये जाण्याचे आयोगास आवश्यकता वाटत नाही. कारण असे केल्याने जन माहिती अधिकारी यांच्या नियमित प्रशासकीय कामकाजामध्ये कोणत्याही अधिकारितेशिवाय ढवळाढवळ करणे आयोग उचित समजत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील अर्जावर आता निर्णय घेण्यासाठी कोणताही मुद्दा उरला नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पोटभरे साहेबराव देवराव, जम्बोद्विप निवास, मंजरथरोड, भाटवडगाव ता.माजलगाव

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक बीड, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. २३२४/२००७, २३२५/२००७ व २३२६/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२४,२३२५ व २३२६
निर्णय दिनांक ०२-०२-२००९

१. श्री. शरद कुलकर्णी, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
निम्नदुधना प्रकल्प विभाग,
सेलू, जि.परभणी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील तीन प्रकरणींची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणांतील अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००७ रोजी दाखल झालेली, तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर तीनही अपिल अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित कामाची माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती देण्यास हेतूपुरस्सर माहिती देण्यास टाळाटाळ केली व माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केले. अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले असता, त्यांनी अपील प्रकरणाची प्रक्रिया पूर्ण न करता जन माहिती अधिकारी यांना

माहिती देण्याबाबत आदेशित केले. या दोन्हीही अधिकाऱ्यांचा केंद्रीय माहिती अधिकाराच्या प्रती हेतू शुध्द नसून त्यांना माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार कार्यवाही करावी.

**अपील क्र. २३२४/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विभागाअंतर्गत नदी विस्तारीकरण कामासंदर्भात एप्रिल २००१ ते सप्टेंबर, २००५ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नदी विस्तारीकरणाच्या कामाची प्रशासकीय मान्यतेची प्रत, अंदाजपत्रक व मान्यतेची प्रत, अंदाजपत्रकाव्यतिरिक्त झालेल्या अतिरिक्त कामाचा तपशील व विस्तारीकरण कामाची दिलेली देयके व अदा केलेल्या रकमेचा तपशील- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या तीनही प्रथम अपिल अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.५.२००८ रोजी एकत्रित सुनावणी ठेवली होती. तथापि या संदर्भात त्यांनी संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित स्वरुपाची कोणतेही आदेश निर्गमित केल्याचे आढळून येत नाही. उपलबध कागदपत्रांमध्ये या सुनावणीचे इतिवृत्त जन अपिलीय अधिकारी यांनी काढून ठेवलेले दिसून येते. या इतिवृत्तावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सदर सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या दि.२६.५.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येते. तथापि सुनावणीच्या इतिवृत्ताची प्रत अपिलार्थीस पाठविली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळून येत नाही. मध्यंतरीच्या काळात या सुनावणीपूर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केल्याचे आढळून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांचे नाव श्री. चंद्रकांत महादेव राऊत असून ते जन माहिती अधिकारी या पदावर दि. १७.९.२००८ पासून कार्यरत आहेत.अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी श्री. सत्तारखान (दि.२०.११.२००७ पर्यन्त) व श्री. तिरमनवार (दि. २१.११.२००७ ते १६.९.२००८ पर्यंत) नावाचे जन माहिती अधिकारी कार्यरत होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे मांडण्यास संधी आयोगाने दिली. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी संबंधित उपविभागाकडे अपिलार्थीस देण्यासाठी मागितली होती. तथपि संबंधित उपविभागाकडून त्यांना माहिती पुरविली न गेल्यामुळे त्यांना अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. ८.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती एका विशिष्ट कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मूळ कामास प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजूरीची प्रत, मंजूरांचे अंदाजपत्रकाची प्रत, अतिरिक्त कामाचा तपशील ही सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात होती. अपिलार्थीस दि. २६.५.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीच्या प्रतीचे पृष्ठांची संख्या २० इतकी होती, असे सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठया प्रमाणात होती किंवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याची बाब या प्रकरणी संभवते, असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपविभागाकडून माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. कारण अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जलसंपदा विभागाच्या कामकाजाची कार्यपध्दती पाहता, कार्यकारी अभियंता, यांच्या कार्यालयात उपलब्ध असावयास हवी. अपिलार्थीस दि.

८.१०.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीचा अभाव हेच कारण अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यामागे आहे, अशी शक्यता असा निष्कर्ष आयोग काढत आहे.अधीक्षक अभियंता यांच्या दि. २१.५.२००८ रोजीच्या सुनावणीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करता, त्यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित करुनही कार्यकारी अभियंता यांनी विहित वेळेत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच अपिलार्थीस दिलेली माहिती अपूरी असल्याचे त्यांचे अभिप्राय त्यांच्या इतिवृत्तात अधीक्षक अभियंता यांनी नोंदविले आहेत. यावरुन या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे निःसंशयपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थीने प्रथमतः दि. ८.१०.२००७ रोजी माहिती मागितली होती, त्यावेळी श्री. सत्तारखान नावाचे कार्यकारी अभियंता कार्यरत होते. श्री. सत्तारखान यांची बदली झाल्यानंतर दि. २१.११.२००७ ते १६.९.२००८ या कालावधीमध्ये श्री. तिरमनवार नावाचे दुसरे कार्यकारी अभियंता कार्यरत होते, यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंब मधील एकूण १३ दिवसांकरिता श्री. सत्तारखान हे हजर असल्याचे दिसून येते व उर्वरित ८७ दिवसांकरिता श्री. तिरमनवार हे कार्यकारी अभियंता हजर असल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी श्री. तिरमनवार हे कार्यकारी अभियंता (सध्या कार्यकारी अभियंता, संकल्पचित्र विभाग,पुणे येथे कार्यरत) आयोगासमोर हजर नाहीत. संबंधित अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित मुदतीत माहिती न देऊन, विलंबाने माहिती पुरविण्याप्रित्यर्थ श्री. सत्तारखान व श्री. तिरमनवार या दोघांनीही स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी श्री. सत्तारखान यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ८७ दिवसांच्या विलंबासाठी एकूण रु.३२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात **"००७० इतर प्रशासनिक सेवा**,६० **इतर**

**सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१** " या लेखाशीर्षाखाली हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत भरणा करावे. त्याचप्रमाणे श्री. तिरमनवार यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत न दिल्याने त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी २५० या प्रमाणे ८७ दिवसांकरिता एकूण रु.२१,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करावा. उपरोक्त कालावधीमध्ये त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. २६.५.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पाठविण्यापूर्वीच म्हणजे दि.२६.१२.२००७ रोजी केले आहे. तसेच अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेल्या या मुद्यावर भाष्य करण्यासाठी आज अपिलार्थी आयोगासमोर गैरहजर आहेत. हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

**अपील क्र. २३२५/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यासंच्या दि. ८.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे निम्नदुधना प्रकल्पांतर्गत सेले ते परतुर रोड बांधकामासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००५ ते सप्टेंबर, २००५ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाचे अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता, कामाचे निविदा(प्राप्त व मंजूर निविदेचा तपशील) मंजूर निविदेसंबंधी जोडपत्रे, पडताळणी तक्ता, कामाचे दिलेले वर्कऑर्डर, निविदाधारकांची अंदाजपत्रकानुसार झालेल्या कामाचा तपशील,बांधकाम साहित्य व कामाचा गुणवत्ता पडताळणी अहवाल, कामाचे दिलेले देयके व अदा केलेली रक्कम, धनादेशाचा तपशील, पेमेंट अदा करताना झालेल्या कामाची गुणवत्ता पडताळणी अहवाल - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास त्यांनी त्यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिला असून त्यांना कोणत्या कामाची माहिती हवी आहे, याबाबत बोध होत नसल्याचे कळविले व अपिलार्थीस निश्चित कामाचे नाव कळविण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या तीन प्रथम अपिल अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.५.२००८ रोजी एकत्रित सुनावणी ठेवल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत असून या प्रकरणाशी संबंधित अभिप्राय त्यांनी सदर सुनावणीच्या इतिवृत्तामध्ये स्वतंत्र नोंदविले असून, यामध्ये, "संबंधित अर्जदाराने निश्चित कोणती माहिती पाहीजे आहे. हे कार्यकारी अभियंता निम्नदुधना प्रकल्प विभाग, सेलू यांना कळविले नसल्याचे सुनावणी वेळी श्री. जोशी क.लि.यांना सांगितले आहे. परंतु अर्जदारास पत्र प्राप्त झाल्याची पोच सुनावणी दरम्यान उपस्थित केली नाही,पावती उपलब्ध करुन देण्यात येईल", असे अभिप्राय नोंदविले आहेत.तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे सेलू ते परतूर रोडच्या बांधकामाबाबतची काही माहिती मागितली होती. सदर रस्त्याचे बांधकाम त्यांच्या कार्यालयातर्फे केले नव्हते व अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा त्यसांना बोध झाला नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दि. २९.१०.२००७ रोजी कळविले आहे. सेलू-परतूर या रस्त्यावर त्यांच्या कार्यालयातील चिंचोली नाल्यावर भराव या कामाव्यतिरिक्त कोणतेही काम केले गेले नाही व अपिलार्थीने या भरावाच्या कामासंबंधी कोणतीही माहिती मागितली नाही, त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत तसेच त्यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या पत्राने कोणतेही उत्तर दिले नसल्याने अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या कामासंबंधी माहिती मागितली होती, ते काम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केले नव्हते, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या कामाचे नाव वेगळे होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कोणत्या कामासंदर्भात त्यांना माहिती हवी आहे, याची विचारण केली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अपिलार्थी यांनी कोणतयाही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही, हे पाहता, अपिलार्थीस निश्चित कोणत्या कामाची माहिती हवी होती, हे न कळल्याने तसेच अपिलार्थीने सर्वसाधारणपणे ज्या रस्त्याविषयी माहिती मागितली होती, त्या रस्त्याचे बांधकाम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केले गेले नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

**अपील क्र. २३२६/२००७:**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ऑक्टोबर, २००७ अखेरपर्यंतची त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामावर झालेल्या टिप्पर अपघातासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपघातग्रस्त टिप्परची कागदपत्रे (अपघातग्रस्त टिप्पर कुणाच्या मालकीचा, त्याची विमा,टॅक्स व आरटीओ रजिस्ट्रेशनसह फिटनेस प्रमाणपत्र), अपघातग्रस्त कामगार कोणाच्या एजन्सीअंतर्गत कामावर होते, संबंधित एजन्सीची निविदा व त्यासंबंधी आवश्यक जोडपत्रे, एजन्सीला दिलेली वर्कऑर्डर, एजन्सीने कामगाराच्या हितासाठी केलेल्या विशेष ग्रुप विमा व पी.एफ.च्या सुविधेबाबतची कागदपत्रे, कामाचे मंजूर अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता, मृत व जखमी कामगाराची नावे व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबाचा तपशील- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. ५.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित कले व या प्रकरणाशी संबंधित कथित सुनावणी दि. २१.५.२००८ रोजी म्हणजेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर घेतली. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती, ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २६.५.२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमधील अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्यांद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्रात झालेल्या अपघातासंबंधी माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील अपघातग्रस्त टिप्परच्या विमा, टॅक्स व आर.टी.ओ.रजिस्ट्रेशन फिटनेस, संबंधित एजन्सीने कामगारांचे काढलेले विमा ग्रुप विमा व पी.एफ. सुविधा, मृत व जखमी कामागारांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबियांचा तपशील, ही माहिती सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असणे अभिप्रेत नाही. त्यामुळे या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांसंदर्भातील माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदींप्रमाणे देय ठरत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. २६.५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविली असल्याचे आयोगास स्पष्ट केले आहे व या संदर्भातील आवश्यक ते पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येत

आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे काहीही कळण्यास आयोगास मार्ग नाही, तेव्हा जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे, असे अनुमान करण्यात येत आहे. जरी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असली तरीही, अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, हे वास्तव उरत आहे. याप्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा निःसंशयपणे भंग केला असल्याचे सिध्द होत आहे, त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या तीनही द्वितीय अपील अर्जांमध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती व शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची कोणतीही अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २३.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे, त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद सचिव (जलसंपदा) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांच्या अपील क्र. २३२४/२००७, २३२५/२००७ व २३२६/२००७ या तीन अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. २३२४/२०७ व २३२६/२००७ अंशत: मान्य व अपील क्र. २३२५/२००७ फेटाळण्यात येत आहे.

२) अपील क्र.२३२४/२००७ शी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. सत्तारखान) यांना एकूण रु.३२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत शासकीय कोषागारात भरणा करावी.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. तिरमनवार) यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ८७ दिवसांचा विलंब लावल्याबद्दल एकूण रु.२१,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

४) अपील क्र.२३२६/२००७ प्रकरणात, सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शरद कुलकर्णी,४, आर्या निवास, एडीसीए स्टेडियम जवळ एन-२, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, निम्नदुधना प्रकल्प विभाग, सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, जायकवाडी, प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२७
निर्णय दिनांक ०२-०२-२००९

१. श्रीमती पं.ग. कोदरकर, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक यांचे कार्यालय, औरंगाबाद. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक यांचे कार्यालय, औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: विभागीय वन अधिकारी (नियोजन) 'वनभवन', उस्मानपूरा, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी: मुख्य वनसंरक्षक, उस्मानपूरा, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २६.१२.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णय कळविण्यात आला नाही.

अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात लेखापाल या पदावर केल्या गेलेल्या भरतीसंदर्भात एकूण ६ मुद्दे व त्यातील उपमुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -" जाहीरात प्रसिध्द केलेल्या वर्तमानपत्राचे नाव, जाहीरातीमध्ये प्रसिध्द केलेला अर्जाचा नमूना, सदरहू जाहीरातमधून स्वातंत्र्यसैनिक अवलंबितांना त्यांची माहिती देता यावी या दृष्टीने सर्व माहिती मागितली आहे काय?, जाहीरातीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख केला आहे काय ? शासनाच्या दि. ४.३.९१ च्या परिपत्रकाच्या परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या स्वातंत्र्यसैनिकांसाठी नोकरीविषयक असलेल्या सवलती (अ ते ड) या उपकलमात दर्शविले आहे काय ?, दि.४.३.९१ च्या परिपत्रकातील सवलतीपैकी (ब वगळता) बाकीच्या सवलती रद्द केल्या वा विचारात न घेण्याबाबतचे शासन निर्देश आहेत काय? अशी सूट दिल्यानंतर स्वातंत्र्यसैनिक शासन परिपत्रक दि. ४.३.९१ च्या लाभास अपात्र ठरवू शकतात काय? "- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि या प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.८.२००७ रोजी प्रथम अपील केले, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश दि. २६.९.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या फॉर्मची प्रत पाठविण्याचे सूचित केले. मात्र या अपील निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली/पाठविली नाही. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जाबाबत कोणताही निर्णय अशाप्रकारे प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, स्वातंत्र्यसैनिकांना शासनाने शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यासाठी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी हे योग्य रितीने करीत नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १८.८.२००७ रोजी दिलेल्या माहितीमध्ये अर्जाच्या नमुन्याच्या प्रतीचा समावेश नव्हता. सदर प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. आयोगाकडील यापूर्वी झालेल्या सुनावणीमध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुलाने योग्यप्रकारे अर्ज केला नाही, असे म्हटले होते, मात्र याप्रकरणाशी संबंधित दि. १८.८.२००७ रोजी दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मुलाने अर्ज केल्याचे जन माहिती अधिकारी हे मान्य करीत आहे, यावरुन जन माहिती अधिकारी दिशाभूल करीत असल्याचे सिध्द होत आहे असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या पाल्याने केलेला अर्ज त्यांनी त्यांच्या कार्यालयातील लेखापाल या पदासाठी झालेल्या भरतीमध्ये विचारात घेतला नाही. अपिलार्थीच्या पाल्यास आवश्यक ते गुण प्राप्त न झाल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात समाविष्ट करुन घेता आले नाही. अपिलार्थी पासून माहिती दडविण्याचे अशाप्रकारचा त्यांना कोणताही हेतू नाही. याच प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या एका द्वितीय अपील अर्जावर राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.७.२००७ रोजी सुनावणी होऊन आयोगामार्फत अपिलार्थीचे अपिलावर निर्णय झाला असून सदर अपील निकाली काढण्यात आले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ८ मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येप्रमाणे फक्त मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.८.२००७ व २६.९.२००७ रोजीच्या दोन वेगवेगळया पत्राद्वारे पुरविल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम २ (च) मध्ये

स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की, माहिती अधिकार अधिनियम,२००५ अन्वये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास त्यांनी, त्यांच्याकडे माहिती, ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात पुरविणे या संदर्भात प्रथमतः निर्णय घेणे व माहिती पुरविण्याचा निर्णय झाल्यास अधिनियमातील विहित तरतुदींचे पालन करुन अपिलार्थीस माहिती देणे एवढया पुरतीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांना त्यांचा खुलासा, त्यांची मते अथवा त्यांचे अभिप्राय मागणे या प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अभिप्रेत नाही. अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्याचे उत्तर देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीमध्ये समाविष्ट नाही. माहिती अधिकार अधिनियमान्वये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जास अनुसरुन माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत अर्जदारास माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेणे, हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी त्यांच्या एकूण ६ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ३ ते ६ या ४ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित केल्याचे दिसून येते. अशाप्रकारचा खुलासा वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय नसतानाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १८.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिल्याचे आढळून येत आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी टाळाटाळ केल्याचे अथवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे स्पष्ट/सिध्द होत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या अर्जाच्या नमुन्याची प्रत देखील त्यांनी दि. २६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार पुरविली आहे. हे पाहता, आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती देणे बाकी राहिले नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या आज रोजीच्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ आक्षेप सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ४.३.१९९१ च्या परिपत्रकाद्वारे निर्गमित केलेल्या सूचनांची

अंमलबजावणी योग्यप्रकारे होत नसल्याबाबत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांच्या पाल्यास वन विभागाच्या कार्यालयामध्ये लेखापाल या पदावर नेमणूक न दिल्याने/मिळाल्याने अन्याय झाला, असे वाटत असल्याचे वन विभागाच्या या प्राधिकरणाशी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करुन त्यांच्याकडे आपली कैफियत मांडून त्यावर संबंधितांकडून निर्णय घ्यावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.९.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस पाठविली नाही. याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीसंदर्भात घेतल्या जाणाऱ्या निर्णयाची प्रत सर्व संबंधितांना पाठविण्याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती प. गं. कोदरकर, द्वारा श्री. दे. म. अकोलकर, ३३(अ), रेणुका छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन व मुख्यालय), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८८

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. रामदास एकनाथ लोखंडे, अपिलार्थी

रा. हिवराबळी, पो. जानेफळ (पं),

तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग,

भोकरदन, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)

उपविभाग भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०५-०१-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, हे पत्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००९ च्या पत्राव्दारे आयोगास सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना विचाराधीन अपील चालवावयाचे नाही, असे आयोगासमोर सांगितले व त्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या, जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रावर, स्वाक्षरी केली आहे.

खुद्द अपिलार्थीस विचाराधीन अपील चालविण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २१८८/२००७, दिनांक ०३-१२-२००७ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१८८/२००७, दिनांक ०३-१२-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामदास एकनाथ लोखंडे, रा. हिवराबळी, पो. जानेफळ (पं), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८९

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. ईश्वरलाल गुलाबराव घोरपडे, अपिलार्थी
लघुलेखन निदेशक,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींची, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, याप्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. एल. ए. खान लघुलेखन निदेशक यांच्या बदलीसंदर्भात दिनांक ०३-०९-२००७ रोजीची काही माहिती एकूण आठ मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २३-११-२००७ रोजी पारित केले. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००७ रोजी दिल्याचे अनुमान काढून या निर्णयाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना प्राप्त झालेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या सहीने प्राप्त झाली आहे, त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खरी माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या कर्मचा-याविषयी माहिती मागितली आहे ते कर्मचारी श्री. एल. ए. खान हे अतिरिक्त ठरत नसतांना देखील विभागीय उपसंचालकांनी त्यांच्या पदाचे समायोजन केले. उपसंचालक यांच्या मर्जीतील कर्मचा-यांना सामावून घेण्यासाठी श्री. खान यांची बदली उपसंचालकांनी केली व परिणामी श्री. एल. ए. खान यांचे ज्या पदावर समायोजन केले गेले त्या रिक्त पदावर बदलीने नेमणूक देण्यासाठी अपिलार्थीने उपसंचालकाच्या या कारवाई पूर्वीच अर्ज केला होता, तथापि अपिलार्थीस हवे असलेले पद श्री. जाधव यांच्या नियुक्तीने भरले गेले असल्याने त्यांच्यावर अन्याय झाला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे नियतकालीन बदलीसाठी पात्र नव्हते, त्यांनी घेतलेला निर्णय प्रशासकीय स्वरुपाचा आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता, अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये मागणी केलेल्या एकूण आठ मुद्यापैकी, मुद्दा क्रमांक १, २, ३, ५ व ८ शी संबंधीत माहिती त्यांना देय होत नाही, कारण या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाबद्दलची कारणे, त्यांचे स्पष्टीकरण व अभिप्राय अपेक्षिले आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, माहिती अधिकारांतर्गत अर्जदारास, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल कारणे, स्पष्टीकरण अथवा त्यांचे वैयक्तीक अभिप्राय विचारणे व अर्जदाराच्या प्रश्नांना जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे देणे, निर्णयाबाबत जन माहिती अधिकारी यांनी अभिप्राय देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अभिप्रेत नाहीत असे दिसून येते. हे पाहता, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ६ व ७ शी संबंधीत माहिती फक्त अपिलार्थीस देय ठरत आहे. मुद्दा क्रमांक ४ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडील बिंदू नामावलीच्या प्रतीची माहिती मागविली होती, तथापि अशा प्रकारची बिंदू नामावली त्यांच्या कार्यालयात त्यावेळी ठेवले जात नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे, ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, म्हणजे संचालक तंत्रशिक्षण यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवावयास हवी होती, तथापि अशा प्रकारची कृती जन माहिती अधिकारी यांनी न करता आपल्या कृतीचे समर्थन केले आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ६ व ७ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पुरविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त तंत्र शिक्षण विभागातील दिनांक ०३-०९-२००७ रोजी अस्तित्वात असलेल्या बिंदू नामावलीच्या प्रतीची माहिती देय ठरत आहे. सदर माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांच्या

कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादावरुन त्यांची या पदावर बदली होणे त्यांना अपेक्षित होते परंतु या पदावर दुस-या व्यक्तीची नेमणूक झाली असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला असल्याची अपिलार्थी यांची भावना झाल्याचे दिसून येते. तथापि अशा प्रकारे सार्वजनिक प्राधिकरणाला त्यांच्या नियमित प्रशासकीय बाबींमध्ये आदेशित करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे अपिलार्थीस असे सुचविण्यात येते की, त्यांच्यावर झालेल्या कथित अन्यायाची तड त्यांनी सचिव (तंत्रशिक्षण) मुंबई यांच्याकडून लावून घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वरलाल गुलाबराव घोरपडे, लघुलेखन निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींची, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९०

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. ईश्वरलाल गुलाबराव घोरपडे, अपिलार्थी
लघुलेखन निदेशक,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींची, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वारंवार चुकीची, विसंगत व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर

केल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर त्यांना "श्री. एल. ए. खान यांची बदली औ. प्र. सं. मुलींची औरंगाबाद या संस्थेत लघुलेखन निदेशक पदावर केली आहे, असे अधिकार उपसंचालकांना प्राप्त आहेत काय त्याची प्रत मिळावी" या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत, लघुलेखक निम्न श्रेणी पदावरील कर्मचा-यांना समायोजनाव्दारे सामावून घेण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्राने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-१०-२००७ रोजी सुनावणी घेतली व यासंदर्भात अपिलार्थीस दिनांक ३१-१०-२००७ रोजी पत्र पाठविले. या पत्रामध्ये त्यांनी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांना लघुलेखन निदेशक पदावरील नेमणूक, बदली आणि पदोन्नतीचे अधिकार असल्याबाबत नमूद करुन सोबत दिनांक २५ मे २००६ चे शासनाच्या राजपत्राची प्रत जोडली व अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, लघुलेखक पदावरील कर्मचा-यांच्या बदल्या करण्यासाठी, संचालकास ते विभाग प्रमुख असल्यामुळे अधिकार असल्याचे त्यांना मान्य आहे, परंतु संचालकांनी हे अधिकार उपसंचालकांना प्रदान केले आहेत किंवा कसे, केले असल्यास त्याच्या प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती, तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही

अप्राप्त आहे. ही माहिती त्यांना मिळावी अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपेक्षा व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहितीशी संबंधीत कार्यवाही त्यांनी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्रामधील सुचनेप्रमाणे व संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या पत्रामध्ये दिलेल्या सुचनेस अनुसरुन केली असून दोन्ही संचालकांच्या सुचनांच्या पत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्राबरोबर पाठविल्या आहेत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्रासोबत महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १२ मे २००६ च्या राजपत्राची प्रत, ज्यामध्ये "क" संवर्गातील कर्मचा-यांच्या बदल्यांचे अधिकार विभाग प्रमुखांना दिले आहेत, अपिलार्थीस पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते, तथापि अपिलार्थी यांचे मत असे आहे की, उप संचालक हे विभाग प्रमुख नसल्याने अथवा त्यांना संचालकांनी बदली करण्याचे अथवा समायोजन करण्याचे कोणतेही अधिकार त्यांना दिले नसतांना उप संचालकांनी बदली व समायोजनाची कारवाई केली आहे. येथे असे दिसून येते की, उप संचालकांनी संचालकांच्या ज्या लेखी सूचनेवरुन ही कारवाई केली होती त्या कागदपत्राच्या प्रती अपिलर्थीस विहित मुदतीत पुरविल्या आहेत. ही संचालकांची कृती कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर हे ठरविण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नाही. अपिलार्थीस निश्चित निर्णय हवा असेल तर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांकडे त्यांनी यासंदर्भात तक्रार करणे उचित ठरेल, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे

विचाराधीन अपील वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वरलाल गुलाबराव घोरपडे, लघुलेखन निदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींची, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९१

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. राम मनोहर घमाट, अपिलार्थी
रा. नागझरी (नवि), पोस्ट रेवकीदेवकी,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागझरी,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गेवराई, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-११-२००७ रोजी पाठविलेली माहिती अपूर्ण होती. या माहितीमध्ये सन २००४-२००५ ते २००५-०६ या कालावधीमधील ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिल्या नाहीत. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण म्हणजे गोदावरी नदीस आलेला महापूर

असे जन माहिती अधिकारी यांनी दर्शविले आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे खोटे असून महापूर येण्यापूर्वीच त्यांनी संबंधीत अभिलेखे गावातील सरपंच यांच्या ऊंचावरील घरी ठेवले होते. केवळ अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही म्हणून, संबंधीत ग्रामसेवक व सरपंच यांनी माहिती दिल्यास भ्रष्टाचार उघड होण्याच्या भीतीने, एका बादलीत पाणी टाकून त्यामध्ये अभिलेखे भिजविले व अभिलेखे भिजल्याचा खोटा पंचनामा केला. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये तीन वर्षापुर्वीच्या घरकुलांची यादी व सुरुवातीपासूनची यादी दिली नसल्याने त्यांना हे अपील करावे लागले आहे. त्यांना आजही गेल्या तीन वर्षातील झालेल्या ग्रामसभेच्या इतिवृत्ताच्या प्रती व घरकुलाची यादी या माहितीची आवश्यकता आहे. अपिलार्थीच्या या अभिप्रायाबरोबर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये अंतिमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर शास्तीची कारवाई करण्यात यावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या माहितीबरोबर जलस्वराज योजनेच्या परिक्षण अहवालासंदर्भात एकूण पाच मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर पत्र स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिला. याबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने पत्र स्वीकारण्यास नकार दिल्याबाबतचा पंचनामा अभिलेख्यावर उपलब्ध करुन ठेवल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०७-११-२००७ रोजी सुनावणी घेतली व या सुनावणी संदर्भातील निर्णय

दिनांक १३-११-२००७ रोजी पारित केला. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास माहिती देण्यासाठी ३० दिवसांचा विलंब लागल्याने विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे जन माहिती अधिका-यास ७५०० रुपये इतकी शास्ती लावण्याची शिफारस राज्य माहिती आयोगास केली.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना गेल्या तीन वर्षातील झालेल्या ग्रामसभेतील प्रोसिडींगच्या प्रती मिळाल्या नाहीत. योजना सुरु झाल्यापासून ते अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यापर्यंतच्या कालावधीतील घरकूल योजनेतील लाभार्थ्यांची यादी त्यांना प्राप्त झाली नाही, या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती माहिती त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यानंतर लागलीच पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीशी संबंधीत माहिती हवी आहे, याचा उल्लेख केलेला नाही. माहितीशी संबंधीत कालावधी म्हणून "कालावधी एक महिना" असे नमूद केले आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीस मोघम स्वरुप प्राप्त होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या प्रती पंचायत समिती कार्यालयात उपलब्ध आहेत असे जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले. तसेच अपिलार्थीस अपेक्षित असलेली घरकुल लाभार्थ्यांची यादी, घरकुल लाभार्थ्यांची सुरुवातीपासूनची यादी पंचायत समिती कार्यालयात उपलब्ध असल्याचे देखिल त्यांनी आयोगास सांगितले. पंचायत समिती कार्यालयात माहिती उपलब्ध आहे हे जन माहिती अधिकारी यांना माहीत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपुरी नव्हती, भिजली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथित भिजलेली माहिती दाखविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जरी भिजली होती तरी ही माहिती ज्या

प्राधिकरणाकडून सहजपणे उपलब्ध होऊ शकेल अशा प्राधिकरणाकडे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत विचारणा केल्याचे अथवा अपिलार्थीचा अर्ज संबंधितांकडे पाठविल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठीच्या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रयत्न केला असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या या दोन मुद्दयांवरील माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकतील, असे आयोगास सांगितले. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने व विशेषतः अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे न आढळल्याने त्यांना आता ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंचायत समितीच्या कार्यालयामधून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच २० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी हे या मुदतीत अपिलार्थीस माहिती देतील याची दक्षता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई यांनी घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना एकूण ७५०० रुपये इतकी शास्ती लावण्याची आयोगास त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये शिफारस केली होती. ही शिफारस करतांना त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१०-२००७ रोजी पाठविलेल्या पत्राचा आधार घेतला आहे, तथापि सदर पत्र जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अभिलेख्यावर आढळून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ते शुल्क भरण्याची सूचना देणारे पत्र पाठविले होते तथापि सदर पत्र अपिलार्थीने न स्वीकारल्याबद्दल आवश्यक त्या पंचनाम्याची प्रत आयोगाससमोर सादर केली आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा पुरावा ग्राह्य मानण्यात येत आहे व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत प्रतिसाद दिल्याचे अनुमान काढून या मुद्दयावर जन

अपिलीय अधिकारी यांची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची शिफारस आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी हे या मुदतीत अपिलार्थीस माहिती देतील याची दक्षता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, जिल्हा बीड यांनी घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राम मनोहर घमाट, रा. नागझरी (नवि), पोस्ट रेवकीदेवकी, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नागझरी, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९२

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. ठकाराम जनार्धन सुरासे, अपिलार्थी
रा. तलवाडा, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, तलवाडा,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असतांना पैसे भरण्याची सूचना केली, असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तलवाडा ग्रामपंचायतीच्या जलस्वराज्य योजनेशी संबंधीत काही माहिती मागितली होती. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन त्यांचा दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या यादीमधील क्रमांक ११७६ असल्याचे त्यांनी या पृष्ट्यर्थ नमूद केले आहे. तसेच यासोबत त्यांनी त्यांच्याकडील रेशनकार्ड क्रमांक ४४७७ ची झेरॉक्स प्रत सादर केली असून या रेशनकार्डाच्या प्रतीवर तहसीलदार, गेवराई यांचा 'दारिद्र्यरेषेखालील योजनेस तुर्त पात्र' असा शिक्का उमटविला आहे. अपिलार्थीच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २८८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तसेच अपिलार्थीस दारिद्ररेषा कुटूंबगणना १९९७-९८ च्या यादीमध्ये त्यांचे नाव दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीमध्ये समाविष्ट नसल्याचे देखील नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०७-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय दिनांक १३-११-२००७ रोजी पारित केला. या निर्णयाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय न देता अपिलार्थीच्या अपील अर्जावर आपले अभिप्राय व्यक्त केले. यावरुन असे दिसून येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेस पाठिंबा दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहितीची अपेक्षा केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांचा दारिद्र्यरेषेखालील क्रमांक ११७६ असा दर्शविला आहे. यासंदर्भात त्यांनी विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती, गेवराई जे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम प्राधिकरण आहे, यांच्याकडे लेखी विचारणा केली असता त्यांनी असे उत्तर दिले आहे की, मौजे तलवाडा येथील सन २००२ च्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या यादीमध्ये ११७६ हा क्रमांक नाही व अपिलार्थी यांचे नाव दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या यादीमध्ये समाविष्ट नाही. अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द न करु शकल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी विनामूल्य माहिती दिली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे स्वत:ला ज्या पुराव्याआधारे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असे म्हणवून घेत आहेत तो पुरावा म्हणजे तहसीलदार, गेवराई यांनी अपिलार्थीस दिलेली तात्पुरती कौटुंबिक शिधापत्रिका आहे. ही शिधापत्रिका अपिलार्थीस तहसीलदार, गेवराई यांच्याकडून कधी देण्यात आली याबाबत कोणताही तपशील या शिधापत्रिकेवर नमूद केलेला नाही. तसेच या शिधापत्रिकेवर तहसीलदार, गेवराई यांनी उमटविलेल्या शिक्क्यावरुन त्यांनी "अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील योजनेस तूर्त पात्र" असे अभिप्राय दिले आहेत. थोडक्यात अपिलार्थीचा दावा ज्या कथित पुराव्यावर आहे तो पुरावा तात्पुरत्या स्वरुपातील असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा त्यांचा मूळ अर्ज दिनांक १२-०७-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे. अपिलार्थीने अर्ज करतेवेळी अपिलार्थीचे नांव दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या यादीत नसल्याचे व तसा अभिप्राय असे प्रमाणपत्र देण्यासाठी सक्षम प्राधिकरणाने दिल्याचे, गट विकास अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. परिणामी अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करताना अर्जासोबत जोडलेले त्यांचे, दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र पूर्णत: अवैध ठरत आहे. हे पाहता व अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या युक्तिवादापृष्ट्यर्थ सादर केलेल्या पुराव्याचे तात्पुरते स्वरुप पाहता, आता अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती

प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी सूचित करतील त्याप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे. सदर शुल्काचा भरणा केल्यास जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस माहिती न मिळण्यासाठी ते या प्रकरणी स्वत: जबाबदार ठरत आहेत. कारण त्यांनी आवश्यक तो वैध पुरावा जो माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या प्रथम अर्जाबरोबर जोडणे आवश्यक आहे, तो जोडला नाही व जोडलेला पुरावा अवैध आहे. या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ठकाराम जनार्धन सुरासे, रा. तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९३

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. ठकाराम जनार्धन सुरासे, अपिलार्थी
रा. तलवाडा, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पोलीस स्टेशन कार्यालय, तलवाडा, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर पोलीस अधीक्षक, बीड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली व चूक दुरुस्तीचे गुन्हे दाखल केल्याची माहिती दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये पोलीस स्टेशन कार्यालय तलवाडा तालुका गेवराई यांच्याकडे जनार्धन तुकाराम सुरासे यांच्या तक्रारीसंदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या अर्जास पोलीस स्टेशन तलवाडा येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार पोलीस उपविभागीय अधिकारी, गेवराई यांच्याकडे प्रथम अपील दाखल करण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असता उपविभागीय पोलीस अधिका-याचे वाचक श्री. कोल्हे व त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीचे अपील स्वीकारण्याचे नाकारले व त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीस न येण्याचा सल्ला दिला. याचवेळी त्यांनी श्री. नागरगोजे (बक्कल नं. २५) यांच्याशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधला व त्यानंतर अपिलार्थीचा अपील अर्ज नाकारला अशी तक्रार अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या पत्राव्दारे केली आहे. ही तक्रार त्यांनी आयोगास स्वतंत्रपणे न पाठविता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रस्तावित केलेल्या प्रथम अपील अर्जासोबत पाठविली आहे. अपिलार्थीने त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत कथित प्रथम अपील मूळ स्वरुपात आयोगाकडे सादर केले असून सदर अपील त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांना उद्देशून केल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड हे या प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी आहेत असे आयोगास सांगितले. या प्रकरणी मूळात अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी स्वीकारल्याचे आढळून येत नाही. मात्र हे अपील स्वीकारण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयातील काही कर्मचा-यांनी अपील सादर करण्यापासून परावृत्त केल्याचे

दिसून येते. संबंधीत कर्मचा-यांचे हे कथित वर्तन निश्चितपणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. त्यांना इतःपर अधिनियमातील तरतुदी विसंगत वर्तन न करण्याच्या सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी द्याव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश याच कालावधीमध्ये पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९                              राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ठकाराम जनार्धन सुरासे, रा. तलवाडा, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९४

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गोविंद कोंडीराम शिरगुळे,<br>रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना,<br>तालुका जिल्हा जालना | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तथा मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, जालना | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती नगरपरिषद, जालना यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांना केवळ नगरपरिषदेमध्ये कर्मचारी भरती प्रकरणी मोठ्या प्रमाणात झालेला भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये या उद्देशाने शासनाची व राज्य माहिती आयुक्तांची दिशाभूल करण्याचे षडयंत्र आहे. त्यांना माहिती देण्यास व आयोगाचा वेळ घालविण्यास नगरपरिषद जालना हे जबाबदार आहेत, त्यांचे या प्रकरणी असे अभिप्राय देऊन या अपिलामध्ये मागणी केलेली माहितीची मागणी अपिलार्थीने कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८० ते १९९७, १९६० ते १९८५ व १९८० ते १९९९ या तीन वेगवेगळ्या कालावधीशी संबंधीत तीन मुद्दयाव्दारे माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दत्तक पत्राआधारे नगरपरिषद जालना यांनी नियुक्त केलेल्या सफाई कर्मचा-यांची यादी, कार्यरत दत्तक पत्राआधारे कर्मचा-याचे दत्तक जाणारा व दत्तक घेणा-याची यादी व दत्तकपत्र, जन्म दाखला, जात प्रमाणपत्र, सेवापट, १९६० साली नगरपरिषद, जालना येथे स्त्री/पुरुष सफाई कामगारांना निवृत्त करण्यात आले त्यांचे रिक्त पदावर नियुक्त केलेल्या वारसांची टी. सी., सेवानिवृत्त कर्मचा-यांची सेवापट व त्यांच्या संचिकेतील कार्यालयीन तजवीजीसह कागदपत्रांच्या नक्कला. वैद्यकीय प्रमाणपत्राआधारे जालना नगरपरिषदेमधील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र व त्यांच्या रिक्त पदावर नियुक्त करण्यात आलेल्यांची टी. सी., सेवापट - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती संकलीत करणे कठीण आहे, त्यामुळे अपिलार्थीने नगरपरिषद कार्यालयात येऊन त्यांना आवश्यक असलेल्या संचिकामधून हव्या असलेल्या कागदपत्रांची मागणी केल्यास अपिलार्थीस कागदपत्रे पुरविण्याचे आश्वासीत केले. याच विषयावर त्यांनी दिनांक २९-११-२००७

रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस परत त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत अभिलेखे त्यांच्या कार्यालयात येऊन तपासणीची सूचना केली. अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्राची प्रत त्यांनी आस्थापना लिपिकास देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या संचिका उपलब्ध करुन देण्याच्या सूचना संबंधितांना केल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ३०-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०१-१२-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहण्यासाठी दिनांक व वेळ निश्चित करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत सर्व संचिका अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांच्या मागणीप्रमाणे देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेली व त्यांच्याकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी तयार करुन ती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस कळविले होते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक ३०-०१-२००९ रोजी दुपारी ०३-०० वाजता आस्थापना विभागात हजर राहून संचिका पाहण्यासाठी व छायांकीत प्रत घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे अपिलार्थी हे जालना नगरपरिषद कार्यालयात दिनांक ३०-०१-२००९ रोजी उपस्थित राहिले असता त्यांना तपासणीसाठी त्यांनी

मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत सर्व अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आले. अपिलार्थीने हे सर्व अभिलेखे तपासून या अभिलेख्यामधून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढून ठेवल्या तथापि या प्रती ताब्यात घेण्यास अपिलार्थीस विनंती केली असता, त्यांनी ही माहिती औरंगाबाद येथे घेतो, असे जन माहिती अधिकारी यांना सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती पाहता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असल्याचे दिसून येते. आज रोजी अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार आहे. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेली व तयार असलेली माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत व्यक्तिशः हस्तांतरीत करुन घ्यावी. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस त्यांचा कोणीही प्रतिनिधी प्राधिकृत करणे त्यांना अनुज्ञेय असणार नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनाही सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तयार असल्याबाबत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच प्रथमतः ७ दिवसाच्या आत लेखी कळवावे व तदनंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी ३० दिवसांच्या कालावधीपर्यंत जतन करुन ठेवावी व अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी स्वतः हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत उपस्थित झाल्यास त्यांना ही माहिती विनामूल्य हस्तांतरीत करावी. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे मोठे असल्याने व मोठ्या कालावधीशी संबंधीत (४७ वर्षापुर्वीची) असल्याने व ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुतः टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद कोंडीराम शिरगुळे, रा. मोरंडी मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४६

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. जि. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जाबरोबर त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जोडला असल्याने अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग नांदेड जिल्हा नांदेड मध्ये कार्यरत असलेले उप अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग कार्यालय यांच्या नावा गावाची माहिती, उप अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) व उपविभागीय कार्यालयाच्या शासकीय माहिती अधिका-याच्या नावा गावाची व पदनामाची उपविभागीय कार्यालयाच्या माहिती अधिका-याचे व प्रथम अपिलीय अधिका-याचे नाव गाव व पदनाम याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे व व्यक्तिशः अशा दोन्ही प्रकारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज विसंगतपणे भरला असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना व्यक्तिशः किंवा टपालाव्दारे यापैकी कशा प्रकारे पाठवावयाची याचा खुलासा अपिलार्थीस मागितला. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन त्यांना त्यांच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पोस्टाव्दारे अपेक्षित असल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३७ इतके कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले तथापि अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र निर्गमित होण्यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-०८-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी

यांच्या सुचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००७ रोजी माहिती पुरविल्याचे आज रोजी आयोगासमोर सांगितले. मात्र त्यांनी या प्रकरणाशी संबंधीत पत्रव्यवहाराचा कोणताही पुरावा (आवक जावक रजिस्टर) आयोगासमोर सादर केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वास्तविक माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ख) मधील तरतुदीप्रमाणे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती, या सदराखाली मोडते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना पोस्टाव्दारे अपेक्षित असल्याचे, दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या पत्राने कळविल्यानंतर, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क तात्काळ कळविणे सहज शक्य होते. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार असतानाही त्यांनी सदर शुल्क अपिलार्थीचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर १८ दिवसांनी कळविले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात या प्रकरणी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास आढळून आले नाही. आज रोजी आयोगास जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांनी अपिलार्थीस खरोखरच दिनांक १६-०८-२००७ रोजी माहिती कळविली किंवा कसे हे सिध्द करण्यासाठी त्यांच्याकडे आवश्यक तो (जावक नोंदवहीचा) पुरावा नाही त्यामुळे आज अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त झाली आहे किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही व त्या मुद्दयावर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये व्दितीय अपील आयोगाकडे सादर करण्याची कारणे या मुद्दयावरील माहिती, अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जामध्ये उपलब्ध नाही त्यामुळे अपिलार्थीने

राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेला अर्ज अपूर्ण ठरत आहे तसेच या अपिलावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली किंवा कसे प्राप्त झाली असल्यास माहितीचा दर्जा याचा कोणताही बोध होत नाही. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरण्यात येत आहे.

वरील सर्व मुद्दे पाहता, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जि. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४७

निर्णय दिनांक ०३-०२-२००९

१ श्री. संजय दत्तात्रय कुलकर्णी, "अनुकूल", क्रांती चौक, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे उपविभाग, उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (ग्रामीण पाणीपुरवठा विभाग), नांदेड — प्रतिवादी

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (पाणीपुरवठा), उपविभाग, उमरी, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०९-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अपिलासंदर्भात उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे, उमरी यांच्याकडून केवळ अहवाल मागविण्याचे काम केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विशेष घटक योजने अंतर्गत - गोरठा तालुका उमरी येथील साठवण टाकीबाबत, पाणीपुरवठ्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दलित वस्तीत जागा असतांना टाकी वाड्यावर बांधण्याचे नेमके कायदेशीर कारण काय ? आ. श्री. गोरठेकर यांनी त्या जागेचे दानपत्र दिले आहे काय ? व टाकीतील पाणी दलितांना किती व वाड्यावर किती प्रमाणात वापरण्यात येते ? - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राने प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय दिला नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अपिलासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीने त्यांच्याकडील केलेल्या अपील प्रकरणी संबंधीत उप अभियंत्याकडून परिपूर्ण अहवाल मागितला असल्याचे व अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती कळविण्यात येईल, असे कळविले. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असेही म्हटले आहे की, या कारवाईस १५ ते २० दिवसांचा कालावधी लागणार आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्देशित केलेला कालावधी संपून गेल्यानंतर अपिलार्थीने दिनांक ०८-०८-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी

यांना त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जासंदर्भात दिनांक ३०-०७-२००७ रोजी मुदत संपल्याबाबत स्मरणपत्र दिले. तथापि एवढे होऊनही अपिलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राने पूर्ण माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली सदरची कथित माहिती पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस सुसंगतपणे न देता अपिलार्थीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक २ व्दारे श्री. गोरठेकर यांनी जागेचे रजिस्टर्ड दानपत्र दिले आहे काय, यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देतांना जागेच्या मालकाने बांधकाम करतांना अथवा योजना कार्यान्वित करतांना कोठल्याही प्रकारचा अडथळा आणला नाही, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली तर अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे टाकीतील पाणी दलितांना व वाड्यावर किती प्रमाणात वापरण्यात येते, ही माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या म्हणण्यावरुन त्यांना टाकीतील एकूण पाण्यापैकी दलितांना व वाड्यावर पुरविण्यात येत असलेल्या पाण्याचे परिमाण हवे असल्याचे दिसून येते, तथापि या योजनेमध्ये कोठल्या प्रकारचे मीटर न लावल्याने वाड्यावर व दलितांना पुरविण्यात येणा-या पाण्याचे निश्चित प्रमाण जन माहिती अधिकारी यांना देता येणे शक्य नव्हते. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती देतांना त्यांनी ही बाब त्यांच्या दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्रामध्ये नमूद करणे त्यांना भाग होते. अपिलार्थीस माहिती देण्याचा सकारात्मक प्रयत्न म्हणून या वाड्यामध्ये व दलित वस्तीमध्ये दिलेल्या एकूण नळ जोडणीची विगतवारी जरी त्यांनी अपिलार्थीस दिली असती तरी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली असती, तथापि यासंदर्भात उत्तर देतांना जन माहिती अधिकारी यांनी "सदर योजनेतील टाकीव्दारे दलित वस्तीस पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या व सदर योजना चाचणी घेऊन ग्रामपंचायत,

गोरठा यांना हस्तांतरीत करण्यात आली आहे" असे मोघम उत्तर देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली कोणतीही माहिती कोणत्याही प्रकारे प्राप्त होऊ शकणार नाही, अशा स्वरुपात अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी गोरठा येथील पाणीपुरवठा योजनेच्या एकूण १३ नळजोडण्या दिल्या असून ३ नळ जोडण्या सार्वजनिक स्टॅण्ड पोस्टला दिल्या असल्याचे व १० नळ जोडण्या दलित वस्तीमध्ये व्यक्तिगत दिल्या असल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले. या योजनेंतर्गत कथित वाड्यामध्ये एकही जोडणी दिली नसल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले. त्यांनी हीच माहिती जर अपिलार्थीस दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिली असती तर अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती वेळेत मिळू शकली असती. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत माहिती दिली नसल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब सचिव (ग्रामविकास विभाग) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने उपस्थित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (ग्रामविकास विभाग) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय दत्तात्रय कुलकर्णी, अनुकूल, क्रांती चौक, उमरी, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (पाणीपुरवठा), उपविभाग उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (ग्रामीण पाणीपुरवठा विभाग), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (ग्रामविकास विभाग) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२८
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दे. म. अकोलकर,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>जकात अधीक्षक,<br>महानगरपालिका,मध्यवर्ती जकात नाका,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (म),<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.११.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. १३.८.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २६.१०.२००७ रोजीच्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची विनंती केली असता, त्यांनी आपल्या अपील निर्णयाचे पुनर्विलोकन केले नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.१०.२००७ रोजी दिलेली माहिती अपूर्ण स्वरुपात आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १३.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आकारल्या जाणाऱ्या जकात आकारणीसंबंधी एकूण ३ मुद्यांद्वारे काही मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती मध्ये- -" घरगुती सामानावर जकात कर लागू आहे काय, घरगुती सामानात इलेक्ट्रॉनिक साधने गृहित धरल्या जात नाहीत काय, जकात कर्मचाऱ्यांने चुकीने जकात घेतली वा अन्य वाममार्गाचा अवलंब केल्यास त्यांची तक्रार कुणाकडे करावी व त्या यंत्रणेचा संपूर्ण पत्त्यासह तपशील "- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१०.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर वरील घटनाक्रम व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जकात आकारणीसंदर्भात त्यांच्याकडे शंका उपस्थित करुन माहिती विचारलेली आहे. अपिलार्थीच्या दि. १३.८.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस दि. १२.९.२००७ रोजी अगर तत्पूर्वी त्यांचा निर्णय कळविणे भाग होते, तथापि अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी , "अपिलार्थीने शहरात अशाप्रकारचे सामान आणले होते काय याचा तक्रारीवरुन बोध होत नाही" या मुद्यावर अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी

यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना मूळात अपिलार्थीस त्यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला होता किंवा कसे, अपिलार्थीच्या मूळ अजा्रतील माहिती जर प्रश्नार्थक स्वरुपातील असल्यामुळे त्यांना नाकारावयाची होती तर, त्यांनी त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कळविणे भाग होते, तथापि त्यांनीही अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २३.१०.२००७ रोजीच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.१०.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिली आहे. मात्र यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात अपिलार्थीस कोणतीही माहिती त्यांनी पुरविली नसल्याचे दिसून येते. थोडक्यात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती पुरविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी केलेल्या अर्जास अशाप्रकारचा प्रतिसाद देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या प्रश्नांना उत्तरे देण्याऐवजी अपिलार्थीच्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या ज्या माहितीमध्ये समाविष्ट आहे, त्या माहितीच्या सत्यप्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दे. म. अकोलकर, ३३(अ), रेणुका छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जकात अधीक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (म), महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२९
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. शशिकांत रामराव पिंपळे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी त्यांच्या दि. २९.६.२००७ रोजीच्या विनंती अर्जानुसार भूसंपादन प्रकरणी संचिका क्र.४२/८१ शी संबंधित माहिती मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे सदर संचिका जिल्हाधिकारी अभिलेख विभागास सापडत नसल्याचे कळविले. तद्नंतर परत दि. १२.९.२००७ रोजी दुसऱ्या पत्राद्वारे मूळ प्रकरण संचिका क्र. ४२/८१ ऐवजी प्रकरण क्र.४२/८३ व ४१/८१ या दोनही संचिका कार्यालयात सापडत नसल्याचे कळविण्यात आले. या संदर्भात त्यांनी अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२८.८.२००७ रोजीच्या अर्जावर चौकशी करण्यात आली नाही, असे नमूद

करुन त्यांचे अपील निकाली काढले.जन माहिती अधिकारी यांनी संचिका क्र.४२/८१ अभिलेख विभागात सापडत नसल्याचे पहिल्यांदा कळविले, चुकीच्या संचिका क्र ४२/८३ व ४१/८१ चा संदर्भ देऊन अर्जदारावर खोटे आरोप करुन माहिती देण्यास टाळाटाळ चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यांच्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौ. मोहरा तालुका कन्नड जि. औरंगाबाद शिवारातील पाझरतलाव क्र. २ शेततळयांचे संपादन केलेले स.नं.९२ च्या भूसंपादन मोबदला वाटपातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली या विषयावरील संचिका क्र. ४२/८१ बाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र. २००६/वि.भू.सं.अ./४१/८१ दि. २८.८.२००६ अनुसार झालेल्या चौकशी प्रकरणाची/अहवालाची साक्षांकित प्रत मिळणे बाबत. "

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.७.२००७ रोजीच्या दि. १३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या संचिका त्यांच्या कार्यालयात सापडत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात संबंधित कागदपत्रांसह दि. ३०.७.२००७ रोजी उपस्थित राहण्याचे कळविले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी परत त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा अर्ज दि. २८.८.२००६ ची चौकशी करण्यात आली नाही, असे अपिलार्थीस कळविले. तथापि मध्यंतरीच्या काळात अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने दि. ३.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलास जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणातील अंतीम सुनावणी दि. १४.९.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २१.९.२००७ रोजी पारित केले. या

आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीचे अपील निकाली काढताना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडे अपील दाखल झाल्यानंतर माहिती दिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती संदर्भात आयोगास पार्श्वभूमीबाबत तपशीलवार माहिती सांगून असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना प्रथमतः दि. १३.७.२००७ व १२.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली असून अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित केलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारीसंदर्भात त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि.१२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २९.६.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये प्रतिसाद दिला असला तरी, हा प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये दिला असला तरी सदर प्रतिसाद सकारात्मक नाही. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जातील माहितीसंदर्भात प्रथमतः दि. १२.९.२००७ रोजी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर माहिती दिल्याचे दिसते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जिल्हाधिकारी यांच्या दि. २८.८.२००६ रोजीच्या पत्रानुसार झालेली चौकशी प्रकरणाची व अहवालाची माहिती त्यांना हवी आहे. अपिलार्थीचे जिल्हाधिकारी यांच्या दि. २८.८.२००६ रोजीचे पत्र पाहता, हे पत्र विशेष भूसंपादन अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले असून या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस दि. ४.९.२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात ११.०० वा.उपस्थित

राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार ते यावेळी विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले व त्यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे विशेष भूसंपादन अधिकारी यांच्या कार्यालयातील भूसंपादन मोबदल्याबाबत केलेल्या तक्रारीसंदर्भातील काही पुरावे सादर केले, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संचिका क्र.४२/८१ हा संदर्भ दिला आहे, त्यामुळे त्यांना या संचिकेतील माहिती हवी आहे, तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ही संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्यादृष्टीने व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अतिरिक्त संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या संदर्भित केलेल्या संचिका पहाणीस्तव  व मूळ अर्जातील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शशीकांत रामराव पिंपळे, रा. २३ मौजे मानकनगर हिंदुराष्ट्र, चौका गारखेडा परिसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३०
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, : अपिलार्थी
रा.बिलोली, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
कृषि कार्यालय,बिलोली,जि.नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः मंडळ कृषि अधिकारी,
कुंडलवाडी, ता.बिलोली जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१०.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांचा या प्रकरणी कोणताच निर्णय दिला नसल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांच्या या अभिप्रायाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०६.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००५ ते २००६ या कालावधीतील मागितलेल्या माहितीमध्ये - राष्ट्रीय

कामासाठी धान्य योजनेअंतर्गत त्यांच्याकडील झालेल्या मौ. बामणी, बहुर, मितकी, मुतनाळ,या गावांमध्ये काम पूर्ण झाले का?, कामाचे प्रत्यक्ष साईट, तसेच अंजनी येथील दगडी बंधारा कामाची प्रत्यक्ष साईट व काम पूर्ण झाल्याचे वरिष्ठांच्या अभिप्रायाची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६.८.२००७ रोजी प्रथम अपील केले तथापि या अपिलावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याहीप्रकारे सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी श्री. आर.पी.देशपांडे नावाचे अधिकारी कृषि अधिकारी तथा जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा मूळ अर्ज याचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६.६.२००७ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.८.२००७ रोजी अनुक्रमे मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज सादर केले आहेत. सदर अर्ज संबंधित कार्यालयास प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांच्या कार्यालयातील लिपीकाने या अर्जावर पोचसही दिलेली आहे, हे पाहता अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज संबंधित कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यांच्या कार्यालयीन कागदपत्रांची पहाणी करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजपावेतो कोणतीही माहिती दिलेली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतलेली नाही.

तसेच या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये "कामाचे प्रत्यक्ष साईट"ही माहिती मागितली आहे. अपिलार्थीस या मुद्याद्वारे नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा बोध, अपिलार्थीच्या आजच्या अनुपस्थितीमुळे होत नाही. त्यामुळे या मुद्यावरील माहिती वगळता, उर्वरित माहिती

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीमध्ये कबूल केल्याप्रमाणे अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांनी तीस दिवसांच्या कालावधी लागेल असे सांगितल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व त्यानुसार अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील २००५ च्या तरतुदींचा त्यांनी आपल्या कृतीद्वारे अनादन स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस, अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी करुनही त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.आयोगास या मुदतीत जन माहिती अधिकारी यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास,हे अंतिम मान्य करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी (श्री. एम.के.अत्तार सध्या जिल्हा वाशिम येथे कार्यरत) यांनी कोणताही निर्णय न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदार व बेपर्वा वृत्ती स्पष्ट केली आहे, याची कृषि आयुक्त, पुणे यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे,साप्ता.प्रवक्ता क्रांती, बिलोली, जि.नांदेड-४३१ ७१०

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३१
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. प्रकाश त्रिंबकराव कुलकर्णी, रा.गंगापूर जि.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१२.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही, या अभिप्रायाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषदेतील वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसंदर्भात दि. जून,२००५ ते मे,२००७ या दोन वर्षाच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली

होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "**जिल्हा परिषदेमधील माध्यमिक शिक्षकांच्या एका पंचायत समितीत दहा वर्ष सेवा पूर्ण झाल्याची वास्तव्य सेवा जेष्ठता यादी, प्रशासकीय कारणावरुन झालेल्या बदल्यांची यादी, तसेच गंगापूर तालुक्यातील या संदर्भात प्रशालेकडून प्राप्त झालेली माहिती**"- या मुद्यांचा समावेश होता. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.७.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७५/- इतके शासकीय कोषागारात चलनाद्वारे जमा करण्याचे सूचित केले व अपिलार्थीस माहिती देऊ केली. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना अद्यापही त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरल्याने अपिलार्थीस माहिती देण्यात आली नाही, अपिलार्थीने मागितलेली माहिती दि.३१.५.२००७ रोजी नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली होती, अपिलार्थी हे स्वत: माध्यमिक शिक्षक असल्याने त्यांना ही बाब माहिती होती. तरी देखील त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा उपयोग करुन माहिती मागितली आहे, याचबरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ही व्यक्तिशः अपेक्षिली होती, तथापि अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित न झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही, असे म्हटले आहे.

वरील घटनाक्रम दोन्ही बाजूनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी अपिलार्थीस दि. १७.७.२००७ रोजी पत्र पाठविल्याचा कोणताही सबळ पुरावा जन

माहिती अधिकारी यांच्याकडून आज रोजी आयोगापुढे सादर करण्यात आलेला नाही. तसेच या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीस पुरविण्यासाठीच्या माहितीपोटीच्या शुल्काचा जो तपशील अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे, असा कोणताही तपशील त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा सबळ पुरावा (जावक नोंदवहीची सत्य झेरॉक्सप्रत) सादर न केल्याने व अधिनियमातील कलम ७(३)(क) चा जन माहिती अधिकारी यांनी शुल्काचा तपशील न कळवून भंग केल्यामुळे त्यांचे दि. १७.७.२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे, परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. ही माहिती अपिलार्थीच्या इतर कोणत्याही अधिकृत वा अनधिकृत प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास हेतुपूर्वक टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमानुसार कारवाईचे कोणतेही आदेश आयोगामार्फत देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित झाल्यापासून त्यांना तीन दिवसांच्या

आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश त्रिंबकराव कुलकर्णी, रा.पंचायत समितीच्या मागे,मु.पो.गंगापूर,जि.औरंगाबाद-४३११०९.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३२
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. प्रकाश त्रिंबकराव कुलकर्णी, रा.गंगापूर जि.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला,गंगापूर, जि.औरंगाबाद. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.१२.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना दि. २७.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय पारित झाला नसल्याचे आयोगाचे निदर्शनास आणले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषदेतील वर्ग-३ कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसंदर्भात दि. १.६.२००६ ते ३१.५.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ५.०७.२००७ रोजीच्या अर्जास दि. १४.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. तथापि त्यांचे हे पत्र अपिलार्थीने स्वीकारले नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तद्नंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.८.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपिलावर, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी या संदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे दि. २७.८.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली. त्यास अनुसरुन जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. २७.०८.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२७.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व

संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-०२-२००९** **राज्य माहिति आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रकाश त्रिंबकराव कुलकर्णी, रा.पंचायत समितीच्या मागे,मु.पो.गंगापूर,जि.औरंगाबाद-४३११०९.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला,गंगापूर जि.ओरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३३
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती अखिला बानो,<br>रा. औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>तलत ऊर्दू माध्यमिक शाळा,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,तलत ऊर्दू शिक्षण मंडळ,<br>औरंगाबाद. | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवाविषयकबाबीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९९९ ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये दि.२२.१०.२००७ रोजी सचिव, तलत शिक्षण मंडळ,औरंगाबाद यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे प्रथम अपील पाठविले. याबाबत योग्य तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्याचे सिध्द होत आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकःसंकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्रं. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याचे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत सुनावणी होणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या सचिव, तलत शिक्षण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास, हे आदेश निर्गमित झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, त्या राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांच्या दि.२२.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती अखिला बानो मो. मुसा, घ.नं.१-१७-९८, नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफीससमोर,जुना बाजार,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, तलत ऊर्दू माध्यमिक शाळा,बारुदगरनाला, ओरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थी यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह,या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३४
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. पी. एस.घाडगे, : अपिलार्थी
रा. परळी वैजनाथ, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड.
जन अपिलीय अधिकारीः शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड.
त्रयस्थ पक्षः श्री.गिरवलकर,श्री.बागल व श्री. जाधव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.११.२००७ रोजी नोंदविलेले झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झ ाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने राज्य माहिती आयोगाकडे केल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे परळी वै.जि.बीड येथील श्री. विरभद्रेश्वर शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळेसंदर्भात सन २००५-२००७ या कालावधीतील एकूण २७ मुद्यांद्वारे माहिती विचारली होती. अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उद्देशून दि. १५.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी त्यांच्याकडील दि. २०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. मात्र अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन आपले निर्णय दिले नाहीत, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, माहितीमधील त्रयस्थ पक्षाचा समावेश व माहितीची व्याप्ती पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत सुनावणी होणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बीड यांना असे आदेशित करण्यात येत की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास, हे आदेश निर्गमित झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, त्या राज्य माहिती आयोगाकडे, अधिनियमातील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या दि.१५.०६.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रल्हाद शामराव घाडगे, द्वारा लोकमान्य नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, परळी वैजनाथ, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३५
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा गट प्रमुख जलस्वराज्य प्रकल्प, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही आवश्यकता नसताना, त्यांनी ज्या ग्रामपंचायतीशी संबंधित माहिती मागितली होती, तेथील ग्रामसेवकांची मदत घेतली. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवकांचे अपिलीय अधिकारी गट विकास अधिकारी हे आहेत, त्यामुळे त्यांचेशी संपर्क साधावा, असे चुकीचे आदेश केले असल्याने अपिलार्थीस विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर करणे भाग पडले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, ज्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली आहे किंवा माहिती दिली नाही, अशा सर्व जन

माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी व त्यांना अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ८.१०.२००७ रोजी निकाल देताना जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी अपील विहित मुदतीत निकाली काढण्याचे कळविले आहे, हे आदेश चुकीचे असल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर देखील शिस्तभंगाची कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व दि. १.१२.२००५ ते १६.८.२००७ या कालावधीतील वेगवेगळया ग्रामपंचायतीकडून पार पडत असलेल्या जलस्वराज्य योजनेसंदर्भात एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- -" **जलस्वराज्य कार्यालयाने प्रथम निवडलेल्या टी.एस.पी.(तांत्रिक सेवा पुरवठादार) चे नाव, निवडीबद्दलचा ग्राम सभेचा ठराव, करारनाम्याची प्रत, सर्व गावांना देण्यात आलेल्या मोजमापपुस्तिकेचे क्रमांक व दिनांक, आराखडा मंजूर केल्याचे पत्र, टी.एस.पी.बदलली असल्यास नव्या टी.एस.पी.चे नाव, नेमणूकीचा दिनांक व ग्रामपंचायत ठरावाच्या प्रती व वडवणी गावाच्या जलस्वराज्य प्रकल्पातील कामांच्या मोजमापपुस्तिकेची प्रत** "- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या मूळ माहितीचा हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्रामपंचायतीशी संबंधित असल्याने व या ग्रामपंचायतीतील ग्रामसेवक हे जन माहिती अधिकारी असल्याने अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांच्याकडील दि. १८.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे ग्रामसेवकाकडे हस्तांतरित केला व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचे त्यांना सूचित केले.त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या दि. १८.८.२००७ रोजीच्या या पत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस व सर्व तांत्रिक सेवा पुरवठादार यांना देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पाठविण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीने समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ०१.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये

त्यांनी काही ग्रामसेवकांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन याबाबतच्या अभिप्रायाप्रित्यर्थ सविस्तर विवेचन केले आहे.अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर तारखेचा कोणताही उल्लेख नाही. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सूचित केलेल्या काही ग्रामसेवकांकडून अद्यापही माहिती येणे बाकी आहे. निश्चित कोणत्या ग्रामपंचायतीकडून त्यांना माहिती येणे बाकी आहे, याचा खुलासा अपिलार्थी हे आयोगासमोर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे परळी तालुक्यातील ९ ग्रामपंचायती, धारुर तालुक्यातील १ ग्रामपंचायत व वडवणी तालुक्यातील १ ग्रामपंचायत व १० तांडे यांच्यासंदर्भात जलस्वराज्य प्रकल्प योजनेविषयी एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जलस्वराज्य प्रकल्प जिल्हा परिषदेकडून कशाप्रकारे चालविला जातो, हे आयोगास अवगत केले. प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मधील प्रथम निवडलेल्या टी.एस.पी.चे नाव, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. निवडीबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव व करारनाम्याची प्रत ही माहिती संबंधित ग्रामपंचायत व पाणीपुरवठा समितीच्या अध्यक्षांकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने मुद्दा क्र. २ मध्ये गावांना देण्यात आलेल्या मोजमापपुस्तिका, ही माहिती, मोजमापपुस्तिका या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडून ग्रामपंचायतीकडे दिल्या गेल्या आहेत, त्यांच्याकडे ही माहिती उपलब्ध असणे अपेक्षित आहे. परंतु या प्रकरणी असे दिसून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे प्रत्यक्षात उपलब्ध (कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा जि.प.बीड)आहे, त्यांच्याकडे पाठविलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील आराखडा मंजूर केल्याची प्रत, या मुद्याबाबत अपिलार्थी यांनी असे अवगत केले की, जलस्वराज्य प्रकल्पाचे आराखडे संबंधित कार्यकारी अभियंता, हे मंजूर करीत असतात. आराखडे मंजूरीचे पत्र अद्यापही ३ ग्रामपंचायतीकडून अपिलार्थीस मिळणे बाकी आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती संबंधित पाणीपुरवठा समितीचे सचिव तथा ग्रामसेवक यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले, हे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ वगळता उर्वरित माहिती अपूर्णरित्या अपिलार्थीस प्राप्त झ ालेली आहे. अपिलार्थी यांच्या विधानांचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थी, आज सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांना निश्चित कोणत्या ग्रामपंचायतीकडून अथवा कोणत्या यंत्रणेकडून माहिती येणे बाकी आहे, हे आयोगास स्पष्ट करु न शकल्यामुळे तसेच अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्देनिहाय माहितीचा परामर्ष जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील या संदर्भातील प्रथम अपिलावरील दि. ३०.१०.२००७ रोजीच्या सुनावणीच्या वेळी घेतला असल्याचे दिसून येते. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी गट प्रमुख तथा उप मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच, त्यांना आता त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित जी माहिती येणे बाकी आहे निश्चितपणे कोणती माहिती, कोणत्या ग्रामसेवकाकडून अथवा कोणत्या यंत्रणेकडून येणे बाकी आहे, याची माहिती प्रथमतः सात दिवसांच्या आत सादर करावी व गट प्रमुख तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस अद्यापही ज्या जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित, जी माहिती येणे बाकी आहे, त्याबाबत नमूद तपशील अपिलार्थीकडून वर स्पष्ट केल्याप्रमाणे

माहिती प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी तीस दिवसांच्या आत त्याच्याशी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ८.१०.२००७ रोजीच्या निकालाबाबत काही अभिप्राय नोंदविले आहेत व त्याद्वारे जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने संदर्भित केलेले दि. ८.१०.२००७ रोजीचे जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश नसून जिल्हा परिषद, बीडच्या सामान्य प्रशासन विभागाकडून गट विकास अधिकारी यांना त्यांनी दिलेल्या सूचना आहेत व हे पत्र त्यांनी अपिलार्थीस अग्रेषित करुन अपिलार्थीस दिलेल्या सूचना आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाने पत्रव्यवहार करताना प्रशासकीय दृष्टीकोनातून त्यांना आवश्यक वाटल्यास अशाप्रकारच्या सूचना ते देऊ शकतात. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची अधिनियमामध्ये कोणतीही तरतुद नसल्याने,अपिलार्थीने उपस्थित केलेला हा मुद्दा विचारात घेण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास दिसत नाही.

प्रसंगावशात्, आयोगास असे आढळून आले आहे की, आयोगाकडे आता, **शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या जलस्वराज्य योजनेसंदर्भात मोठया संख्येने अपिले प्राप्त होत आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीचे स्वरुप पाहता या योजनेशी संबंधित सर्व माहिती ग्रामीण पाणी पुरवठा समितीकडे उपलब्ध असणे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. या समितीचे अध्यक्षांसह सर्व सदस्य हे खाजगी व्यक्ती असून माहिती अधिकारी अधिनियमातील "सार्वजनिक प्राधिकरण" या शब्दाच्या व्याख्येतील व्याप्तीमध्ये त्यांचा समावेश होत नाही. मात्र या योजनेसंदर्भात माहिती मागणाऱ्या नागरिकांचे प्रमाण बरेच आहे, हे पाहता, या योजनेशी संबंधित संपूर्ण माहिती जिल्हापरिषदेकडील संबंधित ग्रामपंचायतीकडे अथवा दुसऱ्या एखाद्या सक्षम प्राधिकरणाकडे कायमस्वरुपी ठेवण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात व या संदर्भात एखाद्या शासकीय अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केल्यास या योजनेमधील पारदर्शकता जनसामान्याच्या दृष्टोत्पत्तीस येऊन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अधिक प्रभावीपणे**

**अंमलबजावणी होईल, असे आयोगास वाटते. सबब सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) च्या तरतुदीअन्वये असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी वर स्पष्ट केल्याप्रमाणे या विषयावर जन माहिती अधिकारी यांची नेमणूक करण्याची कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा.**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, अद्यापपर्यंत त्यांना अप्राप्त असलेली मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती, निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे गट प्रमुख तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत कळवावी.

३. गट प्रमुख तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीस अप्राप्त असलेली मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून आवश्यक तो तपशील प्राप्त झाल्यानंतर, त्यांना ती तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांनी राज्यातील सर्व जलस्वराज्य प्रकल्पासाठी जन माहिती अधिकारी यांची हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत नेमणूक करण्यासंदर्भात कार्यवाही करुन

५. आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, चंपावती टेक्नीकल कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा.लि. लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट प्रमुख तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३६
निर्णय दिनांक ०४-०२-२००९

१. श्री. दुष्यंतकुमार कल्याणकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मिलेनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट,
मौलाना आझाद एज्यूकेशन ट्रस्ट, औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक
व्यवस्थापन शास्त्र विभाग,
डॉ.रफिक झकेरिया एज्युकेशन ट्रस्ट, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१२.२००७ रोजी दाखल झालेले, द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविली नसल्याचे नमूद केले आहे, तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दि. ११.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्ट या शिक्षण संस्थेच्या 'मिलेनियम इन्स्टिटयुट

ऑफ मॅनेजमेंट' नावाच्या महाविद्यालयामधील शैक्षणिक वर्ष २००६-२००७ या कालावधीतील व्यवस्थापन शास्त्र (एम.बी.ए.) अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सदर संस्थेच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी या संदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाव व त्यासंदर्भातील दि. १३.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कुणीही उपस्थित नाहीत, त्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास नोंदविता येत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १३.११.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१३.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सनुावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दुष्यंतकुमार कल्याणकर, द्वारा हरिश चव्हाण, भाग्यनगर, औरंगाबाद-४३१ ००१

२. जन माहिती अधिकारी तथा मिलेनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट,मौलाना आझाद एज्यूकेशन ट्रस्ट, औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,व्यवस्थापन शास्त्र विभाग, डॉ.रफिक झकेरिया एज्युकेशन ट्रस्ट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३७

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ श्री. प्रमोद देविदास काळे, अपिलार्थी
प्लॉट नं. १३, योगराज कॉर्नर, पुंडलीकनगर रोड,
गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जालना-भाटेपुरी-कवठा-राजणी रस्ता राज्यमार्ग १८१ च्या संदर्भात एकूण चार मुद्याव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **दिनांक २१-०१-१९८९ च्या प्रशासकीय मान्यतेची प्रत, रस्त्याचे बांधकाम झालेले वर्ष, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सदर रस्ता कोणाकडून व कधी हस्तांतरीत झाला व या रस्त्याचा प्रत्यक्ष ताबा कोणत्या विभागाने कोणत्या वर्षी घेतला** - या मुद्द्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी १९७४ पासून पुढचा असा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे, जन माहिती अधिकारी यांना दिनांक २७-११-२००७ रोजी आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती मिळाली नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना, दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात कसोशीने प्रयत्न करुनही उपलब्ध झाली नसल्याचे कळविले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या रस्त्याविषयी माहिती मागितली होती त्या रस्त्याचे बांधकाम करतांना त्यांच्या मालकीची जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाने संपादन केली होती व त्याबद्दल या जमिनीचा मावेजा मिळण्याप्रकरणी त्यांनी मा. उच्च न्यायालयाकडे धाव घेतली असता जून २००८ रोजी त्यांच्या बाजूने निकाल लागला असून मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम

प्रादेशिक विभाग यांनी त्यांच्या जमिनीचा मावेजा त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक २३-०६-२००८ रोजीच्या पत्रान्वये मंजूरही केला आहे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी ज्या मावेजाच्या रकमेची शिफारस केली आहे त्या रकमेबाबत त्यांचा आक्षेप असल्याचे व ही रक्कम त्यांना देय रकमेपेक्षा कमी वाटत असल्याने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. जेणेकरुन या माहितीच्या आधारे ते जादा रकमेचा मावेजा शासनाकडून मागू शकतील.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी कसोशीने प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी वा अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सापडू शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिका-याकडे आणि ज्या विभागातील रस्त्याची माहिती मागितली होती तो दिनांक ०१-०५-१९८१ रोजी झाला आहे. यापूर्वी हा विभाग औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये समाविष्ट होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये असे कळविले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शोधण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. तथापि उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी या रस्त्याची मालकी औरंगाबाद जिल्हा परिषदेकडे पूर्वी होती किंवा कसे, या रस्त्याची माहिती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे किंवा कसे हे समजण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. जर ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज, ही माहिती ज्या विभागाकडे म्हणजे औरंगाबाद जिल्हा परिषद, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे हस्तांतरीत करावयास हवा होता, तथापि अशा प्रकारची कोणतीही कारवाई जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. आज रोजी सुनावणीमध्ये त्यांनी वरील कार्यालयाशी संपर्क देखील साधल्याचे आयोगास आढळून आले नाही. अपिलार्थीच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसाच्या आत प्रतिसाद देणे अनिवार्य असतांना अपिलार्थीस त्यांनी सदर प्रतिसाद दिनांक १२-१२-२००७ रोजी म्हणजे अनुज्ञेय कालावधीपेक्षा सुमारे पावणे दोन महिने इतक्या विलंबाने दिला आहे, जो काही प्रतिसाद दिला आहे तो देखील नकारात्मक स्वरुपाचा आहे. अपिलार्थीने मा. उच्च न्यायालयात कागदपत्रे दाखल करतांना, त्यांनी नेमकी कोणती कागदपत्रे मा. उच्च न्यायालयात दाखल केली हे देखील जन माहिती अधिकारी यांनी पाहिले नसल्याचे दिसून येते. यावरुन कदाचित त्यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध लागू शकला असता व ही माहिती निश्चित कोणत्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे हे त्यांना कळू शकले असते. तथापि अपिलार्थीच्या अर्जास विलंबाने व नकारात्मक प्रतिसाद देण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या उदासीन वृत्तीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे दिसून येत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी हरत-हेने प्रयत्न करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा असमर्थनीय विलंब लावल्याने, ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कर्मचा-याने जतन करुन ठेवणे कार्यालयीन पध्दतीनुसार आवश्यक आहे त्या कर्मचा-यांवर संदर्भीय माहितीशी संबंधीत अभिलेखे गहाळ करण्यासाठी आवश्यकतेनुसार शिस्तभंगविषयक अथवा फौजदारी कारवाई करावी असे जन अपिलीय अधिकारी यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रमोद देविदास काळे, प्लॉट नं. १३, योगराज कॉर्नर, पुंडलीकनगर रोड, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३८

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ श्री. अब्दुल रऊफ म. युसूफ, अपिलार्थी
व्दारा - डॉ. बी. एस. पगारे कॉम्प्लेक्स,
बसस्टॅण्ड समोर, भोकरदन, तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,
तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांनी या विषयासंदर्भात केलेल्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या अपील अर्जावर

त्यांनी कोणताही निर्णय दिला नाही व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजपर्यंत माहिती न दिल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील रो. ह. यो., जलसंधारण योजनेअंतर्गत सन २००५ ते २००७ या आर्थिक वर्षामध्ये केल्या गेलेल्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६ इतके अपिलार्थीस शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा अपिलार्थीने शासकीय उप कोषागार, जाफ्राबाद येथे दिनांक २१-०८-२००७ रोजी भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक २४-०८-२००७ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पुरविली. अपिलार्थीस ही माहिती पुरविल्याचा जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती मिळाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबद्दल युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीसाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच माहितीच्या दर्जासंबंधी त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील कोणत्याही प्रकारचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती माहिती विहित मुदतीत पुरविल्याचा निष्कर्ष काढून व त्यामुळे आता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर निर्णय घेण्यासाठी कोणतेही प्रयोजन न उरल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल रऊफ युसूफ, व्दारा - डॉ. बी. एस. पगारे कॉम्प्लेक्स, बसस्टॅण्ड समोर, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३९

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ सौ. भारती अनंतराव स्वामी, अपिलार्थी
ब्राम्हण गल्ली, पेठ दरवाजा, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, जळकोट,
तालुका जळकोट, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, जळकोट,
तालुका जळकोट, जिल्हा लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जळकोट, तालुका जळकोट, जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या अपील अर्जाचा आजतागायत कोणताही विचार केला नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६ ते २००८ या वर्षातील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे आदेश जारी केले नाहीत अथवा अपिलार्थीशी या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दाखविला असता, सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही, असे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले. याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अपील दाखल केल्यासंदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा उपलब्ध आहे काय अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी याबाबतचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे आज उपलब्ध नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज प्राप्त झाला नाही व सदर अर्ज, संबंधितांकडे सादर केल्याचा कोणताही पुरावा अपिलार्थी यांच्याकडे नाही हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जर या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार परत नव्याने अर्ज करावा व हा

अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केल्याबद्दलची पोच, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. भारती अनंतराव स्वामी, ब्राम्हण गल्ली, पेठ दरवाजा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जळकोट, तालुका जळकोट, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जळकोट, तालुका जळकोट, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४०

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, अपिलार्थी
मु. पो. मंगरुळ नं. १, तालुका माजलगाव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात पूर्ण माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या आदेशामध्ये नमूद करुनही त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५ व ६ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झाली नाही. त्यामुळे प्रथमतः

त्यांना ही माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत ०१ जानेवारी २००६ ते १९-०९-२००७ या कालावधीतील एकूण सहा मुद्दयांवरील माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५ व ६ शी संबंधीत माहिती ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मुद्दा क्रमांक ३, ५ व ६ शी संबंधीत माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली. तथापि अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला युक्तिवाद लेखी पत्राव्दारे सादर करुन त्यांचा प्रथम अपीलमेमो विचारात घेऊन गुणवत्तेवर अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-१२-२००७ रोजी, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ५ व ६ शी संबंधीत पूर्ण माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या पत्रामध्ये मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधीत माहिती दिलेली नाही. मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस सुरुवातीस दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ३ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील तहसीलदारांनी घेतलेल्या भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या बैठकांचे दिनांक व संख्या ही माहिती अपेक्षिली होती व मुद्दा क्रमाक ५ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या इनामी जमिनींची, गावाचे नांव, गट नंबर, सर्व्हे नंबर व क्षेत्रफळ याची माहिती मागितली होती. आज रोजी सुनावणीच्या वेळी महसूल विभागातील कार्यपध्दती समजून घेतली असता जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असे सांगण्यात आले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती संबंधीत तालुक्याच्या तहसीलदारांकडे उपलब्ध असते. या माहितीचे संकलन उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात केले जात नाही. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संबंधीत तहसीलदारांशी संपर्क साधण्याचे सूचित केले. मुद्दा क्रमांक ३ च्या बाबत विचारणा केली असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, भ्रष्टाचार निर्मुलन समितीची कागदपत्रे तहसीलदार पातळीवर, ते या समितीचे सचिव असल्याने, त्यांच्याकडे संकलीत केली जातात. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी याही माहितीसंदर्भात संबंधीत तहसीलदाराकडे संपर्क साधण्याचे सूचित केले आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर संबंधीत प्राधिकरणाकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अर्जदाराच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधीत प्राधिकरणाकडे पाठवून त्याची प्रत अर्जदारास लेखी पत्राव्दारे देणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ च्या संदर्भात संबंधीत तहसीलदारांशी संपर्क साधण्याचे सूचित करण्याची, कृती, ही या प्रसंगी गैरलागू ठरते. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रती सर्व तहसीलदारांना पाठवून या पत्राच्या प्रती अपिलार्थीस या

प्रकरणी देणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीस परस्पर संबंधीत तहसीलदारांशी संपर्क साधण्याचे सूचित केले. इत:पर अशा प्रकारची अनियमितता उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या महितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. तथापि ही माहिती अद्यापपावेतो अपिलार्थीस मिळाली नसल्याचे, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे, त्यांच्या दिनांक ०३-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, कळविल्यावरुन दिसून येते. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधीत माहिती निश्चितपणे मिळण्यासाठी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी, असे त्यांना येथे आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत दिलेला प्रतिसाद पाहता, अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती हेतुत: दडवून ठेवल्याचे अथवा कोणत्याही असद्‌हेतुने माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ५ संदर्भात त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जी कारवाई करणे अपेक्षित आहे, त्याप्रमाणे त्यांनी ती केली नाही. एवढे मात्र याठिकाणी निश्चितपणे सिध्द होत आहे. त्यांच्या हातून घडलेल्या अशा प्रकारच्या अनियमितते-बाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ५ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु. पो. मंगरुळ नं. १, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४१

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत,<br>जेल कॉर्नर, साईबाबा मंदिरासमोर, अंबाजोगाई,<br>जिल्हा बीड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा. प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी श्रीमती चेतना केरुरे यांनी, त्यांच्या अर्जाची योग्य दखल न घेता, मुदतीत संपूर्ण माहिती न पुरविणे, अधिकार नसलेल्या अधिक्षकाकडे दस्ताऐवज स्वाधिन करणे, त्यांच्या हुद्दयावर सह्यांचे व्यवहार करणे, त्यांच्या कार्यालयीन कामकाजामध्ये अनियमितता घडविणे, प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी दोषी ठरविल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या (१) च्या पोटनियमानुसार अर्ज दिल्यापासून (८५ दिवसाचे) जास्तीत जास्त २५००० रुपये नुकसानभरपाई शासनास भरण्याकरिता ५००० रुपये दंड करावा व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व तसेच त्यांच्या कार्यालयीन कामकाजात अनियमितता, पदाचा दुरुउपयोग, शासनाची फसवणूक, शासकीय कामकाजात ढवळाढवळ, चुकीचे आर्थिक व्यवहार, चुकीचे प्रमाणपत्र तयार करणे, अर्जदारासह प्रशासनाची दिशाभूल, कायद्याची अवहेलना, खोटे दस्तावेज तयार करणे, याबद्दल दिवाणी संहितेनुसार पोलीस कारवाई करण्याकरिता आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्या कार्यालयाकडे स्वंयरोजगार योजनेसंदर्भात महिला बचत गट, सेवाभावी संस्था व इतर यांना विविध प्रकारे त्यांना करण्यात येणा-या अनुदान वाटपासंदर्भात काही माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये वीस इतके, त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्यानंतर सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने दिनांक २५-०६-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात केला व त्याच दिवशी म्हणजे दिनांक २५-०६-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक ०७-०९-२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या अपील निर्णयाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील सर्व मुद्दयांचा यथायोग्य त-हेने परामर्श जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये घेतलेला आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे

संबधितांवर ज्या स्वरुपाची कारवाई आदेशित करण्याची अपेक्षा केली आहे, अशा प्रकारची कारवाई करणे ही संबंधीत प्राधिकरणाच्या अखत्यारितील बाब आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क आकारुन व अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार त्यांच्याकडून अपेक्षित असलेली कारवाई त्यांनी पूर्णपणे पार पाडली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणत्याही असद्हेतुने टाळाटाळ केली असल्याचे अथवा अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने तसेच जन माहिती अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामधील मुद्दयांचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, जेल कॉर्नर, साईबाबा मंदिरासमोर, अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४२

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ श्री. अनिल सावळाराम देशमुख, अपिलार्थी
३२ - 'एकदंत', शहानुरवाडी दर्गा रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा प्रशासकीय अधिकारी,
जल व भूमि व्यवस्थापन संस्था, पैठण रोड,
कांचनवाडी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सहयोगी प्राध्यापक,
जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पैठण रोड,
कांचनवाडी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस सहाय्यक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "वाल्मी" या संस्थेमध्ये राखीव जागेचा अनुशेष भरण्याकरिता केलेल्या नियुक्त्या व पदोन्नतीसंदर्भात सन १९९० ते २००५ या कालावधीतील माहिती, एकूण दोन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील अधीक्षक, प्रथम लिपीक व वरिष्ठ लिपिक यांच्यासंदभातील माहिती काढण्यासाठी वेळ लागणार असल्याचे कळविले व उर्वरित माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (डी) व (जे) नुसार देण्याचे नाकारले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००७ रोजी देय असलेली माहिती उपलब्ध करुन दिली, तथापि अपिलार्थीने मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी एका मुद्दयावरील माहिती नाकारण्यात आल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०९-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे निर्देश देण्यात येत असल्याबाबत कळविले. या पत्राची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठविली आहे. तदनंतर अपिलार्थीने दिनांक १९-११-२००७ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

सहाय्यक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगास सादर केलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः दिनांक १४-०८-२००७ रोजी व तदनंतर दिनांक १४-०९-२००७ रोजी पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीस ही माहिती चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटत असल्याचा उल्लेख त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केला आहे. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेली

माहिती चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी का वाटते किंवा प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्यांची कशा प्रकारे दिशाभूल होत आहे हे आयोगास पटवून देण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच त्यांनी व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेल्या अपील मेमोवर ज्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाविषयी वर नमूद केल्याप्रमाणे आपले अभिप्राय दिले आहेत, त्यावर अपिलार्थीने सह्या केल्या नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल सावळाराम देशमुख, ३२ - 'एकदंत', शहानुरवाडी दर्गा रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जल व भूमि व्यवस्थापन संस्था, पैठण रोड, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, पैठण रोड, कांचनवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४३

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, अपिलार्थी
१, समतानगर, वाल्मी नाका, पैठण रोड,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, महसूल विभाग,
औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : सचिव, समतानगर सह. गृहनिर्माण संस्था, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्या-

कडूनही त्यांच्या अपील अर्जाबाबत काहीही कळविण्यात आले नसल्याचे अभिप्राय त्यांनी दिले आहेत व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सप्टेबर १९८१ पासूनच्या पुढील कालावधीत समतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित कांचनवाडी या गृहनिर्माण संस्थेने मौजे कांचनवाडी येथे खरेदी केलेल्या जमिनीच्या बिगर शेती वापरासंदर्भात त्यांना देण्यात आलेल्या परवाना आदेशाबाबत एकूण पाच मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०९-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याने व त्याव्दारे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. त्यांनी आयोगापुढे असा युक्तिवाद केला की, अपिलाथीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक २५-०९-२००७ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात आढळून येत नसल्याचे कळविले आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये सांगितले व तसेच जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस

हे पत्र पाठविल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करता आला नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी जन माहिती अधिकारी यांचे, अपिलार्थीस त्यांनी, माहिती आढळून येत नसल्याचे त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविले असले तरी, हा प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर दिला असल्याने अवैध ठरत आहे हे पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीचा मूळ अर्ज दिनांक २३-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ नुसार देय ठरते. आता अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीत सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात त्यांना कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची उपेक्षा केली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची अडचण असावी अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही, कारण अपिलार्थीने ज्या अभिलेख्यातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली, ते अभिलेखे शासकीय अभिलेख्याच्या "अ" प्रवर्गात मोडत असल्याने व हे अभिलेखे जतन करण्याचा कालावधी हा कायमस्वरुपी असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती देणे अनिवार्य आहे. जर या प्रकरणाची संबंधीत नस्ती आढळत नसल्यास अथवा गहाळ झाल्याचे जन माहिती अधिकारी यांना आढळले तर जन माहिती अधिकारी यांनी हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची

जबाबदारी त्यांच्याकडील ज्या अधिका-यावर / कर्मचा-यावर होती, त्यांच्यावर शिस्तभंगविषयक अथवा फौजदारी कारवाई करावी, असे त्यांना येथे आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर कोठल्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जात शेवटच्या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांना त्यांनी मूळ अर्जाव्दारे विचारलेल्या माहितीशी निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकरण कोणते ही माहिती, विचारलेली होती, तथापि एवढी साधी माहिती देखिल संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याचे सौजन्य दाखविल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची अशा प्रकारे उपेक्षा करुन सबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केला आहे व आपल्या या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रशेखर दिगंबरराव सरदेशपांडे, १, समतानगर, कांचनवाडी, वाल्मी नाका, पैठण रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महसूल विभाग, औरंगाबाद उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४४

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ सौ. अस्मिता सुनिल ठाकरे, अपिलार्थी
रो-हाऊस, आर-२६, दिशानगरी,
बीड बायपास रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता, (नगर रचना-२), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक संचालक नगररचना तथा शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेवर माहिती दिली नाही, त्यांचा वेळ वाया घालविला, त्यांना चुकीची व न मागितलेली माहिती देऊन ख-या माहितीपासून वंचित ठेवले, जर त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी माहिती उपलब्ध नाही असे स्पष्ट लिखित द्यावयास हवे होते, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली सर्व माहिती दिशाभूल करणारी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -- **दिशानगरी परिसर, बीड बायपास रोड, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात समावेशन झाल्याच्या अधिसूचनेची प्रत व मे. डी. एम. कन्स्ट्रक्शनस् यांना दिशानगरी प्रकल्पाच्या दिलेल्या प्रकल्पपूर्ती प्रमाणपत्राची प्रत** - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक माहिती पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचना दिली असल्याचे कळविले. यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या विना दिनांकाच्या पत्रान्वये प्राप्त झाली. अपिलार्थीस ज्या पत्राव्दारे माहिती देण्यात आली त्या पत्रावर तारखेचा कोणताही उल्लेख नाही, त्या पत्रावर ज्या अधिका-याने सही केली आहे त्या अधिका-याने आपल्या सहीखाली २९-१०-२००७ या तारखेचा उल्लेख केला आहे. यावरुन अपिलार्थीस ही माहिती दिनांक २९-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला

विसंगत माहितीचा प्रतिसाद पूर्णतया चुकीचा होता. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना, त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिनांक २९-१०-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर प्राप्त झाली. सदर माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली असल्याने, अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीन्वये अपिलार्थीस ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये १४ त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २४ तासाच्या आत परत करावे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पूर्णतः चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटते, असे आपले अभिप्राय आयोगाकडे व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहेत. यासंदर्भात त्यांना स्पष्टीकरण मागितले असता त्यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या प्रकल्पपूर्तीच्या प्रमाणपत्राच्या प्रतीमध्ये अनेक त्रुटी आहेत. या त्रुटी त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणल्या आहेत. येथे असे नमूद करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रकल्पपूर्तीच्या कथित प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत दिली आहे. जशी मूळ प्रत आहे तशीच झेरॉक्स प्रत आली असल्याने जर मूळ प्रमाणपत्रातच अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्रुटी असतील तर या सदोष प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत देखिल सदोष येणार हे ओघाने आलेच. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाच्या निदर्शनास आणलेल्या त्रुटींचे निराकरण होण्याच्या दृष्टीने आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणामध्ये संबंधीत वास्तुशास्त्रज्ञ समीर असोशिएटस् यांनी औरंगाबाद महानगरपालिकेस सादर केलेल्या पूर्णत्वाच्या दाखल्यामध्ये अनेक जागा, अनेक ओळी रिक्त ठेवल्या असून त्यामध्ये मुख्यत्वे इमारत निश्‍चित कोणत्या तारखेस पूर्ण झाली त्याचा उल्लेख नाही. आयोगाच्या मते संबंधीत वास्तुशास्त्रज्ञाने दिलेला प्रकल्पपूर्ती प्रमाणपत्राचा मूळ दाखला अशा दृष्टीने सदोष आहे.

या प्रकरणी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती त्या स्वरुपात ती अपिलार्थीस दिली आहे. तथापि ती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये न देता विलंबाने दिली व या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःस अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यासाठी आकारलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २४ तासाच्या आत परत करावे.

३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. अस्मिता सुनिल ठाकरे, रो-हाऊस, आर-२६, दिशानगरी, बीड बायपास रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (नगर रचना-२), औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना तथा शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४५

निर्णय दिनांक ०५-०२-२००९

१ श्री. सय्यद खिजर, अपिलार्थी

व्दारा - वेल्डींग फॅबरीकेट ग्लोबल मार्केटच्या

पाठीमागे, शाहबाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापिका, शम्सुल उलूम उर्दू हायस्कूल,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी,

हयात कॉम्प्लेक्स, काळा मारुती जवळ,

मेन रोड, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले

असता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडूनही त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधीत सन १९८४ ते १९९१ या कालावधीतील काही माहिती टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविला होता. तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती वीस वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्याने, त्यांना माहिती पुरविण्यास नकार दिला. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे स्पष्ट केले की, त्यांना संस्थेने मुख्याध्यापिका या पदावरुन दिनांक ०२-०३-२००२ रोजी काढून टाकले होते. तद्‌नंतर मा. उच्च न्यायालय मुबई, खंडपीठ, औरंगाबाद यांच्या आदेशान्वये त्यांना दिनांक २२-०२-२००५ रोजी पूर्ववत मुख्याध्यापिका पदावर रुजू करुन घेतले व या पदाचा अधिकार त्यांना दिनांक २०-०९-२००६ रोजी देण्यात आला, तथापि शाळेकडे उपलब्ध असलेले शालेय अभिलेख माजी प्रभारी मुख्याध्यापकाकडून त्यांना अद्याप हस्तांतरीत झाले नसल्याने व अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नसल्याने त्या अपिलार्थीस माहिती पुरवू शकल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीअन्वये देय

ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांची, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वीस वर्षापुर्वीची असल्याने ती अपिलार्थीस देता येत नाही, ही धारणा चुकीची आहे. सबब अपिलार्थीच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना याच कालावधीमध्ये द्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून किंवा अपिलार्थीकडून माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना जेंव्हा प्राप्त होईल. यापैकी जे नंतर घडेल तेथपासून ३० दिवसाच्या आत माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

जर माजी प्रभारी मुख्याध्यापकाकडून त्यांना शालेय अभिलेख अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्राप्त झाले नाहीत तर त्यांनी आवश्यक वाटल्यास ते हस्तगत करण्यासाठी पोलीस विभागाचे सहाय्य प्राप्त करुन घ्यावे. जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जर त्यांच्याकडे सहाय्याची विनंती केली तर नियमाप्रमाणे सर्व आवश्यक सहाय्य त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी द्यावे. तसेच सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी यांना, असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांना संबंधित प्रभारी मुख्याध्यापकाकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक असलेले सर्व शासकीय अभिलेखे उपलब्ध होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना मदत करुन सर्व प्रकारे समन्वय साधून अपिलार्थीस माहिती आदेशित केल्याप्रमाणे मिळेल असे पहावे. जर ही माहिती संबंधितांकडे उपलब्ध नसेल तर ही माहिती निर्लेखित केल्याच्या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच अथवा अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून यापैकी जे नंतर घडेल त्या दिवसापासून ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद खिजर, व्दारा - वेल्डींग फॅबरीकेट ग्लोबल मार्केटच्या पाठीमागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, शम्सुल उलूम उर्दू हायस्कूल, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शम्स एज्युकेशन सोसायटी, हयात कॉम्प्लेक्स, काळा मारुती जवळ, मेन रोड, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४६
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. जी. एस.पाटील-सुरासे, : अपिलार्थी
रा. करंजगाव ता.वैजापूर जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,वैजापूर,
जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,वैजापूर,
जि. औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. संतराम चंद्रभान सुरासे,
श्री. अंधारे, तहसीलदार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, व त्रयस्थ पक्षापैकी श्री. संतराम चंद्रभान सुरासे हे उपस्थित आहेत, तर दुसरा त्रयस्थ पक्ष श्री. अंधारे तहसीलदार हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०८.०६.२००७ रोजीच्या अर्जानुसार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक त्या माहितीची मागणी केली असता, दि. ५.७.२००७

रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती त्यांनी मागितलेली नव्हती, असे त्यांना आढळून आले, त्याविरुध्द त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आजपर्यंत माहिती पुरविली नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती उघड झाल्याने मोठा गैरव्यवहार उघडकीस येणार असल्यामुळे ही माहिती त्यांना त्वरित उपलब्ध होण्यासाठी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,वैजापूर तालुक्यातील सरकारी जमीन ग्रामपंचायतीच्या जमिनी व करंजगाव येथील गट क्र.११८ या जमिनीबाबत सन १९५९ ते जून२००७ या कालावधीची एकूण १४ मुद्यांद्वारे साक्षांकित स्वरुपात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात आवश्यक त्या रकमेचा भरणा त्याच दिवशी केल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तांतरित केली गेली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या मूळ पत्रावर पोचसही दिली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती ७ दिवसांच्या आत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि तदनंतरही

अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी संबंधित तहसीलदार यांच्याकडे वेळोवेळी संपर्क साधूनही त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळू शकली नाही. त्यांना वैजापूर तालुक्यातील करंजगाव येथील ग.क्र.११८ या जमिनीसंदर्भात आवश्यक असलेली माहिती अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षात दि. ५.७.२००७ रोजी माहिती पुरविली व त्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात होती त्या जन माहिती अधिकारी-तलाठी, करंजगाव यांनी दि. १५.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दि. २२.७.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. तथापि यावर अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, संबंधित तलाठयाने दि. २२.७.२००७ रोजी त्यांना पाठविलेली माहिती त्यांच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या वेगळया अर्जाशी संबंधित आहे.

उपस्थित त्रयस्थ पक्ष श्री. संतराम चंद्रभान सुरासे यांनी त्यांची माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ८.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे सन १९५९ ते जून २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५.७.२००७ रोजी दिलेली नाही. मात्र या माहितीपोटीचे शुल्क रु.५०/- इतके त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतले. या नंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केले व त्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जो भाग तलाठी करंजगाव यांच्या ताब्यात होता व ज्यांची या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून

नेमणूक झाली आहे, त्यांनी अपिलार्थीस ग.क्र.११८ च्या संदर्भातील माहिती दि. २२.७.२००७ रोजी पुरविली, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन, तलाठी करंजगाव यांच्याकडून प्राप्त करुन घेतलेल्या कागदपत्रांची पाहणी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीस तलाठी करंजगाव यांनी दि. २२.७.२००७ रोजी जी माहिती पाठविली आहे, ती माहिती अपिलार्थीने तलाठी करंजगाव यांच्याकडे दि. ११.५.२००७ रोजी केलेल्या दुसऱ्या अर्जाशी संबंधित आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे म्हणणे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, यामध्ये आयोगास तथ्यांश आढळून येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या १४ मुद्यावरील काही माहितीसंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीमध्ये आढळून आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विस्तृत प्रमाणात आहे तसेच अपिलार्थीने मुद्दा क्र. ६, ७ व १३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विशिष्ट अशा माहितीची मागणी केली नसल्याचे दिसून येते. ही माहिती मोघम स्वरुपाची असल्याने या माहितीसंदर्भात अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडील उपलब्ध असलेले अभिलेखे तपासल्यास त्यांना आवश्यक ती माहिती या अभिलेखे तपासणीवरुन घेता येईल. सबब असे आदेशित करण्यात येते की,अशाप्रकारची अभिलेखे तपासणी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून करावी. या अभिलेखे तपासणीसाठी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना कोणतेही शुल्क देय असणार नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी जरी प्रथमतः विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे या प्रकरणी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही उर्वरित माहिती आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. तसेच त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलले शुल्क रु.५०/- इतके जन माहिती अधिकारी यांना परत करावे लागेल. उपरोक्त प्रकरणी जन

अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर अशाप्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस अंतिमतः दिल्या जाणाऱ्या माहितीची उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी स्वतः तपासणी करावी व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती अपिलार्थीस स्पष्ट व वास्तववादी स्वरुपात आणि विनामूल्य पुरविली जाईल, याबाबत समन्वय साधण्याचे काम करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती, निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु.५०/- इतके याच कालावधीमध्ये त्यांना परत करावे.

४) जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी.एस.पाटील सुरासे, मु.पो.करंजगाव, ता.वैजापूर जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४७
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. सय्यद मोहसीन पि.सय्यद कुरबान, रा.सातोना खुर्द, ता.परतुर,जि.जालना : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, परतुर,जि.जालना : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परतूर, जि.जालना

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परतूर, जि.जालना
जन अपिलीय अधिकारीः तहसीलदार,परतूर, जि.जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - **"मौ. सातोना (एक) गट क्र. १३७ व १३१ चे ७/१२ वर दि. २९.१२.८४ रोजी घेण्यात आलेली नोंद कोणत्या आधारावर घेतली, त्याबाबत टिपणी, आदेश व त्याबाबत मालकीसंबंधी सर्व अभिलेख्यांची छायाप्रत"** - ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले, या पत्रावर त्यांनी शुल्काची निश्चित रक्कम निर्देशित केलेली नाही. तदनंतर दि. १७.८.२००७ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती दिली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.९.२००७ रोजी प्रथम अपील केले, तथापि या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जेवढी कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध होती, त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दि. १७.८.२००७ रोजी विनामूल्य पुरविल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस गट क्र. १३१ व १३७ च्या ७/१२ च्या उताऱ्याच्या प्रती दिल्याचे दिसून येते. या उताऱ्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, यामध्ये भोगवटादाराचे नाव संबंधित तलाठयाने दि. २९.१२.१९८४ रोजी कमी करुन ७/१२ च्या उताऱ्यावर, "श्री दर्गा मज्जीद" हे नाव नमूद केले आहे. यासंदर्भात संबंधित तलाठयाने ते, जा.क्र. ८४/धर्मदाय/बी.डी./तहसील कार्यालय परतूर,दि. २९/१२/८४" अशी नोंद घेतल्याचे दिसून येते. यामुळे अपिलार्थीस, मूळ मालकाचे नाव कमी

करुन सध्याच्या नावाची नोंद, ज्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित तलाठयाने केली आहे, त्या कागदपत्रांची आवश्यकता असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला की, संबंधित तलाठयाने या बदलाची नोंद संबंधित गट क्रमांकाच्या फेरफार अभिलेख्यावर घेतलेली नाही. सदर नोंद फेरफार अभिलेख्यावर न करता, सरळ ७/१२ च्या उताऱ्यावर तत्कालीन तलाठयाने केली असल्याने अपिलार्थीस ते आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. मात्र त्यांचे कार्यक्षेत्रातील अशा इतर प्रकरणात त्यांना असे आढळून आले आहे की, विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांच्या दि. १५.१०.१९७५ च्या आदेशानुसार सर्व इनामी जमिनींवर देवस्थानाचे नावाने मालकी दर्शविण्यात आली आहे. विभागीय आयुक्त यांच्या १९७५ सालाच्या आदेशानुसार विचाराधीन प्रकरणी कारवाई झाली असल्याची शक्यता त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये वर्तविली. सदर आदेशाची प्रत विभागीय आयुक्त कार्यालयात हजर राहून उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही ते ३० दिवसांच्या आत करण्यास तयार आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा त्यांनी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त कार्यालयात कसोशीने शोध घेऊन अपिलार्थीस ही माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून आले नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद मोहसीन पि. सय्यद कुरबान, मु.पो.सातोना खुर्द ता.परतूर जि. जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परतूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४८
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. जी. एस.पाटील-सुरासे, : अपिलार्थी
रा. करंजगाव ता.वैजापूर जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तलाठी, सजा करंजगाव,
ता.वैजापूर, जि. औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,वैजापूर,
जि.औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: मंडळ अधिकारी,वैजापूर,
जि.औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी, सध्याचे व तत्कालीन सहा.जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.६.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.७.२००७ रोजी माहिती पुरविली, तथापि सदर माहिती अपूर्ण असल्याचे त्यांना आढळले

आहे. त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.७.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, परंतु सुनावणीचे पत्र त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या दिनांकानंतर दिल्याने ते सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, कारण याबाबत तहसीलदार यांनी त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यात असलेली इनामी जमीन गट क्र.११८ ही बेकायदेशीररित्या ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिली आहे व त्यात तलाठी करंजगाव यांनी स्वतःच्या फायद्यासाठी खोटी नोंद केली आहे. या संदर्भात त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांच्याकडे याचिका दाखल केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या अशाप्रकारच्या अभिप्रायाबरोबर,आपल्या मूळ माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तलाठी, सजा करंजगाव ता.वैजापूर यांच्या कार्यक्षेत्रातील सरकारी जमिनी तसेच हाडोळ जमिनीच्या संदर्भात सन १९८० ते २००७ या कालावधीची एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "**तलाठी करंजगाव यांचे कार्यक्षेत्रातील सरकारी जमिनी व हाडळीच्या जमिनीची यादी, सातबाराचे उतारे व ८-अ च्या प्रती व वरील कालावधीमध्ये ज्यांच्या ताब्यात जमिनी होत्या त्याबद्दलची माहिती व सध्या ज्यांच्या ताब्यात आहे, त्याबद्दलची माहिती, ग.क्र.११८ च्या ७/१२ च्या उताऱ्यात 'इतर अधिकारात'२००६ ते २००७ मध्ये एका दलित वस्ती सुधार योजनेतून एका विहिरीची नोंद ज्या आदेशाद्वारे किंवा ज्या फेरद्वारे करण्यात आली त्याबद्दलची माहिती, करंजगाव येथील गायरान जमिन गट क्र.६ वर केलेल्या अतिक्रमणधारकाची यादी व संबंधित कालावधी आणि इतर सरकारी जमिनी कुणाच्या ताब्यात आहेत किंवा पडीक आहेत,याबद्दलची माहिती** "- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.६.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०८.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांना रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरविण्यात आल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली. या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, करंजगाव येथील सरकारी जमिन गट क्र.११८ च्या ७/१२ च्या उताऱ्याला २००६-०७ मध्ये एक विहीर 'इतर अधिकार'या सदरा(शीर्ष)खाली दाखविली आहे.सदर विहिरीची नोंद घेण्याचा ग्रामपंचायतीचा ठराव दि. ३०.३.२००७ रोजी झाला असून संबंधित तलाठयाने त्याची नोंद ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त होण्यापूर्वीच म्हणजे दि. १०.३.२००७ रोजी घेतलेली आहे. ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या आदेशावरील दिनांक व फेरची नोंद घेतलेला दिनांक यामध्ये तफावत असल्याने, ही माहिती त्यांना दिशाभूल करणारी आहे, असे वाटते. तसेच अपिलार्थीने त्यांना दि. २२.७.२००७ रोजी पुरविलेल्या कथित माहितीमध्ये त्यांना मुद्दा क्र. ४ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी (तत्कालीन तलाठी) यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ११.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांनी दि. २२.७.२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांना दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी प्रथमतः जन माहिती

अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. ११.५.२००७ रोजीच्या अर्जास जो प्रतिसाद दि. १०.६.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी देणे अभिप्रेत होते, त्याऐवजी हा प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अनुज्ञेय कालावधीपेक्षा ७१ दिवसांच्या विलंबाने दिलेला आहे. आज रोजी सुनावणीमध्ये असे उघड झाले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात हडसपिंपळी, लखमापूर व राहेगव्हाण या गावातील जमिनीची माहिती अपिलार्थीस दिलेली नाही. सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. याचबरोबर अपिलार्थीच्या मुद्दा क्र.४ ची माहिती सध्या कार्यरत तलाठी यांनी त्यांच्याकडील दि. २.२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे, हे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस बहुतांश माहिती प्राप्त झाली असून अपिलार्थीचे म्हणणे फक्त ग्रामपंचायतचा ठराव दि. ३०.३.२००७ रोजीचा असताना ग.क्र.११८ च्या ७/१२ च्या उताऱ्यात सदर ठराव पारित होण्यापूर्वीच संबंधित तलाठयाने दि. १०.३.२००७ रोजी नोंद घेतली आहे, या माहितीवर असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे जशी उपलब्ध आहे तशी दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी अथवा अनियमतता झाली आहे, असे अपिलार्थीचे निरीक्षण असेल तर त्यांनी या प्रकरणी महसूल विभागाच्या संबंधित प्राधिकरणाकडे आपली तक्रार करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचन पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा ७१ दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली आहे, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांना

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ शी संबंधित माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी.एस.पाटील सुरासे, मु.पो.करंजगाव, ता.वैजापूर जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वैजापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, वैजापूर जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३४९
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, : अपिलार्थी
रा. परतूर जि. जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
निवासी उपजिल्हाधिकारी, जालना
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जालना

सध्याचे जन माहिती अधिकारी: जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,जालना
तत्कालीन जन अपिलीय अधिकारी: अपर जिल्हाधिकारी, जालना
सध्याचे जन अपिलीय अधिकारी: निवासी उपजिल्हाधिकारी, जालना.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १५.२.२००७ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे नगर परिषद, परतूरच्या कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रार देऊनही अद्यापपर्यंत निर्णय न दिल्याने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत, निर्णय न देण्याच्या कारणांची माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी

यांनी माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या संदर्भातील केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय दिला नाही. त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करणे भाग पडले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही न केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी त्यांनी अंतिमतः आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - **" दि. १५.२.२००७ रोजी जिल्हाधिकारी, जालना यांना परतूर नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांविरुध्द दिलेल्या तक्रार अर्जावर निवासी उपजिल्हाधिकारी, जालना यांनी दि. १६.५.२००७ रोजी माहिती अधिकारांतर्गत सुनावणी घेऊनही अद्याप निर्णय न देण्याची कारणे"** - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.९.२००७ रोजी प्रथम अपील केले, या अपिलावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये पारित केले. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीचे अपील निकाली काढताना जन अपिलीय अधिकारी यांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही अभिलेखे, दस्तऐवज इत्यादींची मागणी केली नसून त्यांच्या दि. १५.२.२००७ वर निर्णय न देण्याच्या कारणांची विचारणा केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत दि. १.१०.२००७ रोजी अपिलार्थी यांना कळविले आहे, ही बाब विचारात घेऊन त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याचा निर्णय घेतला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या दि. २४.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जावर त्यांनी अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला आहे किंवा कसे, याची विचारणा आयोगाने केली असता, या संदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी या कोणताही समाधानकारक खुलासा आयोगासमोर करु शकल्या नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला असल्याचे त्यांना या संदर्भातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन आढळून आले नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयाची व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या पत्राची प्रत सादर केली आहे, यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेतल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.८.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना विचारलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की, यामध्ये माहिती अधिकार अधिनियम,२००५ अन्वये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास त्यांनी, त्यांच्याकडे माहिती, ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात पुरविण्यासंदर्भात प्रथमतः निर्णय घेणे व माहिती पुरविण्याचा निर्णय झाल्यास अधिनियमातील विहित तरतुदींचे पालन करुन

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, एवढया सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहेत. यामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांचा खुलासा, त्यांची मते अथवा त्यांचे अभिप्राय मागणे अशाप्रकारच्या प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर अभिप्रेत नाहीत. त्याचबरोबर अर्जदाराने प्रश्न विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी त्याचे उत्तर देणे अशाप्रकारचीही प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही. माहिती अधिकार अधिनियमान्वये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची असून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे जतन करुन ठेवणे व अधिनियमाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जास अनुसरुन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत अर्जदारास माहिती पुरविण्याबाबत निर्णय घेणे, हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. त्यामुळे या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती, हा 'माहिती'चा विषय होऊ शकत नाही. त्यामुळे मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होऊ शकत नाही. एवढे जरी असले तरी अपिलार्थीच्या दि. २४.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. हे पाहता, व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देय नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. डॉ. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, बालाजी मंदीर रोड, मोंढा, परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगरपालिका प्रशासन),जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५०
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. पंढरीनाथ विक्रम आंभोरे, : अपिलार्थी
रा. सेलगाव ता.बदनापूर जि.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: विभागीय वाहतुक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
जालना.

जन अपिलीय अधिकारी: विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती दिली नसल्याने, त्यांनी सदर अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे **- दि. १५.०६.२००७ ते २५.६.२००७ या कालावधीमध्ये जालना-औरंगाबाद या मार्गावर सोडलेल्या बसेसची संख्या, त्यावर झालेला खर्च व मिळालेले उत्पन्न व झालेला निव्वळ नफा -** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि ही माहिती वेळेत न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १३.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपील प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद या चुकीच्या प्राधिकरणाकडे केले होते. या प्रकरणी विभाग नियंत्रक,राज्य परिवहन, जालना हे जन अपिलीय अधिकारी असल्याचे प्रादेशिक व्यवस्थापक,रा.प.औरंगाबाद यांनी अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात विभाग नियंत्रक,जालना हे निर्णय देतील असे अपिलार्थीस दि. २४.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची राज्य माहिती आयोगाकडे अपेक्षा व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ३१.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती दिली आहे. जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयातील पुरेशा मनुष्यबळाअभावी त्यांना अपिलार्थीस वेळेत माहिती देणे शक्य झाले नाही तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एका विशिष्ट कालावधीशी संबंधित असून ही माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती, तरीही, ही माहिती त्यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे तयार करुन पुरविली आहे व अपिलार्थीस माहिती देण्यास झालेला विलंबाबाबत त्यांच्या कार्यालयाने त्यांच्याकडे तोंडी दिलगिरी व्यक्त केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती दिल्याबद्दल अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे आदेश देण्यासाठी कार्यवाही अपेक्षित केली आहे. या मुद्यावर येथे असे स्पष्ट करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. एस.टी.महामंडळाच्या कामकाजाची व हिशोबविषयक लेखे तयार करण्याची व ती जतन करण्याची कार्यपध्दती उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडून समजावून घेतली असता, त्यांनी असे सांगितले की, म.रा.मार्ग परिवहन महामंडळांतर्गत प्रत्येक जिल्हानिहाय विभागाच्या नफातोटयाचे लेखे प्रतिमाह ठोक स्वरुपात तयार करुन ठेवले जातात. अपिलार्थीने या प्रकरणी एका महिन्यातील काही विशिष्ट दिवसांपुरतीच नफातोटयाच्या आकडेवारीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. एस.टी. महामंडळाची कार्यपध्दती पाहता, महामंडळाचा कोणताही विभाग दररोज त्यांच्या क्षेत्रामध्ये झालेल्या जमा रकमेचा व दररोजच्या खर्चाचा व त्याअनुषंगाने होणाऱ्या दैनंदिन नफातोटयाचा तपशील न ठेवता तो माहवार जतन करुन ठेवत असतो. माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोणत्याही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात अर्जदारास ती विहित मुदतीत देणे अभिप्रेत आहे, हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जून २००७ या महिन्याच्या संपूर्ण अभिलेख्यांच्या माहितीशी संबंधित प्रती देय होतात, तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी

केलेल्या कालावधीतील प्रत्येक दिवसांच्या नफातोटयाची माहिती तयार करुन अपिलार्थीस दिली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अपिलार्थीस माहिती नव्याने तयार करुन देणे अभिप्रेत नसतानाही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केली अथवा ही माहिती दुष्ट हेतूने दडवून ठेवली, अशातील कोणतीही बाब या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, केवळ अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली, म्हणून अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीचा वापर करणे आयोग उचित समजत नाही, तथापि जन माहिती अधिकारी यांनी, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार नीट अभ्यास करुन अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करताना येथून पुढे सतर्क राहावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पंढरीनाथ विक्रम अंभोरे,मु.पो. शेलगाव ता.बदनापूर जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन

महामंडळ,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५१
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. नामदेव पुंडलीक कोल्हे, औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. के.डी.शिंदे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी (प्र)जन माहिती अधिकारी, व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.८.२००७ रोजी काही माहिती मागितली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत ही माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.९.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील

अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय अद्यापपावेतो दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दि. २३.१०.२००७ रोजी प्रकरण मागे घेण्यासाठी सूचना दिल्या, परंतु त्याप्रमाणे मागे घेण्यास अपिलार्थीने नकार दिल्यानंतर अपिलार्थीस अंतिम निकाल आपणास कळवू असे सांगितले. त्यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ३१.१०.२००७ रोजी यु.पी.सी.द्वारे प्राप्त झालेली माहिती,अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर गांभीर्याने विचार केला नाही आणि अद्यापपावेतो कोणताही निर्णय दिला नाही, याचा परिणाम त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त होण्यामध्ये झाला आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१.६.२००७ ते १७.८.२००८ या कालावधीशी संबंधित, त्रयस्थ पक्ष श्री. के.डी.शिंदे,तत्कालीन अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांच्याविषयी एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्याचदिवशी प्राप्त झाल्याचे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रतीवर दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "**श्री. के.डी. शिंदे यांच्या बदली आदेशाची प्रत, बदली रद्द झालेल्या आदेशाची प्रत, श्री.शिंदे यांना कार्यमुक्त न करण्यामागची कारणे व त्यासाठीच्या टिपणी,आदेशाच्या प्रती व श्री. शिंदे यांच्या सेवापुस्तिकेची प्रत** "- या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे दि. २४.९.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.१०.२००७ रोजी काही माहिती पुरविली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ४ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे आयोगास सांगितले. मात्र त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले तसेच आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही सांगितले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने मिळालेली माहिती दिशाभूल करणारी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी माहिती दिली आहे, असे त्यांच्या कार्यालयातील रजिस्टरच्या नोंदीवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी या प्रकरणाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे सोबत आणलेली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्री. के. डी. शिंदे यांच्याविषयी मागितलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ही माहिती सर्वसाधारणतः देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ मध्ये -"श्री. शिंदे यांना कार्यमुक्त न करण्याचे कारण काय आहे," ही माहिती मात्र अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्याकरिता प्रथमतः निर्णय घेणे व

एकदा माहिती देण्याचा निर्णय झाल्यानंतर ती अर्जदारास अधिनियमातील विहित कालावधीत तरतुदीनुसार देण्याची कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तसेच या माहितीतील एखाद्या मुद्यासंदर्भातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कामकाजामधील एखादा निर्णय का घेतला, तो कायदेशीर आहे किंवा कसे व इतर प्रकारची अभिप्रायवजा माहिती अर्जदारांनी जन माहिती अधिकारी यांना विचारणे व अर्जदारास त्यांनी उत्तरे देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना श्री. शिंदे यांच्या ज्या सेवापुस्तिकेची प्रत प्राप्त झाली आहे, त्यामध्ये अपूर्ण माहिती असल्याने ही माहिती त्यांना दिशाभूल करणारी वाटत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. शिंदे यांच्या सेवापुस्तिकेच्या सर्व पृष्ठांची माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाची व्याख्या व ती विहित कालावधीत अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची वर नमूद केलेली प्रक्रिया पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात आहे, त्या स्वरुपात पुरविली आहे. मूळात श्री. शिंदे यांची सेवापुस्तिका जर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अद्यापही अपूर्ण असेल आणि सेवापुस्तिका अपूर्ण आहे, म्हणून अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे, असे अपिलार्थी यांचे म्हणणे, आयोगास, वरील कारणास्तव, मान्य करता येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेतील नोंदी अद्ययावत ठेवणे हे सार्वजनिक प्राधिकरणासाठी विशेष स्वरुपाचे नियमित काम असते, त्यामुळे या प्रकरणी केवळ श्री. शिंदे यांच्या सेवापुस्तिकेतील नोंदी अपूर्ण असल्याने अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने, दिशाभूल झाली असे मानता येणार नाही. अपिलार्थीच्या याच अर्जातील मुद्दा क्र.३ मधील उर्वरित भाग- "त्यासाठी ज्या काही टिपणी,आदेश यांच्या प्रती" ही माहिती अपिलार्थीस देय आहे. याच मुद्यातील शेवटच्या भागामध्ये अपिलार्थीने,- श्री. शिंदे कार्यमुक्त केव्हा होतील- अशाप्रकारची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती भविष्यकाळातील व जन माहिती अधिकारी यांच्याकडून

अंदाज अपेक्षित करणारी असल्याने व वर स्पष्ट केल्याप्रमाणे अधिनियमातील अभिप्रेत सीमित प्रक्रिया पाहता, अपिलार्थीस ही माहिती देय असणार नाही.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील वर नमूद केलेल्या "त्यासाठी ज्या काही टिपणी,आदेश यांच्या प्रती" या भागाची माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापि येणे आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद देऊन अपूर्ण माहिती पुरविली असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या मुद्दा क्र. ३ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २४.९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.१०.२००७ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे पत्र आयोगास अपिलार्थी यांच्यातर्फे आज सुनावणीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. अपिलार्थी यांच्या मते जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर अद्यापपावेतो कोणताही निर्णय दिलेला नाही. या संदर्भात सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयातील संबंधित प्रतिनिधी देखील कोणताही समाधानकारक खुलासा करु शकत नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची योग्य ती दखल धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अंशतः अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांना रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३) धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, रा. राजे संभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५,२६, जळगावरोड,हर्सूल,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. धर्मादाय आयुक्त, मुंबई,महाराष्ट्र राज्य, 'धर्मादाय आयुक्त भवन', ३ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,मुंबई-१८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५२
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. अरुण घोडे, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

सध्याचे जन माहिती अधिकारीः वरिष्ठ लेखाधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्याशी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताच पत्रव्यवहार केला नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नाही. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि.०१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१.२००७ ते ३०.९.२००७ या कालावधीतील **जिल्हा परिषद बांधकाम**

**विभागाकडील राज्य रस्ते निधी अंतर्गत घेतल्या गेलेल्या कामासंदर्भात व संबंधित अभिकर्त्यांना प्रदान केलेल्या रकमेचा तपशील, धनादेश वितरणासंदर्भात** काही माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती अथवा प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले, तथापि अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. सहायक जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीचा दि.१.१०.२००७ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दि. ३.१०.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने व्यक्तीशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज दि. ४.१०.२००७ रोजी बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला व अपिलार्थीस तसे पत्राद्वारे कळविले. यानंतर बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्याकडील दि. २५.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी कार्यालयीन शिपायामार्फत अपिलार्थीने दिलेल्या पत्त्यावर पाठवून दिले, तथापि या पत्त्यावर संबंधित शिपायास अपिलार्थी आढळले नाहीत. त्यामुळे या पत्राची तामिली अपिलार्थीस होऊ शकली नाही. अपिलार्थीचा कथित दि. २६.१०.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेला नाही. दरम्यान मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी दि. ३१.१.२००९ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थीस माहिती

देण्यासंदर्भात त्यांनी कोणतीही टाळाटाळ केली नाही अथवा अपिलार्थीपासून कोणत्याही दुष्ट हेतूने माहिती दडवून ठेवली नाही.

वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, यातील काही माहिती बांधकाम विभागाकडे व काही माहिती वित्त विभागाकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. मात्र या प्रकरणी वित्त विभागाने जरी अधिनियमातील कलम ६ (३)(एक) प्रमाणे कार्यवाही केली असली तरी वित्त विभागाकडे सहज उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी निधी उपलब्धतेची तारीख व अभिकर्त्यांना धनादेश प्रदान केलेली तारीख व रकमेचा तपशील, ही माहिती वित्त विभागाकडे जिल्हा परिषदेकडील वित्त विभागाची प्रचलित कार्यपध्दती पाहता,असणे अनिवार्य आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती ते व्यक्तिशः उपलब्ध करुन घेणार असल्याचे त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि एवढे असूनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी स्वतः होऊन कधीही उपस्थित राहिले नाहीत, ही बाब देखील येथे विशेष महत्त्वाची व नोंद घेण्यासारखी आहे

कोणत्याही अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास, ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व हे पूर्णपणे अर्जदारावर येऊन पडते. या प्रकरणी अपिलार्थीने, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तीशः  हजर राहिल्याचा, कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी सुनावणीसाठी आयोगासमोरही उपस्थित नाहीत. अपिलार्थीस आता जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना

अपेक्षित असलेली माहिती विनामूल्य पाठविली आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे.अपिलार्थीस माहिती मिळण्यास विलंब होण्यास अपिलार्थी हे या प्रकरणी स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. कारण त्यांनी दिलेल्या पत्त्यावर ते राहत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले आहे. माहितीपोटीचे शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी कधीही विचारणा केली नाही व माहिती घेण्यासाठी ते स्वत:होऊन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न झाल्याने तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केला नाही. या बाबी लक्षात घेता,अपिलार्थीचे विचाराधीन अपील अर्जावर वेगळयाने आदेश देण्याचे प्रयोजन आयोगास आढळून येत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०६-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण घोडे,३-१५-१०७-आर-५, मस्तगड, जालना-४३१ २१३.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५३
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१ श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, : अपिलार्थी
रा.अंतरवाली (राठी), जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक निबंधक, सहकारी संस्था,
ता.अंबड जि.जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जालना

त्रयस्थ पक्षः श्री. नारायण श्रीमंतराव मुंढे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दि. ३.९.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. नारायण श्रीमंतराव मुंढे, सदस्य, भगवान सहकारी पाणी पुरवठा संस्था, दोदडगाव यांच्या दि. ३०.६.२००५ रोजीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली चौकशी व कार्यवाहीबाबतच्या सविस्तर अहवालाची प्रमाणित प्रत, ही माहिती मागितली होती.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थी यांच्या अधिकृत प्रतिनिधीने आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३.९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून न मिळाल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमातील कलम १९(३) अन्वये दि. ४.१२.२००७ रोजी अपील दाखल केले होते. आता त्यांना ही संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून जानेवारी, २००८ मध्ये प्राप्त झालेली असून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही व प्राप्त झालेल्या माहितीने ते समाधानी आहेत व विचाराधीन अपील चालविण्यामध्ये त्यांना स्वारस्य नाही.

अपिलार्थी यांच्या अधिकृत प्रतिनिधीने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती आयोगास आज रोजी दाखविली. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र.२३५३/०७, दि.०४.१२.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबासाहेब सटवाजी धोंगडे, अंतरवाली (राठी),ता.घनसावंगी, जि. जालना

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,सहकारी संस्था,अंबड जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५४
निर्णय दिनांक ०६-०२-२००९

१. श्री. राजेंद्र काशिनाथ तौर, : अपिलार्थी
रा. वारुळा ता.माजलगाव जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
साखर आयुक्त कार्यालय,पुणे
२. जन अपिलीय अधिकारी तथा
साखर आयुक्त, साखर आयुक्त कार्यालय,
पुणे

सध्याचे जन माहिती अधिकारीः सहायक संचालक (विकास),
साखर संचालनालय, पुणे.
सध्याचे जन अपिलीय अधिकारीः साखर संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ०९.०७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे, जो जन माहिती अधिकारी यांना दि. १२.७.२००७ रोजी प्राप्त झाला, मागितलेली माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ३.९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला नाही, त्यामुळे व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०९.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्रातील साखर कारखान्यासंदर्भात सन २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीशी संबंधित एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.९.२००७ रोजी प्रथम अपील केले, तथापि अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, अपिलार्थी यांनी दि. १०.१०.२००७ रोजी त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाबाबत स्मरणपत्र देखील दिले. सदर पत्रात अपिलार्थीने त्यांना सहसंचालक (अर्थ),साखर आयुक्त कार्यालय,पुणे यांनी दि. १३.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे एका पृष्ठाची माहिती पाठविल्याचे नमूद केले आहे, तथापि तत्पूर्वीच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, आयोगाने दि. २०.१२.२००८ रोजीच्या लेखी नोटीसद्वारे तसेच दि. ३१.१.२००९ रोजी दूरध्वनीद्वारे त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. गायकवाड यांच्यामार्फत संदेश देऊनही आज आयोगासमोर स्वतः अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी उपस्थित नाही. साखर आयुक्त कार्यालयातील संबंधित

अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत आयोगातर्फे तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे. या नापसंतीची नोंद साखर आयुक्त यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांच्या जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १०.१०.२००७ रोजीच्या स्मरणपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीस सहसंचालक (अर्थ), साखर आयुक्त कार्यालय,पुणे यांनी दि. १३.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती दिली असल्याचे दिसून येत आहे, तथापि सदर माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, आयोगास या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३.९.२००७ रोजीच्या अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे, आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ०३.०९.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. सदर सुनावणीसाठी अपिलार्थीस किमान एक आठवडा अगोदर पूर्वसूचना (नोटीस) प्राप्त होईल अशी पाठविण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०३.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब

क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०६-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र काशिनाथराव तौर, मु.पो.वारुळा, ता.माजलगाव जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा साखर संचालक (विकास),साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा साखर संचालक (प्रशासन),साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५५

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले,<br>मु. पो. कासराळी, तालुका बिलोली,<br>जिल्हा नांदेड | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम)<br>उपविभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>जिल्हा परिषद, (बांधकाम), (दक्षिण), नांदेड | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती गेल्या आडीच वर्षापासून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे. या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले असता व त्यानंतर

जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २७-०८-२००७ व दिनांक ०३-०९-२००७ रोजी स्मरणपत्र देऊनही संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बिलोली तालुक्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समिती या योजनेत झालेला खर्च, या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **मोजमाप पुस्तीका सत्यप्रती, मजुरांना दिलेल्या मजुरांचे हजेरीपट सत्यप्रती व मूळ अंदाजपत्रकाच्या सत्यप्रती** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक ३१-०३-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीशी संबंधीत होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील क्रमांक १९२/०२ या पत्राने दिनांक १४-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीस पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन (जावक नोंदवहीवरुन) त्यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याचे भासत आहे कारण अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाले नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या जावक नोंदवहीवर १९२ या क्रमांकाने दिनांक २०-०६-२००६ रोजी एक पत्र लिहिले असून जावक नोंदवहीतील १९२ क्रमांकाच्या पत्राच्या खाली दोन रिकाम्या ओळीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी १९२/१ व १९२/२ अशा क्रमांकाच्या (दोन) पत्रांचा उल्लेख केला आहे. वास्तविक ही दोनही पत्रे वेगळी असल्याकारणाने या पत्राचा क्रमांक अनुक्रमे १९३ व १९४ असा असावयास हवा होता, तथापि या पत्रास १९२/१ व १९२/२ असे क्रमांक देण्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रयोजन आयोगास समजून येत नाही. तसेच या नोंदवहीतील टपाल खर्च स्तंभ त्यांनी न भरता कोरा ठेवलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या कथित प्रतिसादाबद्दल आयोग साशंक आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील १९ (१) च्या तरतुदीनुसार

अपिलार्थीने दिनांक ०६-०८-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व तद्नंतर त्या अपील अर्जावर दिनांक २७-०८-२००७ व दिनांक ०३-०९-२००७ रोजी सुनावणी घेण्यासाठी स्मरणपत्रे संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना पाठविली असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. आज रोजी उपस्थित जन अपिलीय अधिकारी हे, अपिलार्थी सुनावणीसाठी गैरहजर असल्याने त्यांच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास सांगत आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी निश्चितपणे कोणती कारवाई केली हे आयोगाने विचारल्यानंतर सदर कागदपत्रे ज्या कर्मचा-याच्या ताब्यात होती तो कर्मचारी मयत झाल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भातील कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आज सुनावणीमध्ये आयोगास अवगत केले गेले. एकंदरीत आज रोजीची, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची एकूण संशयास्पद वर्तणुक व संशयास्पद अभिलेख्यावरुन त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जी त्यांना पूर्णत: देय होते, ती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याबरोबर आणली असून, कथित माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दयांचा सर्वसाधारणपणे समावेश असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात होती, त्यांच्या प्रत्यक्षपणे ताब्यात आहे व होती.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठीचा अधिनियमातील विहित कालावधी व्यपगत झाला असल्यामुळे आता अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांची, केवळ अपिलार्थी गैरहजर होते म्हणून त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेण्याची व तद्नंतर आयोगास आवश्यक ती कागदपत्रे जुजबी कारणावरुन उपलब्ध करुन न देण्याची त्यांची कृती ही त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव, बेपर्वाई व बेजबाबदारपणा स्पष्ट करते असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची व बेपर्वाई वृत्तीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. एस. एस. जोशी कार्यरत होते व आता ते नांदेड जिल्हा परिषदेत कार्यरत आहेत असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही असमर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. आज ते प्रत्यक्षतः आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने असे सूचित करण्यात येते की, त्यांनी मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने, स्वतः जन माहिती अधिकारी

यांच्या कार्यालयात उपस्थित राहून, त्यांना आवश्यक असलेली माहिती ७ दिवसाच्या आत, विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले, मु. पो. कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, (बांधकाम), (दक्षिण), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. एस. जोशी (मार्फत जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड)

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६६

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. बळवंत किशनराव मोरे, अपिलार्थी
व्दारा - तिरुमला एस. टी. डी. विष्णुनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, बिलोली, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून दिनांक ०७-०२-२००९ रोजी स्वहस्ताक्षरात लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये त्यांनी विचाराधीन अपील, त्यांना पूर्ण माहिती मिळाल्याने मागे घेत असल्याचे व त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडील त्यांचे विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २३६६/२००७, दिनांक ०५-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २३६६/२००७, दिनांक ०५-०९-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०७-०२-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बळवंत किशनराव मोरे, व्दारा - तिरुमला एस. टी. डी. विष्णुनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६७

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. बनसोडे एकनाथ नागोराव, अपिलार्थी
राहूलनगर, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो त्यांना माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुखेड शहरातील किरकोळ केरोसीन विक्रेत्यांसंदर्भातील सन २००३ ते २००६ या कालावधीशी संबंधीत एकूण पाच मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **वरील कालावधीमध्ये वाटप रजिस्टर व बिलाची पावती, किरकोळ केरोसीन विक्रेत्यांची वार्डप्रमाणे यादी, लाभधारकांच्या नावांची वार्डाप्रमाणे यादी, किरकोळ विक्रेत्यांना केलेला केरोसीन पुरवठा व विक्रेत्यांचा नावासह पत्ता** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक १७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबद्दल अपिलार्थीस काही खुलासा मागितला. तथापि माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपेक्षित माहिती पुरविली नाही. त्यांना मुखेड शहरातील माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून आज रोजी आयोगास त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर करण्यात आला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०८-२००७, ०२-११-२००७ व १९-११-२००७ रोजी आवश्यक ती माहिती दिली आहे. तसेच

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांचा माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्यास त्यांची काही हरकत नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती, तथापि मुद्दा क्रमांक १ व मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत माहिती, संबंधित किरकोळ पुरवठादाराकडे उपलब्ध आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहजासहजी उपलब्ध नाही. अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना किरकोळ विक्रेत्यांवर अवलंबून राहावे लागते. त्यासंबंधी किरकोळ विक्रेत्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी येणा-या झेरॉक्स प्रतीच्या खर्चाची मागणी तहसीलदार, मुखेड यांच्याकडे केली असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले व तहसीलदार यांनी त्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे पाठविला आहे. मात्र अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक २, ४ व ५ च्या संदर्भातील यादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीस मुखेड शहराशी संबंधीत माहिती हवी आहे, व उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती, सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. दिनांक १४-०१-२००८ रोजी अपिलार्थीस एका परवानाधारकाकडून परस्पर माहिती मिळाली आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या व सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रत्यक्षात ताब्यात नसलेल्या आणि अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत माहिती, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस तपासणीसाठी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थी यांनी ही माहिती स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून घ्यावी. असे आदेश देण्याचे कारण हे आहे की, किरकोळ रॉकेल विक्रेत्यांना विक्रीपासून मिळणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती पोटीचा खर्च ते सहन करु शकणार नाहीत, अशा प्रकारची तक्रार तहसीलदार, मुखेड यांच्याकडे वर वर्णन केल्याप्रमाणे संबंधित किरकोळ परवानाधारकांनी केली

आहे. मात्र अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४ व ५ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी लागेल. या घटनाक्रमामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना अपेक्षित असलेली माहिती देण्यासंदर्भात प्रथम प्रतिसाद दिला आहे जो अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार त्यांनी दिनांक ०४-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे अपेक्षित होते. यावरुन असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदींचा भंग करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यासाठी पात्र ठरविले आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमावदारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन, जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. सबब जिल्हाधिकारी, नांदेड यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत निर्णयामध्ये विवेचन केल्याप्रमाणे, विनामूल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत

सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बनसोडे एकनाथ नागोराव, राहूलनगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६८

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. गंगाधर शिवाजी झिंझाडे, अपिलार्थी

४३ "दिपज्योती" उल्हासनगर, मालेगाव रोड,

तरोडा (खु.), नांदेड - ०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार,

तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १ श्री. किशनसिंग गंगनसिंग

२ श्री. अलिमोद्दीन खमरोद्दीन

३ श्री. सुरेश भाऊराव देशमुख

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व श्री. किशनसिंग गंगनसिंग वगळता उर्वरित त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीच्या आत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी जाणूनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केली, असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. किशनसिंग गंगनसिंग, श्री. अलिमोद्दीन खमरोद्दीन व श्री. सुरेश भाऊराव देशमुख यांच्यासंदर्भात या अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांनी दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-१२-२००६ या कालावधीमध्ये त्यांना संलग्नीत असलेले रॉकेल हॉकर्स यांना वाटप केलेल्या रॉकेल बिलपुस्तिकेच्या छायांकीत प्रती, त्यांच्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रती, साठा रजिस्टरच्या सत्यप्रती व त्यांना दरमहा देण्यात आलेले नियतन ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक १६-०७-२००७ रोजी प्राप्त झाले. या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४३,२०० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरावे असे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये त्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस देय असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा सविस्तर तपशील अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा केला नाही. मात्र अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे संकलीत केली आहे काय ? असा जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने संपूर्ण माहिती पाहिल्यानंतरच आवश्यक ते शुल्क भरतील असे आश्वासित केले. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन या सुनावणीवरील निर्णय अपिलार्थीस दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या

पत्राव्दारे कळविला. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे मूदतपूर्व व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

त्रयस्थ पक्ष श्री. अलिमोद्दीन खमरोद्दीन यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या अपील निर्णयाप्रमाणे, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दाखविण्यासाठी त्यांनी तयार करुन ठेवली होती व त्याप्रमाणे ती माहिती व तिची व्याप्ती अपिलार्थीने त्यांच्या दुकानात समक्ष येऊन पाहिली. अपिलार्थी निश्चितपणे कोणत्या तारखेस त्यांच्या दुकानात आले हे त्यांना आता स्मरत नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वेळोवेळी जाऊन पैशाची मागणी करत असतात व त्यांची ही मागणी पूर्ण न केल्यास माहिती अधिकाराव्दारे माहिती प्राप्त करुन घेऊन त्यांच्याविरुध्द वृत्तपत्रात बातमी छापून आणण्याची धमकी ते देत असतात. इतर काही विक्रेत्यांकडून अपिलार्थीने अशा प्रकारे बेकायदेशीररित्या पैसे प्राप्त करुन घेतल्याचे त्यांना माहित आहे.

दुसरे त्रयस्थ पक्ष श्री. सुरेश भाऊराव भोसले यांनी देखील याप्रमाणेच युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयामध्ये संकलीत केली जात नाही. ही माहिती अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांकडे संकलीत करुन ठेवली जात असते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्रयस्थ पक्षाला दरमहा पुरविण्यात आलेल्या नियतनाच्या प्रती मात्र त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन ठेवलेल्या असतात. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने त्यांनी संबंधीत त्रयस्थ पक्षाकडून अंदाजित करुन घेतले आहे व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रुपये ४३,२०० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची अर्धघाऊक केरोसीन विक्रेते यांच्या दुकानात जाऊन पाहणी करुनही शुल्क न भरल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, त्रयस्थ पक्ष व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करतेवेळी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाला नव्हता, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्राने आवश्यक तो निर्णय अपिलार्थीस कळविला आहे. त्रयस्थ पक्षाने या प्रकरणी अपिलार्थीच्या माहिती अधिकाराच्या गैरपध्दतीच्या वापराबाबत वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे आयोगास जे अवगत करुन दिले आहे त्याची आयोगाने गांभीर्यपूर्वक दखल घेतली आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण तीन अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांची जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, तथापि एक त्रयस्थ पक्ष श्री. किशनसिंग गंगनसिंग यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे असे लिहून दिले आहे की, त्यांना किशनसिंग गंगनसिंग यांच्याकडून दिनांक ०७-०४-२००८ रोजी परस्पर माहिती प्राप्त झाली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाकडून परस्पर माहिती घेण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. मात्र अशा प्रकारे कोणत्याही मार्गाचा अवलंब न करता अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात मागणी केलेली माहिती त्यांच्याकडून परस्पर उपलब्ध करुन घेणे, ही अपिलार्थीची कृती नियमबाह्य व गैर आहे. अपिलार्थीच्या या कृतीने आयोगासमोर उपस्थित असलेल्या दोन त्रयस्थ पक्षाच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या वर्तनाबद्दल त्यांनी घेतलेल्या आक्षेपास फक्त दुजोरा मिळत नाही तर उपस्थित त्रयस्थ पक्षाने, अपिलार्थीच्या वतर्नाबाबत घेतलेल्या आक्षेपाचे आपोआपच दृढीकरणही होत आहे, ही बाब येथे विशेषत्वे नोंद करणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. या सर्व प्रकारावरुन अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा व त्रयस्थ पक्षाच्या माहिती अधिकार अधिनियमाच्या संदर्भातील अपु-या ज्ञानाचा गैरफायदा घेत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांच्या

अशा प्रकारच्या वर्तणुकीमुळे, तसेच त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरल्यामुळे, अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर शिवाजी झिंझाडे, ४३ "दिपज्योती" उल्हासनगर, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. किशनसिंग गंगनसिंग, अर्धघाऊक केरोसीन विक्रेते, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड)

५ श्री. अलिमोद्दीन खमरोद्दीन, अर्धघाऊक केरोसीन विक्रेते, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड)

६ श्री. सुरेश भाऊराव देखमुख, अर्धघाऊक केरोसीन विक्रेते, यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, तालुका जिल्हा नांदेड)

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६९

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. डी. पी. विष्णुपुरीकर, अपिलार्थी

यात्री निवास रोड, बडपुरा,

नांदेड - १.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा,

तालुका लोहा, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ३१-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापही निर्णय प्राप्त झाला नाही, त्यांनी दिनांक २१-

०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने प्रथम अपील अर्ज केला, त्यानंतर दिनांक २२-०५-२००७ रोजी स्मरणपत्र देऊनही त्यांच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिला नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील अर्ज राज्य माहिती आयोगाकडे केला आहे.

आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी आयोगास असे अवगत केले की, विचाराधीन प्रकरणाशी संबंधीत नस्ती त्यांच्या कार्यालयात आढळून येत नाही, त्यामुळे या प्रकरणी त्यांना काहीही सांगता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही. आज रोजी त्यांना आयोगाच्या कार्यालयामार्फत अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाची व दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत व्यक्तिशः हस्तांतरीत करण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी या टप्प्यावर अपिलार्थीच्या दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास, अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार ते, जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद                                                    ( वि. बा. बोरगे )

दिनांक    ०७-०२-२००९                                    राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. डी. पी. विष्णुपुरीकर, संपादक, नंदिग्राम लोकक्रांती वार्ता, जि. प. दैनिक नवभारत (मुंबई), यात्री निवास रोड, बडपुरा, नांदेड - १.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७०

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, अपिलार्थी
४३ "दिपज्योती" उल्हासनगर, मालेगाव रोड,
तरोडा (खु.), नांदेड - ०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-

०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिमायतनगर यांनी माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब लावला व टाळाटाळ केली.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना, श्री. शंकरराव रामलू पळशीकर त्रयस्थ पक्ष तथा केरोसीन पंपधारक, हिमायतनगर यांच्याकडून टपालाव्दारे परस्पर प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने विचाराधीन अपिलामध्ये मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असून त्यांनी दिनांक १०-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना तसे कळविले आहे. तसेच या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ माहितीसाठीचा दिनांक ०६-०६-२००७ रोजीचा अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे. अपिलार्थीस ही माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीचा दिनांक ०६-०६-२००७ रोजीचा मूळ अर्ज निकाली काढण्याचे व तसेच त्यांनी या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना त्रयस्थ पक्षाकडून परस्पर टपालाने प्राप्त झाली असल्याचे नमूद केले आहे हे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांना प्राप्त झाली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत, यावरुन अपिलार्थीस अपील चालविण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, ४३ "दिपज्योती" उल्हासनगर, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७१

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, अपिलार्थी

उपाध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास

(महाराष्ट्र), तालुका शाखा, गवळीपुरा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर

उपविभाग क्रमांक १, वजिराबाद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

शहरी/ग्रामीण विभाग, नवा मोंढा, नांदेड

त्रयस्थ पक्ष : १ श्री. बी. आर. सुर्यवंशी

२ श्री. नरेंद्रसिंग बुंगई

३ श्री. रामदास शक्करवार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो संपूर्ण माहिती विहित मुदतीत पुरविली नाही, सर्व संचिका उपलब्ध असतांनाही माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. रामदास प्रल्हाद शक्करवार यांना मंजूर करण्यात आलेल्या पाच विद्युत मीटरसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविलेली माहिती अपिलार्थीस पुनःश्च पाठविली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीनुसार, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देणे गरजेचे होते, तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः अधिनियमातील कलम ११ ची तरतूद विचारात घेऊन कारवाई करणे गरजेचे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार ते, हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )

दिनांक     ०७-०२-२००९                          राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, उपाध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास (महाराष्ट्र), तालुका शाखा, गवळीपुरा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर उपविभाग क्रमांक १, वजिराबाद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, शहरी/ग्रामीण विभाग, नवा मोंढा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७२

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. पंढरीनाथ विक्रम अंभोरे,<br>मु. पो. शेलगाव, तालुका बदनापूर,<br>जिल्हा जालना | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>जालना | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक,<br>जालना | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | | पोलीस उप अधीक्षक (मु.), पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना |
| | त्रयस्थ पक्ष | : | १ | श्रीमती नर्मदा लक्ष्मण पवार |
| | | | २ | श्री. लक्ष्मण अर्जून पवार |
| | | | ३ | श्री. रामा अर्जून पवार |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. लक्ष्मण अर्जून पवार व श्री. रामा अर्जून पवार हे त्यांच्या वकिलासह हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १७ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविली असल्याने त्यांनी सदरचे अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत त्रयस्थ पक्षांविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९९८ ते २००७ असा होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक १५-०९-२००७ रोजी बदनापूर पोलीस ठाण्यामार्फत पुरविली आहे. सदर माहिती मिळाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

आज रोजी अपिलार्थीच्या आयोगासमोर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून १७ दिवस विलंबाने प्राप्त झालेल्या निकालाची माहिती, या प्रकरणाशी संबंधीत अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने व्यक्तिशः माहिती मागितल्यास ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित राहून प्राप्त करुन घेण्याचे उत्तरदायित्व पूर्णतः संबंधीत अर्जदारावर येते. या प्रकरणी अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्यासंदर्भात त्यांनी आयोगास जो पुरावा दाखविला त्यावरुन अपिलार्थी विहित माहिती घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे डिसेंबर २००७ या महिन्यात उपस्थित राहिल्याचे दिसून येते. तथापि यापूर्वीच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी बदनापूर पोलीस

ठाण्यामार्फत दिनांक १५-०९-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. वास्तविक पाहता ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित असणे त्यांना अनिवार्य होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी स्वंयप्रेरणेने अपिलार्थीस ही माहिती बदनापूर पोलीस ठाण्यामार्फत देऊ केली व अपिलार्थीने ती स्वीकृत केलेली आहे. अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी वेळेत व व्यक्तिशः हजर होते त्याबद्दल आयोगासमोर सादर केलेला पुरावा वर नमूद केल्याप्रमाणे वैध ठरत नसल्याने, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ विक्रम अंभोरे, मु. पो. शेलगाव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मु.), पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७३

निर्णय दिनांक ०७-०२-२००९

१ श्री. पंढरीनाथ विक्रम आंभोरे, अपिलार्थी
मु. पो. शेलगाव, तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (म-२),
तहसील कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर,
जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष : १ श्री. राम अर्जून पवार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष त्यांच्या वकिलासह हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, विसंगत व चुकीची माहिती प्राप्त झाली असून, ही माहिती त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून उशिराने प्राप्त झाली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यासाठी टाळाटाळ केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक १३-०१-२००५ ते १३-०२-२००६ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - **शेतकरी आहेत काय याबाबतच्या प्रमाणपत्रासाठी श्री. राम अर्जून पवार रा. शेलगाव तालुका बदनापूर जिल्हा जालना यांची शेलगाव शिवारात तथा बदनापूर तालुक्यात शेती असल्यास ७/१२ च्या उता-यासह माहिती मिळावी** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वदारे संबंधीत तलाठी तथा जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०४-०८-२००७ रोजी पाठविला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व तलाठ्यांना पाठवून राम अर्जून पवार या त्रयस्थ पक्षाच्या नावाने शेलगाव शिवारात तथा बदनापूर तालुक्यात जमीन आहे किंवा कसे याबाबत त्यांना माहिती विचारल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय देऊन, या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असा निष्कर्ष काढला. तथापि या अपिलावर त्यांनी ठोस असा कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कळविले व अपिलार्थीस दिनांक २३-१०-२००७ रोजी कथित माहिती पुरविली.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही, त्यांना कथित माहिती, अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली, आणि ही माहिती देण्यापोटी विलंब लागला असून ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून वीस इतक्या रकमेच्या शुल्काचा भरणा बदनापूर येथील महाराष्ट्र बँकेत करुन घेतला. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये शुल्क स्वीकृत करण्याची सुविधा असतांना देखील त्यांनी अपिलार्थीस बँकेमध्ये शुल्क भरण्यास विनाकारण पाठविले. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील इतर तलाठ्यांकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या प्रती पुरविल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय देतांना तो महसूल कायद्याच्या तरतुदी लक्षात घेऊन दिला आहे. त्यांनी हा निकाल देतांना माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा विचार केल्याचे आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला असता, त्रयस्थ पक्ष, श्री. राम अर्जून पवार हे खरोखरच शेतकरी आहेत किंवा कसे हे कळणे सुलभ व्हावे म्हणून त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व तलाठ्यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून त्यांचे अभिप्राय मागविले. वास्तविक पाहता अशा प्रकारची कारवाई करण्याची त्यांना गरज नव्हती. केवळ सद्भावनेने त्यांनी ही कारवाई केली. तसेच संबंधीत तलाठ्यांकडून अहवाल प्राप्त होण्यामध्ये काही कालावधी व्यपगत झाला असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दिनांक २३-१०-२००७ पर्यंत प्रतिक्षा करावी लागली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व त्यांनी दिलेला प्रतिसाद लक्षात घेता अपिलार्थी-पासून माहिती दडवून ठेवण्याचा अथवा हेतूपुर:स्सर त्यांना खोटी माहिती द्यावयाची असा त्यांचा कधीही उद्देश नव्हता.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाची माहिती विचारली होती. ही माहिती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत अशी आयोगाने विचारणा केली असता, अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, महसूल संहितेनुसार जी व्यक्ती शेतकरी आहे अशीच व्यक्ती शेतजमीन खरेदी करु शकते. बरेच लोक शेतकरी नसतांना शेतक-यांच्या जमिनी विकत घेऊन मूळ मालकाला अथवा संबंधीत शेतक-याला भूमिहीन करुन सोडतात. असे प्रकार टाळण्यासाठी, जनजागृती करण्यासाठी त्यांना अशा प्रकारच्या माहितीची आवश्कता आहे.

त्यावर त्रयस्थ पक्ष श्री. राम अर्जून पवार यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने ज्या जमिनीसंबधात माहिती अपेक्षिलेली आहे ती जमीन श्री. हिंमत भागुजी कानुले या शेतक-याकडून खरेदी केली असून, त्यांनी खरेदी केलेल्या जमिनीच्या व्यवहारामुळे श्री. हिंमत भागुजी कानुले हे भूमिहिन झालेले नाहीत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सहज व सरळ होते. अपिलार्थीने मूळात श्री. राम अर्जून पवार हे शेतकरी आहेत किंवा नाही अशा प्रकारचे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिले होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शेलगाव शिवाराशी व दिनांक १३-०१-२००५ ते १३-०२-२००६ या कालावधीशी संबंधीत असल्याने, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तथा तलाठी, शेलगांव यांना पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली असती तरी त्यांचे काम होऊ शकले असते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी श्री. राम अर्जून पवार हे शेतकरी आहेत किंवा कसे हे शोधण्याचा प्रयत्न केला, त्याची परिणीती अनावश्यक कालापव्यय होण्यामध्ये झाली व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लागला. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिल्या गेलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये, श्री. राम अर्जून पवार यांच्या मालकीच्या शेतजमिनीच्या ७/१२ च्या

उता-याच्या व शेत जमिनीच्या नकला त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या कालावधीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती मूळात अस्तित्वातच नव्हती कारण श्री. राम अर्जून पवार यांनी सदर जमिनीची खरेदी दिनांक १४-०२-२००६ रोजी केलेली आहे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनाक १३-०२-२००६ रोजी संपला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना केवळ एक अर्धे पृष्ठ आवश्यक होते, तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना एकूण दहा पृष्ठांची व त्यांना आवश्यक नसलेली माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे नीटपणे अवलोकन न करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेल्या चुकीमुळे त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ विनाकारण खर्ची पडले आहे, असे आयोगास वाटते. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयावर दिलेले त्यांचे अभिप्राय योग्य असल्याचे आयोगास दिसून येत आहेत. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नेमकी काय माहिती मागितली आहे, ती कशा प्रकारे व कधी अपिलार्थीस दिली आहे, या मुद्दयावर जर जन अपिलीय अधिकारी यांनी भर दिला असता तर ते त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या दिलेल्या निर्णयाप्रत आले नसते. थोडक्यात, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने, अनावश्यक व विसंगत माहिती सशुल्क पुरविल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आकारलेले शुल्क रुपये वीस, हे त्यांना याच कालावधीमध्ये व्यक्तिशः परत करावे.

वरील प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या गैरसमजुतीतून अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लागल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर केलेले पुरेपूर प्रयत्न जरी चुकीचे असले तरी, त्यांनी सकारात्मक प्रयत्न केले आहेत, त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी

टाळाटाळ केल्याचे अथवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्यापासून असद्‌हेतुने दडवून ठेवल्याचे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, आयोगासमोर असे मत मांडले की, संबंधीत जन माहिती अधिकारी व तलाठी यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी यांच्या नावाचे व पदनामाचे सहजपणे दृष्टीस पडतील असे फलक लावलेले नाहीत. याबद्दल जन माहिती अधिकारी यांचा असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व तलाठ्यांच्या कार्यालयाची, या मुद्दयावर, हे आदेश निर्गमित होताच तपासणी करुन, सर्व तलाठी कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या नावाचे व पदनामाचे फलक अभ्यागताच्या सहजपणे दृष्टीस पडतील, अशी कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटी घेतलेले शुल्क रुपये २० हे त्यांना, याच कालावधीमध्ये परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ विक्रम आंभोरे, मु. पो. शेलगाव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म-२), तहसील कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७७
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब मुरलीधर मिसाळ, मु. फकीर जवळा पो. दिंद्रुड ता.किल्ले धारुर, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, फकीर जवळा ता.किल्ले धारुर, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किल्ले धारुर, जि.बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांच्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **"फकिरजवळा ग्रामपंचायत येथील दि. २८.१२.२००२ ते १८.६.२००७ पर्यंतच्या कालावधीमधील ग्रामसभा व मासिक सभेच्या इतिवृत्तांताच्या नकला"**, या माहितीची मागणी केलेली होती. अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एकूण ८२ पृष्ठांची माहिती पोस्टाद्वारे पाठविली. तथापि संबंधित पोस्टमनला अपिलार्थी हे टपाल स्वीकारण्यास त्यांच्या घरी उपलब्ध नसल्याचे आढळले. अपिलार्थीस हे टपाल देण्यासाठी पोस्टमन दि. ९.८.२००७ ते १८.८.२००७ या कालावधीत एकूण सात वेळा त्यांच्या घरी गेल्याचा उल्लेख, संबंधित पोस्टमनने या पाकीटावर केलेला आहे.सदर पाकीट जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगास दाखविले.तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविल्या गेलेल्या टपालाची स्वीकृती न करता, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. १८.६.२००७ रोजीचा अर्ज त्यांना दि. ३.७.२००७ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. दरम्यानच्या काळात ते जालना येथे प्रशिक्षणासाठी गेले होते. त्यांना शासकीय कामासाठी परगावी हजर राहणे भाग असल्याने त्यांच्या मुख्यालयी ते गैरहजर होते. अपिलार्थीचा मूळ अर्ज एका बंद पाकीटामधून त्यांना, शासकीय कर्तव्य पार पाडल्यानंतर, ते मुख्यालयी परत आल्यानंतर दि. ३.७.२००७ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. या नंतर त्यांनी दि. ६.८.२००७ रोजी एकूण ८२ पृष्ठांची त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पाठविली, तथापि दिलेल्या पत्त्यावर अपिलार्थी हे उपलब्ध न झाल्याने माहितीसाठीची तामिली अपिलार्थीस होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. २३.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. २६.९.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २४.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. २६.९.२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. या सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर होते. आज रोजी आयोगासमोरील सुनावणीसाठी देखील ते गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये त्यांना स्पीड पोस्टाद्वारे माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती स्पीड पोस्टाद्वारे दि. ६.८.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे पाठविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपेक्षित असलेले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडल्याचे येथे दिसून येत आहे. मात्र अपिलार्थी हे स्पीड पोस्टाद्वारे माहिती मागवून ते माहिती स्वीकार करण्यासाठी दिलेल्या पत्त्यावर कधीही उपलब्ध होऊ शकले नाहीत, हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पाकीटावरील पोस्टमनच्या अभिप्रायावरुन दिसून येते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व प्रथम अपील अर्जामध्ये नमूद केलेले त्यांचे अभिप्राय व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये आयोगास विसंगती आढळल्याने अपिलार्थीचे द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जसे जन माहिती अधिकारी यांचे माहिती देणे हे एक कर्तव्य आहे तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती ज्या पध्दतीने मागितली जाते, त्या पध्दतीस आवश्यक तो पूरक प्रतिसाद देऊन माहिती घेण्यासाठी स्वतः मूळ अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यावर उपलब्ध असणे, व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर स्वतः होऊन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित राहणे, या सर्व बाबी अर्जदारावर बंधनकारक आहेत. अपिलार्थीने या प्रकरणी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडले नसल्याचे वरील विवेचनावरुन लक्षात येते.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांना अपूर्ण का वाटते, याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे या बाबी व वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब मुरलीधर मिसाळ, मु. फकीरजवळा पो. दिंद्रुड, ता.किल्लेधारुर, जि.बीड- ४३१ १२८

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, फकीरजवळा ता.किल्ले धारुर, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,किल्ले धारुर जि.बीड - यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७८
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
रा. पिंपळगाव रेणुकाई ता.भोकरदन,
जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जि.जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.१०.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४-२००५ या कालावधीशी संबंधित **"श्री. बी.एस.नाईकवाडे यांनी केलेल्या कामाची बाबनिहाय यादी व अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता, मजूरांचे हजेरी पत्रक, धान्यकुपन इत्यादी,"** तपशीलवार माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणतीही सुनावणी घेऊन निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २.१२.२००७ रोजी संपूर्ण माहिती दिल्याचे व त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीचे दि. २.१२.२००७ रोजीचे तशा अर्थाचे पत्र आयोगास उपलब्ध करुन दिले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, दि. २४.८.२००७ रोजीच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांनी दि. ४.३.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २.१२.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे व त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले असल्यामुळे,दि. १४.३.२००८ रोजीच्या पत्रवजा आदेशान्वये निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अंतिमतः दि. २.१२.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, दि. १८.८.२००७ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे अधिनियमानुसार देय असताना, अपिलार्थीस दि. २.१२.२००७ रोजी म्हणजेच १०५ दिवस इतक्या प्रदीर्घ विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देणे ही बाब जन माहिती अधिकारी यांच्या आवाक्यातील नसण्याची किंवा ही माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागत असल्याची शक्यता कोणत्याही प्रकारे संभवत असल्याचे येथे दिसून

येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाबाबतचा जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणी त्यांनी अंगिकारलेल्या निष्क्रिय दृष्टीकोनामुळे अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना संबंधित प्रकरणाची तपासणी करण्याकरिता आयोगाने आवश्यक ती कागदपत्रे मागितली असता, त्यांचे सहायक जन माहिती अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे व त्यांच्या कपाटाला कुलूप असल्यामुळे ते आयोगासमोर कोणतीही कागदपत्रे सादर करु शकत नाहीत, असे बेजबाबदार उत्तर त्यांनी आयोगासमोर दिले. यावरुन कृषि खात्यातील कर्मचाऱ्यांचा माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणी संदर्भात असलेला दृष्टीकोन किती निष्क्रिय आहे, याची कल्पना येईल.

सबब उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीपेक्षा विलंबाने माहिती देऊन, दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, सचिव (कृषि) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६)च्या तरतुदीनुसार जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या विहित मुदतीत सुनावणी न घेता, अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर अपिलावर निर्णय देऊन अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अशाप्रकारे या प्रकरणी आपले कर्तव्य अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पार पाडले नसून त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर विलंबाने निर्णय देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद घेण्याचे आयुक्त, कृषि यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात आहे.

२. सचिव (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगाव रेणुकाई, ता.भोकरदन जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे -५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (कृषि), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७९
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. वायाळ गंगाधर कडाजी,<br>रा.पांगरी, ता.मंठा,जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, मंठा<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर जि.जालना | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.११.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेंतर्गत, **"शासकीय निधीतून पेवा राजु कनिराम यांचे शेत,पांगरा गडदे गट नं.६५,गट नं.५५,गट नं.२२२० इ. क्षेत्रात केलेल्या**

**शेततळे, गावतळे या कामाचे अंदाजपत्रक, झालेला खर्च व कामाची सद्यस्थिती"** याबाबत माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२०/-इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात,अपिलार्थीस देण्यासाठीचे सदर पत्र श्री. रितेश प्रधान नावाच्या व्यक्तीस दिले असून, त्या व्यक्तीची सही जन माहिती अधिकारी यांच्या दि. २९.६.२००७ रोजीच्या पत्रावर उपलब्ध आहे. तद्‌नंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही सुनावणी न घेऊन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. २१.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही आवश्यक माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन, ते माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी त्यांच्याकडील दि. २९.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. सदरचे पत्र त्यांनी श्री. रितेश प्रधान नावाच्या व्यक्तिला दि. २९.६.२००७ रोजी अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे हस्तांतरित केले होते. त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, श्री. रितेश प्रधान हे अपिलार्थीचे प्रतिनिधी असून अपिलार्थी हे त्यांच्याकडे पत्रव्यवहार, श्री. रितेश प्रधान या व्यक्तीमार्फत करत असतात. सदरची व्यक्ती अपिलार्थीकडील पत्रे त्यांच्या कार्यालयात देत असते व त्यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीस उद्देशून लिहिली जाणारी

पत्रे त्यांना अधिकृतपणे त्यांच्या कार्यालयातर्फे हस्तांतरित केली जातात. या प्रकरणी अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. आता त्यांनी अपिलार्थीस दि. ६.२.२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली असून ही माहिती अपिलार्थी यांच्या मुलाने श्री. रितेश प्रधान यांच्या समक्ष स्वीकारली आहे. सदर माहिती अपिलार्थीच्या मुलाने ज्या वेळी स्वीकारली, त्यावेळी बाहेरगावी असलेल्या अपिलार्थीशी त्यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती स्वीकारली आहे व याबाबत त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही, असे अभिप्राय त्यांच्या माहितीच्या पत्रावर दिले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. २१.७.२००७ रोजी अगर तत्पूर्वी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांचा दावा असा आहे की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री. रितेश प्रधान यांच्याकडे त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २९.६.२००७ रोजीचे कार्यालयीन पत्र हस्तांतरित केले, हे पत्र श्री. रितेश प्रधान यांना जन माहिती अधिकारी यांनी हस्तांतरित केल्याचा पुरावा त्यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगास दाखविला, तथापि जन माहिती अधिकारी यांचे सदर दि. २९.६.२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्रत्यक्षात प्राप्त झाले किंवा कसे हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.मूळात जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींसंदर्भात सरळ अपिलार्थीशी यांच्याशी पत्रव्यवहार करण्याचे सोडून त्यांच्या प्रतिनिधीकडे पत्र देणे ही बाब, गैर व अवैध आहे. **माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन आपले निर्णय कळविणे अशा फक्त जन माहिती अधिकारी व अर्जदार यांच्या दरम्यानच प्रक्रिया अभिप्रेत आहेत. अपिलार्थीने माहिती मागितली असता, या संदर्भात पत्रव्यवहार तिसऱ्या व्यक्तीमार्फत अपिलार्थीशी संपर्क करणे अशाप्रकारची प्रक्रिया मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार कोठेही अभिप्रेत नाही.** त्यामुळे व तसेच जन

माहिती अधिकारी यांच्या दि. २९.६.२००७ रोजीचे पत्र प्रत्यक्षतः अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा कोणताही सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांनी सादर न केल्याने, जन माहिती अधिकारी यांचे दि. २९.६.२००६ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असा निष्कर्ष काढण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अपिलार्थीच्या दि. १७.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दि. २१.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले असताना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुदतीत देखील कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुलाकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. ६.२.२००९ रोजी पुरविली असून या माहितीबाबत अपिलार्थीच्या मुलाची कोणतीही तक्रार राहिलेली नाही, अशा अर्थाचे दि. ६.२.२००९ रोजीचे पत्र, जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर केले आहे.या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याचे दिसून येते. व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर माहिती प्राप्त करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही अपिलार्थीची असते. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झालेले नाहीत.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी या संदर्भातील आवश्यक तो संपर्क सरळ न करता, अपिलार्थीच्या कथित प्रतिनिधीमार्फत केला आहे. त्यांची ही कृती सर्वथा अवैध व गैर असल्याने त्यांनी अशाप्रकारे अपिलार्थीशी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या संदर्भात केल्या जाणारा पत्रव्यवहार त्यांच्या कोणत्याही अधिकृत अथवा अनधिकृत प्रतिनिधीमार्फत न करता सरळ अर्जदाराशी करावा व उपरोक्त प्रकरणाची पुनरावृत्ती त्यांनी भविष्यात टाळावी, असे त्यांना या प्रकरणी सूचित

करण्यात येऊन, त्यांनी या प्रकरणी केलेल्या अशाप्रकारच्या अनियमिततेबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वायाळ गंगाधर कडाजी, मु.पो.पांगरी बु. ता.मंठा, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८०
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत,<br>रा. अंबाजोगाई जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, अंबाजोगाई जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कायालय,औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २४.०९.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १ एप्रिल ते ३० मे, २००७ या कालावधीशी संबंधित माहिती दिलेली नाही, तसेच वाहन वापराबाबतच्या दिलेल्या मर्यादेबाबत त्यांनी अद्यापही अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची तसेच त्यांनी माहिती अधिकाराच्या अर्जामध्ये ज्या वाहनाविषयी माहिती मागितली होती, त्या गाडीचा गैरमार्गाने वापर झाला आहे,त्यामुळे दिवाणी संहितेतील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचेवर पोलीस

कारवाई करण्याकरिता योग्य त्या विभागाकडे शिफारस करण्याची त्यांनी आपल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडील, ॲम्बॅसिडर गाडी क्र. एमएच-४४/१००१ च्या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

**"१) एमएच-४४/१००१ गाडी १ मार्च ०७ ते २८ मई ०७ या कालावधीतील लॉकबुक, डिझेल, ऑईल खरेदी, स्पेअर पार्ट व दुरुस्ती बीलांच्या छायाप्रती,**
**२) एमएच-४४/१००१ गाडी बद्दल आज तारखेस सद्दस्थिती बद्दल लेखी माहिती देण्यात यावे (गाडी कुठे आहे त्यांची स्थिती)**
**३) एमएच-४४/१००१ गाडी वापराबाबत दिलेल्या मर्यादाबद्दल लेखी मुद्देनिहाय तपशीलवार माहिती पुरविण्यात यावे**
**४) एमएच-४४/१००१ गाडी न.प. कार्यालय कामकाजा करीता वापरण्या करिता अर्जा वर काय निर्णय घेतले या बद्दल लेखी माहिती देण्यात यावे. "**

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रु.२/- या दराने त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्रथमतः पाहणी करण्यासाठी सूचित केले आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीने उपलब्ध अभिलेख्यांची पाहणी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी परत दि. २७.६.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४४/- अपिलार्थीस भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दि. ४.८.२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला व तद्‌नंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.९.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित मुद्यावरील माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अंबाजोगाई नगर परिषदेची ॲम्बॅसिडर गाडी एमएच-४४/१००१ ही गाडी नगर परिषदेतर्फे काही खाजगी व्यक्तींना वापरासाठी दिली गेली होती, सदर खाजगी व्यक्तींनी या गाडीमध्ये काही डिझेल भरले होते, याबाबतचे त्यांच्याकडे पुरावे उपलब्ध आहेत. इतर नागरिकांना अशाप्रकारे नगर परिषदेची गाडी वापरण्याचा हक्क असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी स्वतःच्या वापराकरिता नगरपरिषदेकडे गाडी उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ज केला असता, त्यावर नगरपरिषदेतर्फे गाडी वापराची विनंती अमान्य करण्यात आली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकित स्वरुपात दिलेली नाही. सदर गाडीच्या वापराची व देखभालीची योग्य त्या पातळीवर चौकशी व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थी यांना दि. ६.८.२००७ रोजी व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर दि. ११.९.२००७ रोजी अशी दोन टप्प्यामध्ये माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व माहितीचा परामर्ष जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीमध्ये घेतलेला आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.९.२००७ रोजी माहिती दिल्याचा पुरावा आयोगास सादर केला असून, यामध्ये

अपिलार्थीस माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीची सही दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीस दि. ११.९.२००७ रोजी माहिती पुरविल्याचा जो पुरावा सादर केला आहे, त्यावर असलेली सही अपिलार्थीच्या सहीशी जुळत नाही व अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, ही सही त्यांची नाही. त्याचबरोबर वाहन वापराच्या मर्यादेसंदर्भात शासनाची परिपत्रके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबाबत त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. हे आयोगास योग्य वाटत नाही. कारण शासनाची अशाप्रकारची परिपत्रके प्रत्येक शासकीय कार्यालयात व सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयात उपलब्ध असणे अनिवार्य आहे, तेव्हा अपिलार्थीचा, मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती प्राप्त झाली नसल्याचा, मुद्दा आयोग ग्राहय धरत आहे. ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस देय ठरते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे छायाप्रती मागितल्या होत्या. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटी पुरविलेली कागदपत्रे छायाप्रतींच्या स्वरुपात दिली आहेत. अपिलार्थी यांची अपेक्षा अशी आहे की, या प्रती जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकित करुन द्याव्यात, तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये साक्षांकित स्वरुपात प्रती मागितल्या नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये छायाप्रती मागितल्या व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस छायाप्रतीच्या स्वरुपात माहिती दिली आहे. याचबरोबर अपिलार्थीने नगरपरिषदेकडील वाहन क्र. एमएच-४४/१००१ च्या वापराबाबत सक्षम प्राधिकरणाकडून चौकशी होऊन संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची शिफारस आयोगाने करावी, अशा अर्थाची आयोगास विनंती केली आहे. या मुद्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, ही अपिलार्थीची वैयक्तिक तक्रार असून या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी नगरपरिषद प्रशासन हे वेगळे प्राधिकरण अस्तित्त्वात असल्याने अपिलार्थीने या तक्रारीसंदर्भात त्या प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज करुन आपल्या तक्रारीचा निपटारा परस्पर करुन घ्यावा.

वरील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अद्याप त्यांना पुरविण्यात न आलेली मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित

होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी लागेल. सदर माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीमार्फत त्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूतः टाळाटाळ केल्याचे अथवा कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अद्याप त्यांना पुरविण्यात न आलेली मुद्दा क्र. १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, रा.जेल कॉर्नर, पहिला माळा, अंबाजोगाई, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८१
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. ब्रम्हनाथ शंकर घोडके, रा.चाकरवाडी ता.जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १९.१०.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना मुदतीत माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर कोणतेही आदेश दिले नाहीत, असे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे सन १९८५ ते दि. १६.५.२००७ या कालावधीशी संबंधित, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. चाकरवाडी ता.जि.बीड येथील गायरान जमीन स.नं.९५० शी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **"स.नं. ९५० मधील गायरान जमिनी किती**

**लोकांना व केव्हा वाटप करण्यात आल्या त्यासाठी कोणते नियम,अटी व निकष लावले, ज्यांना जमिनी वाटप करण्यात आल्या त्यांचे अर्ज केव्हाचे होते, या संदर्भात त्यांची काय चौकशी झाली. अर्ज करणाऱ्या वाटप झालेल्या लोकांच्या व्यतिरिक्त आणखी किती लोकांनी जमीन मिळणेसाठी अर्ज केलेले आहेत, ते केव्हा केलेले आहेत.त्यावर काय चौकशी केलेली आहे, याची सद्यस्थिती व अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केव्हा केव्हा अर्ज केलेला आहे व केलेल्या अर्जांवर त्यांनी केलेली कार्यवाही"**, - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने अपिलार्थीस देण्याचे नाकारले. अपिलार्थीस माहिती नाकारली गेल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. १३.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत नाकारले असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती सकृतदर्शनी जरी प्रश्नार्थक स्वरुपात वाटत असली तरी अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे विविध स्वरुपात उपलब्ध आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची वेगळया व सरळ स्वरुपात, उदा. जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "जमीन किती लोकांना व केव्हा वाटप करण्यात आली", असे म्हणण्याऐवजी जमीन वाटप झालेल्या लोकांची यादी व दिनांक, अशा स्वरुपात मागणी करता आली असती आणि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शासकीय जमिनीचे विश्वस्त या नात्याने उपलब्ध असणे अनिवार्य आहे. त्याचप्रकारे अपिलार्थीने मागितलेल्या इतर मुद्यांवरील माहितीचे पृथःकरण केल्यास अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असल्याचे दिसून येते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १६.५.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला व आपला माहिती न देण्याचा निर्णय अपिलार्थीस विहित मुदतीत कळविला आहे. मात्र या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.७.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणतीही सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जिल्हाधिकारी, बीड यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी

३. संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ब्रम्हनाथ शंकर घोडके, मु.पो.चाकरवाडी,ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय,बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४८
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १८.६.२००७ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ होत आहे, तसेच त्यांनी या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.५.२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे पत्र त्यांनी दि. २१.५.२००७ रोजी पाठवून दिले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, **- हिंगोली जिल्हयातील एकूण घाऊक व अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांची**

**नावे, परवाने क्रमांक, परवानाधारकांचे पत्ते व फोन नंबरसहित माहिती -** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरणा करुन प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.४.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर अपिलार्थी हे नियोजित सुनावणीच्या दिवशी उपस्थित राहू न शकल्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी झाली नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क न भरल्याने माहिती पुरविली नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी प्रथम अपील केले, या अपील अर्जावर दि. १९.५.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि सदर सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय होऊ शकला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकरी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जरी त्यांच्याकडील दि. १३.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अवैध व चुकीचा आहे. कारण अपिलार्थीने सर्वसाधारण टपालाद्वारे त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दि. १३.३.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस निश्चितपणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे किती शुल्क भरावयाचे व त्याचा तपशील, जो अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस देणे आवश्यक आहे, तो दिलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.३.२००७ रोजीचे पत्र अवैध व चुकीचे ठरत आहे. अपिलार्थीच्या दि. ३०.४.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावरील दि. १९.५.२००७ रोजीच्या नियोजित सुनावणीबाबत अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले जन अपिलीय अधिकारी यांचे दि. १०.५.२००७ रोजीचे कथित पत्र त्यांना दि. २१.५.२००७ रोजी प्राप्त झाल्याने ते सुनावणीसाठी हजर राहू शकत नसल्याचे, जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास अपिलार्थीने त्यांच्या दि. २४.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आणले होते व या पत्राद्वारे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना मुदतीत पुनश्च् सुनावणी घेण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीच्या दि. २४.५.२००७ रोजीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीच्या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस पाठवावयाचे, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि. १०.५.२००७ रोजी तयार झालेले पत्र जावक लिपिकाने दि. १८.५.२००७ रोजी पोस्टात टाकल्यामुळे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी हजर राहता आले नाही. एकदा कार्यालयाचे पत्र तयार झाल्यानंतर पोस्टात टाकण्यासाठी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्याने घेतलेला ८ दिवसांचा कालावधी हा क्षम्य आहे, असे कोणाही जनसामान्यांना निश्चितपणे मान्य होणार नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणीसाठी नोटीस पाठविण्यामध्ये, ज्या कर्मचाऱ्याने विलंब लावला आहे, त्या कर्मचाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याचे, जिल्हाधिकारी, हिंगोली यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज विहित नमुन्यात व योग्य त्या कालावधीमध्ये केला असल्याने अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देय ठरत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, तसेच जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.३.२००७ रोजीचे पत्र वर नमूद केल्याप्रमाणे अवैध ठरत असल्याने अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य माहिती देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्जाकडे व प्रथम अपील अर्जाकडे अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर व अपील अर्जावर त्यांनी गांभीर्यपूर्वक व सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९-०२-२००९** — **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल रा. समिराबाग,खडकपूराच्या पाठीमागे, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४९
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, देगलूर, जि.नांदेड : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, देगलूर,
जि. नांदेड.

त्रयस्थ पक्षः श्री. बंडाप्पा व इतर चार अर्धघाऊक रॉकेल विक्रेते

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.११.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे दि. १८.६.२००७ रोजी माहितीची मागणी केली असता, विहित मुदत संपल्यानंतरही माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.७.२००७ रोजी रजिस्टर्ड टपालाद्वारे प्रथम अपील दाखल केले असता, अपिलार्थीच्या अपील अर्जावरील सुनावणी त्यांनी दि. २.८.२००७ रोजी ठेवून स्वतः जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर राहिले, त्यामुळे अपिलार्थी यांनी

त्यांचा लेखी जबाब नोंदवून दिला, तथापि अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय घेऊन अर्जदारावर अन्याय केला आहे. या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.६.२००७ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना दि. २६.६.२००७ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये, - "**देगलूर तालुक्यातील ५ अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांशी संबंधित शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेल वितरणाची व त्यांच्याकडील स्टॉक रजिस्टच्या सत्यप्रती, त्यांना संलग्न असलेल्या किरकोळ रॉकेल विक्रेत्यांना केलेले रॉकेलचे वितरण व स्टॉक रजिस्टच्या सत्यप्रती तसेच या रॉकेल विक्रेत्यांना दिल्या गेलेल्या रॉकेल टँकरच्या पोचपावत्यांच्या सत्यप्रती**" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी एप्रिल, २००३ ते ३१ मे, २००७ असा ४९ महिन्यांचा होता. संबंधितांच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ९.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३९,५००/- इतके भरण्याचे कळविले. अपिलार्थीस सदर पत्र पोस्टाद्वारे पाठविल्याचा आवश्यक तो पुरावा (अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगच्या पावतीची सत्यप्रत) जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे, त्यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रत्यक्षतः दि. १६.७.२००७ रोजी पोस्टाद्वारे पत्र पाठविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना पोस्टाद्वारे दि. २३.७.२००७ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.८.२००७ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याची सूचना करुनही अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या अभिप्रायाबद्दल जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या दि. २०.७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. २.८.२००७ रोजी दुपारी २.०० वा. सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी हे या पूर्वनियोजित वेळेपूर्वीच त्यांच्या कार्यालयात हजर झाले व त्यावेळी जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित असल्याचे पाहून ते निर्धारित वेळेच्या आधीच जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून निघून गेले. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.८.२००७ रोजी निर्धारित वेळेवर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली असता, सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर राहू शकले नाहीत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला वरील युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, दि. १८.६.२००७ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.६.२००७ रोजी प्राप्त झ ाला आहे व अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३९,५००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. ६.७.२००७ (९.७.२००७) रोजीच्या पत्राचे अवलोकन करता याच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे शुल्काचा तपशील दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस सदरचे पत्र पाठविल्यासंदर्भात जन माहिती अधिकरी यांनी आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व तसे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १७.८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये कळविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीबाबत अपिलार्थीने त्यांचे आक्षेप राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले

आहेत, तथापि या आक्षेपांचे खंडन वरील परिच्छेदात जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडून त्यांच्या युक्तिवादामध्ये करण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या घटनाक्रमाच्या सर्व टप्प्यावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून योग्य ती कार्यवाही वेळेत करण्यात आल्याचे आयोगास आढळले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे लावलेले शुल्क रु. ३९,५०० हे अवाजवी आहे, असे आयोगास सकृतदर्शनी वाटत नाही. मोठया व्याप्तीची माहिती मागवून त्यासाठी लागणारे शुल्क भरण्याची तयारी अपिलार्थीने या घटनाक्रमामध्ये कोठेही दर्शविली नाही, त्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यास ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-०२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४५५
निर्णय दिनांक ०९-०२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजेश दौलतराव पाडमुख,<br>रा. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः सहायक कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड
जन अपिलीय अधिकारीः कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९.०२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सध्याचे जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ५.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील नांदेड-निळा-आलेगाव,प्रजिमा ६९ बाबत दि.१.४.२००२ ते

३०.६.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, **"नांदेड -निळा-आलेगाव, प्रजिमा ६९ सन १.४.२००२ ते ३०.६.२००७ पर्यंत सदरील रस्त्यावर नाबार्ड, हुडको,अतिवृष्टी,एस.आर.आणि सि.के. या योजनेखाली किती व काय काम झाले. काम कधी सुरु झाले व कधी संपले. पहिले धावते बील ते अंतीम बिलापर्यंतची मोजमाप पुस्तीका, सी.सी.,ॲग्रीमेंटची सत्यप्रत"** ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज अधीक्षक अभियंता यांना उद्देशून केला होता. या प्रकरणी अधीक्षक अभियंता यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली नसल्याने, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज, त्यांनी मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात ज्या प्राधिकरणाच्या ताब्यात आहे, त्यांच्याकडे - कार्यकारी अभियंता - यांच्याकडे दि. ७.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून दिला व अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५३६/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अपिलार्थीनेअधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ७.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.९.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित केला. या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.९.१०.२००७ रोजी काही माहिती पाठविली व तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दि. २६.१०.२००७ व २०.१२.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५३६ इतके भरण्याचे विहित मुदतीत कळविले होते तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने त्यांनी अपिलार्थीस दि. ९.१०.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविली होती. तथापि सदर पत्र पोस्टाकडून विनातामिली त्यांच्याकडे

परत आले. तद्नंतर दि. २६.१०.२००७ रोजी अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या कार्यालयाकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली , त्यावेळी अपिलार्थीने एका मोजमाप पुस्तिकेच्या माहितीची प्रत या माहितीमध्ये नसल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले. तद्नंतर दि. २०.१२.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे सदर मोजमाप पुस्तिकेची प्रत अपिलार्थीस विनामूल्य पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयाकडे वारंवार मोठया व्याप्तीच्या माहितीची मागणी करीत असतात परंतु आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात कधीही भरत नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केला असल्याचे दिसून येते. त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय व शिस्तभंगविषयक कारवाई आदेशित करण्याची विनंती केली आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्रथमतः दि. ९.१०.२००७ रोजी व तद्नंतर दि. २०.१२.२००७ रोजी म्हणजेच, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दिली आहे. याच बरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा सादर केलेला अर्ज पूर्णतया न भरता त्यामध्ये त्यांना माहिती कशी हवी आहे, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ति आहेत किंवा कसे या मुद्यांसंदर्भात कोणताही तपशील दिला नाही, परिणामी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज देखील त्यांनी अपूर्ण स्वरुपात जन माहिती अधिकारी यांना सादर केल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा जन माहिती अधिकारी यांचा कोणताही असद्हेतू असल्याचे आयोगास या प्रकरणी निःसंशयपणे आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करीत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे

आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांना अपूर्ण का वाटते, याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही, मूळ अर्ज अपूर्ण ठेवला आहे, या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-०२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रुपेश दौलतराव पाडमुख, विभागीय प्रतिनिधी, दै.दर्शन समीक्षा वृत्तसेवा, हॉटेल ओमच्या शेजारी, शिवाजीनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८६

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. वाघमारे राहुल भिवाजी, अपिलार्थी
पंचशिलनगर (प.), पालवण रोड,
यशपाल किराणा दुकानाच्या दक्षिणेस, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
बीड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. त्यांच्या या अपील अर्जाध्ये त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात पंचनामा प्रत, वादग्रस्त

रस्त्याची चतु:सीमा, मोजणी अहवालाचा पंचनामा इत्यादी मुद्दयावर त्यांना माहिती आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत दिनांक १५-११-२००६ ते दिनांक ३०-०४-२००७ या कालावधीमधील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

**" दि. १५-११-०६ ची मौजे वासनवाडी ग्रामपंचायत अंतर्गत पंचशिलनगर, बीड येथिल सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण उठवण्याविषयीच्या प्रकरणाची अद्यापपर्यंत आपण केलेल्या कार्यवाहीची सर्व माहिती मिळणेबाबत."**

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने दिनांक २२-०५-२००७ रोजीच्या पत्रानुसार शुल्क भरल्यामुळे त्यांना सशुल्क माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०७-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, नियमाप्रमाणे प्रशासकीय बाबी पूर्ण कराव्यात व अपिलार्थीस माहिती पुरविणे बाकी असल्यास त्यांना दोन दिवसात विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००७ रोजी उर्वरित माहिती पुरविली. तथापि या माहितीने देखील समाधान न झाल्याने व ही माहिती देखील पूर्ण नसल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी अतिक्रमित रस्त्याची चतु:सीमा, जिल्हा परिषदेच्या दिनांक

१२-०४-२००७ रोजीच्या पत्रावर केलेली कारवाई, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नसून जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर पडताळणी न करता त्यांना माहिती दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या विनंतीनुसार त्यांनी विस्तार अधिकारी पंचायत समिती यांची नेमणूक करुन त्यांच्याकडून अहवाल मागवून घेतला व या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०५-२००७ रोजी प्रथमतः व तद्नंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील झालेल्या अपील निर्णयानंतर दिनांक २६-०९-२००७ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे तर त्यांनी माहिती दिलीच आहे, परंतु अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलामध्ये मागणी केलेली जादा माहिती देखील त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. यावर अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाप्रमाणे विनामूल्य न पुरविता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सशुल्क माहिती पुरविली आहे. या प्रकरणी चतुःसीमेच्या झेरॉक्सचा खर्च त्यांनी केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही संदर्भातील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने केलेल्या मागणीमध्ये निश्चित स्वरुपाची माहिती मागितली नव्हती. अपिलार्थीने या माहितीमध्ये सर्वसाधारण स्वरुपाची व कोणताही संदर्भ नसलेली माहिती मागविली असल्याने, अपिलार्थीने ज्या विषयावर माहितीची मागणी केली आहे, त्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध असलेली कागदपत्रे त्यांनी अपिलार्थीस सशुल्क पुरविली आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये व आज केलेल्या युक्तिवादामध्ये त्यांनी, वादग्रस्त रस्त्याची चतुःसीमा, अतिक्रमित जागेचा पंचनामा, अहवाल इत्यादी मुद्दे उपस्थित केले आहेत. तथापि त्यांनी अशा प्रकारच्या विषयाची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जामध्ये केलेली नाही. **येथे असे नमूद करण्यात येते की, अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावरील सुनावणीमध्ये अपिलार्थीने माहितीसाठी जन**

**माहिती अधिकारी यांना केलेला अर्ज हा या सुनावणीचा मूळ पाया असतो. अपिलार्थीने जर मूळ अर्जामध्ये अशी मोघम स्वरुपाची माहिती मागितल्यास ती अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे जन माहिती अधिकारी यांना अशक्य होते. या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपील अर्जामध्ये व व्दितीय अपील अर्जामध्ये मूळ माहितीपेक्षा अतिरिक्त मुद्दयांशी संबंधीत माहितीची मागणी केली आहे. जी त्यांनी त्यांच्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये करणे अपेक्षित होते. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना त्यांचे कर्तव्य पुरेसे काळजीपूर्वक पार पाडले नाही, अथवा अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या मूळ अर्जामध्ये करता आली नाही असेच येथे म्हणावे लागेल.** अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे याचा बोध न झाल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने उपस्थित केलेल्या विषयासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात, अथवा त्यातील उणीवाबद्दल अपिलार्थीस काही शंका अथवा आक्षेप असल्यास अपिलार्थीने त्यांच्या आक्षेपांचे निराकरण संबंधीत प्राधिकरणाकडून करुन घ्यावे, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या प्रथम अर्जावर विहित मुदतीत कारवाई केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १०-०२-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वाघमारे राहुल भिवाजी, पंचशिलनगर (प.), पालवण रोड, यशपाल किराणा दुकानाच्या दक्षिणेस, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८७

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ सौ. आसेगावकर संध्या सखारामपंत, अपिलार्थी
व्दारा - बुद्रुककर निवास, विद्यानगर, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सह संचालक कार्यालय (उ. शि.),
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सह संचालक (उ. शि.), औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी, सह संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या-कडून त्यांना प्रथम अपील अर्जाचा निर्णय अद्यापही प्राप्त झाला नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत सन २००२ ते जानेवारी २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. सदर माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०२-२००७ रोजी सशुल्क पुरविली आहे, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. आयोगास, या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे आवश्यक आहे, असे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास, हे आदेश अपिलार्थीस प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत, त्या अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १२-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे

आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. आसेगावकर संध्या सखारामपंत, व्दारा - बुद्रुककर निवास, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सह संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८८

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, अपिलार्थी
मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
जातप्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक ३, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
लातूर क्रमांक ३

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. रंगनाथ देविदास सोळंके |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने, माहिती दडवून ठेवल्याने व त्यांची दिशाभूल केल्याबद्दल त्यांना प्रत्येक दिवसाला रुपये २५० याप्रमाणे दंड लावण्यात यावा व वेगळा दंड २००० रुपये लावण्यात यावा अशी आयोगास विनंती केली आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

**" तक्रार संचिका क्र. ३४/२००५ मधील निवाडा झालेल्या आदेशाची अमलबजावणी का केलेली नाही राजपूत भामटा जात प्रमाणपत्र रंगनाथ देविदास सोंळके सरपंच टेंभूर्णी यांचे अवैद्य करण्याचा आदेश दि. ३/५/२००७ रोजी पारीत होवूनही आपण या प्रकरणास कोणाच्या दबवापोटी व कोणत्या अधिका-यांनी प्रतिवादीकडून किती पैसे घेतले याची सविस्तर माहिती व आदेश देण्याचे का टाळाटाळ करीत आहेत व अमलबजावणी करण्यासाठी कोणत्या अधिका-याचा आपल्यावर दबवा आहे काय ? व कोणत्या अमिशास आपण बळी पडले आहात काय ? दि. ३/५/२००७ च्या पत्रकान्वये अप्पर विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्या आदेशाप्रमाणे त्वरीत निवाडयाची अमलबजावणी होणे हे कायदयाने अनिवार्य असून यामध्ये पैशाच्या प्रलोभनापाई सदरील षडयंत्र रचले आहे काय ? व प्रतिवादीस अभय देण्याचे काम यापुढे किती दिवस आणखीन रेंगाळत ठेवणार याची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात तातडीने अर्जदारास देण्याचा हुकूम व्हावा. व अशा पध्दतीचे कृत्य यापुढे दाबून ठेवण्याचे चालू राहीले तर सनदशीर मार्गाने सदरील विभागीय समाजकल्याण अधिकारी विभाग क्र. ३ लातूर यांच्या विरोधात यापुढे कायदेशीर तक्रार लेखी स्वरुपात दाखल करावी लागेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी. "**

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर वीस रुपयाच्या ऐवजी अपिलार्थीने

दहा रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविल्यामुळे, अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकृत केला नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०९-२००७ रोजी कळविले. तद्नंतर अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ते दहा रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प जन अपिलीय अधिकारी यांना पाठविले, तथापि तोपर्यंत अपिलार्थीने प्रथम अपील करण्याची मुदत व्यपगत झाल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाचा विचार करता येत नसल्याचे त्यांच्याकडील दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला माहितीचा अर्ज त्यांच्या वैयक्तीक तक्रारीच्या स्वरुपात केल्याचे दिसून येत आहे. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तक्रारीच्या व अमूर्त स्वरुपात तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित असलेली विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या तरतुदीमध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मागणी केलेल्या माहितीचा दर्जा पाहता अपिलार्थीने अविवेकी माहिती मागितल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागवतांना विवेक बाळगावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विसंगत व अपूर्ण स्वरुपाची माहिती मागितली असल्याने जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. मात्र या प्रकरणी, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (सामाजिक न्याय)

यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राणा गुलाबसिंह नरहारीराव सोलंकी, मु. टेंभुर्णी, पो. तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्रमांक २, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८९

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. नरसिंग मगनलाल बाहेती, : अपिलार्थी
मु. पो. नायगांव, तालुका केज,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज प्रथमतः स्वीकृत न केल्यामुळे त्यांनी तो जन माहिती अधिका-यास रजिस्टर्ड टपालाने पाठविला. त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जामध्ये, अपिलार्थीच्या दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी केलेली कारवाई व त्या अर्जाची सद्यस्थिती याची माहिती जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही अथवा त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. विधाराधीन अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे विचाराधीन अपील खर्चासह मंजूर करावे व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई व्हावी आणि त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व त्यांनी मागणी केलेल्या माहितीचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्हावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "**सोबत जोडलेल्या दिनांक ०४ मे २००७ च्या अर्जावर आजमितीपर्यंत काय कारवाई केली व संबंधीत अर्ज सध्या कोठे व कोणाकडे आहे याचा तपशील द्यावा**" अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने या अर्जासोबत त्यांच्या तहसीलदार, बीड यांना उद्देशून केलेल्या दिनांक ०४ मे २००७ च्या तक्रार अर्जाची प्रत जोडली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सप्टेबर २००७ मध्ये, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीचे नसल्याचे कळविले व अपिलार्थीस उप जिल्हाधिकारी भूसुधार विभाग, जिल्हा कार्यालय, बीड यांच्याकडे माहितीची मागणी करण्याचे सुचविले. तसेच अपिलार्थीचा मूळ अर्ज उपजिल्हाधिकारी भूसुधार यांच्याकडे पाठविला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रावर तारखेचा कोणताही उल्लेख केलेला नाही. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीच्या या पत्राच्या त्यांच्याकडील स्थळप्रतीवरील टिपणीवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावरही निर्णय न झाल्याने व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती न पुरविली गेल्यामुळे, व्यथित होऊन

अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांच्याकडून असा खुलासा करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी ते स्वतः या विभागात कार्यरत नव्हते. अपिलार्थीने अर्ज करतेवेळी श्री. एम. डी. मोरे (नायब तहसीलदार) नावाचे जन माहिती अधिकारी कार्यरत होते. ते दिनांक एप्रिल २००८ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास जन अपिलीय अधिकारी यांनी थोडक्यात विषद केली. त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थीच्या जमिनीच्या वादासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या आदेशाव्दारे **अतिरिक्त तहसीलदार, बीड** यांना सदरील प्रकरणात दिनांक १६-०७-२००७ रोजी अगर तत्पूर्वी निर्णय घेण्याचे आदेशित केले होते. शासनाने अतिरिक्त तहसीलदार हा संवर्ग १४ जून २००६ रोजी संपुष्टात आणला, त्यामुळे उपरोक्त प्रकरणी तहसीलदार, बीड यांचा न्यायालयाच्या आदेशाशी कोठलाही संबंध येत नव्हता. या कारणामुळे अपिलार्थीचा अर्ज तहसीलदार, केज यांच्याकडे अंतिमतः हस्तांतरीत केला गेला व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तहसीलदार, केज यांनी दिनांक २९-११-२००७ रोजी निर्णय घेतला आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती प्राप्त झालेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारवाई अपेक्षिली होती. त्या कारवाईसंबंधी त्यांना माहिती दिनांक २९-११-२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस सदर माहिती, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी केलेल्या व्दितीय अपिलानंतर प्राप्त झाली आहे, त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जामधील मूळ माहितीवर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आता आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन

आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. त्यामुळे सदर जन माहिती अधिकारी हे, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाईस पात्र ठरत आहेत. मात्र सदर तत्कालीन तहसीलदार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे, त्यांच्यावर कोणतीही कारवाई करणे आयोग उचित समजत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरसिंग मगनलाल बाहेती, मु. पो. नायगांव व्हाया बनसारोळा, तालुका केज, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९०

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे, : अपिलार्थी

क्रांतीनगर, गणेशनगर कॉर्नर जवळ,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा आयुक्त,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्री. राजेंद्र मोहनराव देशपांडे |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, चूक आणि गोलगोल व अर्धवट माहिती दिली असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष **श्री. राजेंद्र मोहनराव देशपांडे यांनी दिनांक ०५-०८-२००७ ते १५-०८-२००७ पर्यंत गैरहजर राहून हजेरी रजिस्टरवर ५ दिवसांची सही केली आहे व ४ दिवसाची C. L. केली आहे. यावर वरिष्ठ अधिका-यांनी काय आक्षेप घेतला व त्यांनी दिनांक ३०-०३-२००७ रोजी आयुक्तांना उद्देशून केलेल्या अर्जावर उप आयुक्त यांना तात्काळ पुटअप करा म्हणून लिहिलेल्या त्या अर्जाची अंमलबजावणी आतापर्यंत का झाली नाही**, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे आढळल्यावरुन, अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी दिलेला प्रतिसाद

अपुरा आहे, कारण या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा - उप आयुक्त (यांनी) तात्काळ पुटअप करा असे लिहिले त्या अर्जाची अंमलबजावणी आतापर्यंत का झाली नाही - या मुद्दयाबाबत त्यांनी त्यांच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्रामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. तथापि मूळात अपिलार्थीने मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस ही माहिती देय नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तसे कळविणे भाग होते. परंतु त्यांनी अपिलार्थीस माहिती देतांना अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्दयाचा विचार केल्याचे दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाची व्याख्या पाहता, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे कारणे अथवा त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारणे अभिप्रेत नाही. मूळात अपिलार्थीने या प्रथम अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्दयावर मागितलेली माहिती त्यांना देय होत नाही. तथापि या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ते उत्तर दिले नाही, हेही तितकेच खरे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एका मुद्दयावरील माहिती दिनांक २९-०९-२००७ रोजी दिली असून, ती माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे व दुस-या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय ठरत नसल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आता बाकी राहत नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण पिराजी कांबळे, क्रांतीनगर, गणेशनगर कॉर्नर जवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९१

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. रुपेश दौलतराव पाडमुख, : अपिलार्थी
आवृत्ती प्रमुख "दै. दर्शन" समीक्षा वृत्त सेवा,
हॉटेल $ च्या शेजारी, शिवाजीनगर,
नांदेड - ४३१ ६०२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीनंतरही अपूर्ण माहिती पुरविली व जन अपिलीय अधिकारी यांच्या असमाधानकारक निर्णयामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे म्हटले आहे व त्यांना आवश्यक असलेल्या सन

२००६-०७ व २००७-०८ या वर्षामध्ये प्रस्तावित केलेल्या व झालेल्या खर्चाच्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बांधकाम विभागामार्फत सन २००६-२००७ मध्ये केल्या गेलेल्या कामांची व २००७-२००८ या कालावधीमध्ये खर्चाच्या मान्यतेसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **करण्यात आलेल्या कामांची रक्कम, कामाचे नांव, अंदाजे किंमत, खर्च केलेली रक्कम ज्या शीर्षाखाली खर्च करण्यात आली त्या शीर्षाची माहिती, सन २००६-२००७ मध्ये मनपा बांधकाम फंडातील शीर्षकनिहाय तरतुदी, २००६-२००७ मध्ये तरतुदीपेक्षा जास्त खर्च झाला आहे काय, सन २००६-२००७ च्या ३१ मार्च २००७ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षाचे ताळेबंद व जमाखर्चाचे स्टेटमेंट, २००७-२००८ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये मध्ये २००६-२००७ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे काय, व अंदाजपत्रकाच्या तरतुदीपेक्षा जास्त खर्चास कोण जबाबदार आहे व आजपर्यंत काही कारवाई करण्यात आली आहे काय** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यासाठी विलंब झाला असल्याचे अनुमान काढून त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्याची शिफारस केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही, आयोगाने त्यांना आयोगाकडील दिनांक ०३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे लेखी कळवून तसेच दिनांक ०४-०२-२००९ रोजी दूरध्वनीव्दारे त्यांचे कार्यालयातील श्री. वानखेडे, स्वीय सहाय्यक यांच्यामार्फत आजच्या सुनावणीसंदर्भात अवगत करुनही ते आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे व याबद्दल आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिली आहे. अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती अपूर्ण प्राप्त झाली असे वाटते हे स्पष्ट करण्यासाठी, अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि अद्यापपावेतो अपिलार्थीस न दिलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती दिली आहे किंवा कसे याची हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत चौकशी करुन अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नसल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि अद्यापपावेतो अपिलार्थीस न दिलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याचे त्यांना आढळल्यास, संबंधितांविरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रुपेश दौलतराव पाडमुख, आवृत्ती प्रमुख "दै. दर्शन" समीक्षा वृत्त सेवा, हॉटेल $ च्या शेजारी, शिवाजीनगर, नांदेड - ४३१ ६०२.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९२

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. विठ्ठल बालाजीराव जटाळे, : अपिलार्थी
मु. वसरणी, पोस्ट सिडको, अंध विद्यालयाच्या
बाजूस, वसरणी, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, भारत विद्यालय हायस्कूल,
शक्तीनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा भारत विद्यालय हायस्कूल, शक्तीनगर, नांदेड

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : सचिव, राष्ट्रीय शिक्षण समिती संचलित भारत विद्यालय हायस्कूल, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. मारोती सखाराम चव्हाण

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये, अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीसाठीचा अर्ज सोबत जोडला आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये कोणतीही विशिष्ट अशी विनंती आयोगास केलेली नाही.

यावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधीत त्रयस्थ पक्षाची काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कथित माहिती पुरविली, जी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पूर्णतया विसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००७ रोजी आपला कथित निर्णय दिला. या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही भाष्य नाही. तसेच या पत्राव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल दिलेली कथित माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी विसंगत असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधीत अभिलेखे त्यांच्या शाळेतील जेष्ठ लिपीक श्री. सुधीर नारायणराव पाठक यांनी गहाळ केले असल्यामुळे, त्यांना या प्रकरणाशी संबंधीत कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. इतर अनेक प्रकरणी त्यांच्या हातून असेच घडल्याने त्यांना संस्थेने सक्तीने सेवानिवृत्त केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. त्यातील मुद्दा क्रमांक १ मधील,

"कारवाई केली नाही तर का केली नाही," हा भाग तसेच मुद्दा क्रमांक २ व ३ व्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देय असणार नाही, कारण या मुद्दयांवर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतची कारणे व खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने माहितीची मागणी केली असता ती अर्जदारास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कारवाई करणे, व अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देणे एवढेच यामध्ये अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृती अथवा निर्णयाबाबत कारणे विचारणे अथवा त्यांचे स्पष्टीकरण, खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारणे अभिप्रेत नाही. मात्र अपिलार्थीच्या त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील दिनांक ०२-०७-२००७, १२-०७-२००७ व १७-०७-२००७ रोजी दाखल केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली व मुद्दा क्रमांक ४ मधील श्री. मारोती सखाराम चव्हाण यांच्यावर नियमानुसार कोणती कारवाई करण्यात आली, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने देय ठरत आहे. सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी हे दिनांक ०१-०९-२००८ पासून कार्यरत आहेत. यापूर्वीचे मुख्याध्यापक ज्यांच्या कालावधीमध्ये अपिलार्थीचा अर्ज शाळेस प्राप्त झाला, ते मुख्याध्यापक आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्णतया विसंगत माहिती देऊन, आपल्या कार्यशैलीतील अकार्यक्षमता व कर्तव्यपरायणतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. तथापि, आता संबंधीत जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोगास देता येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती जतन करण्याची जबाबदारी ज्या कर्मचा-याकडे आहे व ज्यांनी ही माहिती नष्ट केली, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे नोंदविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे या निर्णयाव्दारे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील अंशतः व मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत कसोशीने शोध घेऊन विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विठ्ठल बालाजीराव जटाळे, मु. वसरणी, पोस्ट सिडको, अंध विद्यालयाच्या बाजूस, वसरणी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भारत विद्यालय हायस्कूल, इतवारा, शक्तीनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, राष्ट्रीय शिक्षण समिती संचलित भारत विद्यालय हायस्कूल, शक्तीनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९३

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. संतोष कोंडीबाराव तवर, अपिलार्थी

लाड गल्ली, इतवारा,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ,

जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष १ श्री. व्ही. के. भारजकर,

२ सौ. पूनम एकनाथराव तोरडमल

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कोणतीही विशिष्ट माहिती मागितली नसून त्यांच्या अपील अर्जासोबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या प्रथम अर्जाची प्रत जोडली आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १०-०२-२००९ रोजीचे पत्र सादर करण्यात आले असून या

पत्रावर वीस रुपये इतक्या किमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटविलेले आहेत. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, दिनांक १०-०२-२००९ रोजी सुनावणीसाठी असलेल्या अपिलासंदर्भातील माहिती त्यांना प्राप्त झाली असून ती समाधानकाक आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे आयोगाने लेखी पूर्वसूचना देऊन देखील गैरहजर आहेत यावरुन व अपिलार्थीच्या आयोगास प्राप्त झालेल्या पत्रावरुन अपिलार्थीस विचाराधीन अपील चालविण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नसावे असे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील क्रमांक २३९३/२००७, दिनांक २६-११-२००७ खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २३९३/२००७, दिनांक २६-११-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष कोंडीबाराव तवर, लाड गल्ली, इतवारा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३९५

निर्णय दिनांक १०-०२-२००९

१ श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, : अपिलार्थी
रा. लोण (खुर्द), तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-०२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जासोबत अपिलार्थीने आपल्या माहितीसाठीचा मूळ अर्ज जोडला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे धनज या गावातील जून ते ऑगस्ट २००६ या कालावधीतील महापुरामुळे झालेल्या नुकसानीबाबतची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - **पूरग्रस्त शेतक-यांची यादी, पंचनाम्याची यादी, धनज या गावातील शेतक-यांची नांवे, गट क्रमांक, क्षेत्रफळ, पिकाचे नांव व त्यांना मिळालेली रक्कम** - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधीत आहे त्या प्राधिकरणाकडे म्हणजे तालुका कृषि अधिकारी, मुदखेड यांच्याकडे दिनांक १४-०८-२००७ रोजी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठविली व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये वीस इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०९-२००७ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२००७ रोजी माहिती प्राप्त झाली.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीने सदर अपील निवासी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून केले होते, तथापि या प्रकरणी तहसीलदार, मुदखेड हे जन अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक २१-०९-२००७ रोजी तहसीलदार, मुदखेड यांच्याकडे पाठवून दिला. मात्र या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने व आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक नसलेली माहिती पुरविली आहे. अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने पुरविली आहे, तसेच त्यांना अपेक्षित असलेली माहिती ही नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती कृषि विभागाशी संबंधीत असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०८-२००७ रोजी पाठविली. सदर प्रत तालुका कृषि अधिकारी यांना दिनांक २२-०८-२००७ रोजी प्राप्त झाली. कृषि विभागाशी संबंधीत माहिती त्यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविली आहे. या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीस प्रस्तावित माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. आज रोजी अपिलाथीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नव्हती. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तालुका कृषि अधिकारी, मुदखेड यांच्या ताब्यात होती त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांनी दिनांक १४-०८-२००७ रोजी तालुका कृषि अधिकारी, मुदखेड यांच्याकडे पाठविला. अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे जी कारवाई करण्याकरिता पाच दिवसांचा कालावधी अनुज्ञेय होता ती कारवाई करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना १६ दिवसांचा विलंब लागला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १४-०८-२००७ रोजी पाठविलेले पत्र कृषि विभागास दिनांक २२-०८-२००७ रोजी प्राप्त झाले. वास्तविक पाहता, जन माहिती अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांचे मुख्यालय एकाच गावामध्ये आहे परंतु एक साधे पत्र पाठविण्यासाठी आठ दिवसांचा कालावधी संबंधीत प्राधिकरणाने या प्रकरणी

घेतल्याचे दिसून येत आहे. यानंतर कृषि विभागाने ताबडतोब दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे तहसीलदार, मुदखेड यांना आवश्यक ती माहिती पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडे या टप्प्यावर अपिलार्थीस देण्यासाठी आवश्यक त्या माहितीच्या पृष्ठांची संख्या माहिती असतांना देखील त्यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काची रक्कम भरण्याचे कळविण्यासाठी दिनांक १८-०९-२००७ पर्यंतचा कालावधी घेतला. तदनंतर अपिलार्थीने दिनांक २८-०९-२००७ रोजी सदर शुल्काचा भरणा मनीऑर्डरव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असता व तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झालेली असतांना देखील दिनांक ०१-१२-२००७ रोजी म्हणजेच साठ दिवसाच्या विलंबाने अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली. या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आपले कर्तव्य पार पाडलेले नाही. त्यांनी मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या वेगळ्या प्राधिकरणाशी संबंधीत होती त्या प्राधिकरणाकडे, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज पाच दिवसाच्या आत पाठविणे अभिप्रेत होते, तथापि या ठिकाणी त्यांनी १६ दिवसांचा विलंब लावला. कृषि विभागाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे कळविण्यासाठी १८ दिवस इतका कालावधी घेतला. तदनंतर अपिलार्थीने दिनांक २८-०९-२००७ रोजी शुल्क भरल्यानंतर दोन महिन्याचा कालावधी, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे तयार असतांना देखील, पुरविण्यासाठी लावला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेला हा विलंब निश्चितच समर्थनीय नाही, असे आयोगाचे मत आहे. मूळात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे फारसे गांभीर्य वाटत नसावे, असे येथे दिसून येते. या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या बेजबाबदार कार्यशैलीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. आणि त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब जिल्हाधिकारी, नांदेड यांना, संबधीत जन माहिती अधिकारी

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील अनुज्ञेय कालावधी व्यापगत झाल्यानंतर माहिती दिली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय ठरत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे त्यांनी स्वीकारलेले शुल्क रुपये वीस हे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पंचनाम्याची प्रत व यादी मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी जी माहिती तयार करुन आणली आहे त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या सर्व मुद्दयांचा समावेश होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये पंचनाम्याची प्रत मागितलेली नाही त्यामुळे सहाजिकच पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होऊ शकणार नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर व्यक्तिशः दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश देण्याचे प्रयोजन आता उरलेले नाही.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून आले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये प्रत्येक कारवाई ही विशिष्ट कालावधीमध्ये होणे अनिवार्य असल्याने प्रत्येक कारवाईस कालमर्यादेचे बंधन आहे. तथापि महसूल विभागाकडील प्राधिकरणांकडून अशा प्रकारचे कोणतेही बंधन पाळले जात नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. तेव्हा सचिव (महसूल) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालमर्यादेचे बंधन पाळण्यासाठी त्यांच्या विभागातील सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सक्त सूचना देणारे परिपत्रक त्यांच्या स्तरावरुन निर्गमित करावे. सदर सूचना त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (४) च्या तरतुदीनुसार देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये वीस इतके त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत परत करावे.

३. जिल्हाधिकारी, नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविशयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-०२-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, रा. लोण (खुर्द), तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.